पुणे आवृत्ती

बातम्यांचा राजा

# जनप्रवास

मुंबई, पुणे, अ.नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध.

RNI NO. MAHMAR/2013/57952

शुक्रवार, दि. १४ मार्च, २०२५ | वर्ष : १३ | अंक : ०६७ | पाने ८ | किंमत २ रुपये

www.janpravaslive.in E-mail : dainikjanpravas@gmail.com

आतील पानात...

3 कोल्हाचे पिल्लू आईच्या कुशीत विसावले
४ अखेर. .पारनेर शहर बीट चौकी कार्यान्वित !
५ दिघोळ माळेवाडी ग्रामपंचायत भाजपाच्या ताब्यात

पान ८ वर..



## बाजारभाव - सोने

२२ कॅरेट : ८०,४२०/-

२४ कॅरेट : ८६,९००/-

## बाजारभाव - चांदी

१ किग्रॅ. : ९९,०००/-

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबल्याने पदाधिकाऱ्यांची आता 'नियोजन' साठी फिल्डिंग

**जनप्रवास । प्रतिनिधी**

मुंबई : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सातत्याने लांबणीवर पडत आहेत. या निवडणुका आता २०२६ मध्येच होतील, असा अंदाज आहे. त्यामुळे आता सत्ताधारी पक्षाच्या इच्छुक कार्यकर्त्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी जिल्हा नियोजन समितीकडे आपला मोर्चा वळवला आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होतील त्या वेळी होतील, मात्र सध्या नियोजन समितीचे सदस्यपद मिळावे यासाठी महायुतीच्या मित्र पक्षातील नेते आणि कार्यकर्त्यांनी पालकमंत्री, मंत्री आणि पक्षांच्या वरिष्ठांकडे साकडे घालण्यास सुरुवात केली आहे. इच्छुकांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने भाजप, शिंदेंची शिवसेना आणि अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस या तीनही पक्षांच्या नेत्यांना सदस्य नेमण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागणार आहे.



जिल्हा नियोजन समितीचे अध्यक्ष पालकमंत्री असतात. राज्य सरकारकडून जिल्हा नियोजन समितीवर 'नामनिर्देशित सदस्य' म्हणून नियक्त्या करण्यात येतात . पुणे जिल्हा नियोजन समितीचा विचार केल्यास या ठिकाणी नामनिर्देशित सदस्यांची संख्या ४ तर विशेष निमंत्रित सदस्यांची संख्या १४ इतकी आहे. त्यामुळे १८ पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची या ठिकाणी वर्णी लागणार आहे. पुणे जिल्हा नियोजन समितीचे २०२५-२६ या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक हे सुमारे १ हजार २०० कोटींचे आहे. या समितीच्या माध्यमातून जिल्ह्यातील रस्ते, गावातील पाणीपुरवठ्याची कामे, वीज यंत्रणा उभारणे, समाज मंदिर बांधणे, पूल, शाळा दुरुस्ती अथवा नवीन बांधणे, आरोग्य विषयक सुविधा देणे यासारख्या गोष्टींसाठी निधी मिळतो.

जिल्हा नियोजन समितीवर सदस्य म्हणून वर्णी लागलीस त्या माध्यमातून आपण आपापल्या मतदारसंघामध्ये निधी आणून कामे करू शकतो. आणि त्याचे श्रेय घेता घेऊ कमी निवडणुकांमध्ये त्याचा फायदा करून घेता येईल . त्यामुळे आगामी निवडणुकीच्या दृष्टीने नियोजन समितीचे सदस्य पद मिळावे, यासाठी इच्छुकांची मोठी संख्या सध्या पाहायला मिळत आहे.

## वेगवेगळ्या अपघातात तिघांचा मृत्यू; मृतांमध्ये दोन पादचारी ज्येष्ठ नागरिक

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : शहरात वेगवेगळ्या अपघातात तिघांचा मृत्यू झाल्याची घटना घडली. पुणे-नगर रस्ता, तसेच औंध भागातील ब्रेमेन चौकात अपघाताच्या घटना घडल्या.

पुणे-नगर रस्त्यावर विमाननगर परिसरात खासगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या बसच्या धडकेत दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी (११ मार्च) रात्री दहाच्या सुमारास घडली. अपघातानंतर पसार झालेल्या प्रवासी वाहतूक करणाऱ्या बसचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. प्रणव प्रवीण औचर (वय २३) असे मृत्युमुखी पडलेल्या दुचाकीस्वार तरुणाचे नाव आहे. याबाबत निलेश प्रल्हाद ढसाळ (वय ४५, रा. साई सत्यम पार्क, वाघोली) यांनी विमानतळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

नगर रस्त्यावर लोणीकंद भागात वाहनाच्या धडकेत पादचारी ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. शालीग्राम पाखरे (वय ७०) असे जखमी झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी वाहनचालक अक्षय भीमराव मोहळ (वय २२, रा. तळेगाव ढमढेरे, ता. शिरुर, जि. पुणे ) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. औंधमधील ब्रेमेन चौकात टेम्पोच्या धडकेत पादचारी ज्येष्ठ महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली. अपघातानंतर पसार झालेल्या टेम्पोचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. ताराबाई शंकर मोहाडीकर (वय ७५, रा. लक्ष्मीनगर, पिंपळे गुरव) असे मृत्युमुखी पडलेल्या ज्येष्ठ महिलेचे नाव आहे. याबाबत मोहाडीकर यांचा मुलगा जगदीश (वय ५०) यांनी चतु:शृंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

## पिंपरी-पुण्यात मोटारसायकल चोरट्यांचा पर्दाफाश ; दोन आरोपींकडून २६ लाखांच्या ५३ मोटारसायकली जप्त

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : पिंपरी पोलीस ठाण्याचे हद्दीत मेट्रो स्टेशन व इतर ठिकाणी वारंवार होणारे मोटार सायकल चोरीच्या गुन्हया संदर्भात पोलीसांनी अज्ञात मोटार सायकल चोरटयांचा शोध घेऊन मोटारसायकल चोरांचा शोध सुरु केला होता. त्यानुसार पिंपरी चिंचवड व पुणे शहर हद्दीतील १०० ते १५० सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करत तांत्रिक विश्लेषण आधारे आरोपींचा माग काढून दोन आरोपींना अटक करुन त्यांच्या ताब्यातून २६ लाख १० हजार रुपये किंमतीच्या ५३ मोटारसायकल जप्ती करण्यात आल्या आहे. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय व आयुक्तालयाबाहेरील एकूण ३५



वाहनचोरीचे गुन्हे उघडकीस आळ्याची माहिती परिमंडळ एकच्या पोलीस उपायुक्त स्वप्ना गोरे यांनी दिली आहे.

धीरज प्रदीप सावंत (वय-२३, रा. नहेगाव, पुणे), बालाजी ऊर्फ तात्यासाहेब भोसले (२४, रा. शाहुपुरी, सातारा) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहे. पिंपरी पोलीस ठांण्याचे वपोनि अशोक कडलग यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि दिंगबर अतिग्रे यांचे पथक मोटारसायकल चोरीच्या गुन्हयाचे घटनास्थळापासून मोटारसायकल चोरी करुन घेऊन आरोपी गेलेल्या मार्गाचे सीसीटीव्ही फुटेज पाहण्यास सुरुवात केली. पिंपरी चिंचवड व पुणे शहरातील विविध सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करत तपासणी करत असताना, पोलीस अंमलदार एस जानराव यांना त्यांचे खबऱ्याकडून माहिती मिळाली की, मोरवाडी मेट्रोस्टेशन पिंपरी येथील मोटारसायकल पार्क केलेल्या ठिकाणी एक संशयित व्यक्ती फिरत आहे. त्याप्रमाणे पिंपरी पोलीसांचे पथक तातडीने सदर ठिकाणी जाऊन त्यांनी आरोपीचा शोध घेऊन त्यास सापळा रचून ताब्यात घेत चौकशी केली. त्यावेळी आरोपीने वाहनचोरीचे गुन्हे साथीदार सोबत केल्याची कबुली दिली. तसेच त्याच्या ताब्यातून एकूण ५३ मोटारसायकल पोलीसांना मिळून आल्या आहे. आरोपींनी पिंपरी चिंचवड शहरात वाहनचोरीचे २५ गुन्हे, पुणे शहरात चार गुन्हे, कोल्हापूर मध्ये दोन गुन्हे तर सातारा मध्ये चार गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले आहे.

# 'हि इज रिअल क्रिमिनल'

## अजितदादांच्या शिलेदाराने धंगेकरांवर केले गंभीर आरोप

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : काँग्रेसचे माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी नुकताच एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेमध्ये प्रवेश केला आहे. या पक्षप्रवेशानंतर महायुतीतील मित्रपक्ष असलेल्या अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपमधून नाराजीचे सूर उमटू लागले आहेत. धंगेकर यांनी अजित पवारांविषयी केलेला विधानानंतर राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष दीपक मानकर यांनी संताप व्यक्त केला आहे. तसेच धंगेकर हे 'रिअल क्रिमिनल' असल्याची टीका करत आरोप केले आहेत. मानकर यांनी



प्रसिध्दीपत्रक जारी करत धंगेकरांवर निशाणा साधला आहे. मानकर यांनी म्हटले आहे की, रवींद्र धंगेकर यांनी स्वत: चार दरवाजे फिरून शिंदेच्या पक्षात प्रवेश केला आहे. अजितदादांबद्दल बोलण्याची त्यांची लायकी आहे का? आमदार म्हणून पहिल्यांदा निवडून आले, त्यावेळी अजितदादांच्या पाया पडून विनंती करून राष्ट्रवादीची मदत घेतली. त्यानंतर त्यांनी सरड्यासारखे रंग बदलले असल्याची टीका मानकर यांनी केली.

गुन्हेगारी प्रवृत्तीच्या असलेल्या रवींद्र धंगेकर यांना दादांनी केलेल्या उपकाराची जाणीव नाही. धंगेकर वाटेल ते स्टेटमेंट करत आहेत. अजित पवार हे ज्या दिवशी बडगा दाखवतील त्यावेळी धंगेकर यांना त्याची लायकी समजेल. शिंदेच्या पक्षात जाऊन धंगेकरांचा भविष्यात पोलिसांकडून होणारा त्रास कमी होणार नाही. गृह खाते देवेंद्र फडणवीसांकडे आहे. याची जाणीव ठेवा. मुस्लीम समाजाला वापरून त्यांची फसवणूक मोठ्या प्रमाणात केलेली आहे. याची गृहमंत्र्यांनी सखोल चौकशी करावी, असेही मानकर म्हणाले आहेत.

काँग्रेस पक्षाने लोकसभा, विधानसभेची उमेदवारी अनेकांना डावलून धंगेकराना उमेदवारी दिली. मात्र त्यांनी फक्त काँग्रेस कार्यकर्त्यांना वापरून आपला रंग दाखवला आहे. धंगेकर कोणाचे होवू शकत नाही. शिंदे साहेबांना याचा अनुभव येईल. त्यावेळी बराच उशीर झालेला असेल. हे सत्य तुमच्या समोर लवकरच येईल, अशी टीकी मानकर यांनी केली आहे.

## मुंढवा परिसरात १७ लाखांचा गांजा जप्त; अमली पदार्थ विरोधी पथकाची कारवाई

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : मुंढवा भागात गांजा विक्रीसाठी आलेल्या दोघांना गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने अटक केली. त्यांच्याकडून १६ लाख ८० हजारांचा २८ किलो गांजा जप्त करण्यात आला. प्रमोद सुधाकर कांबळे (वय ४४, रा. किल्ला वेस, करमाळा, जि. सोलापूर), विशाल दत्ता पारखे (वय ४१, रा. मोहननगर,आदित्य सोसायटी, विश्रांतवाडी) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

मुंढवा परिसरात अमली पदार्थ विरोधी पथक गस्त घालत होते. त्या वेळी कांबळे आणि पारखे गांजा विक्रीसाठी येणार असल्याची माहिती पोलीस कर्मचारी आझाद पाटील यांना मिळाली. पोलिसांनी सापाळा लावून कांबळे आणि पारखे यांना पकडले. त्यांच्याकडे असलेल्या पिशवीची तपासणी करण्यात अली. त्यांच्याकडून १६ लाख ८० हजारांचा २८ किलो गांजा जप्त करण्यात आला.

आरोपी गांजा कोणाला देणार होते, यादृष्टीने पोलिसांकडून तपास करण्यात येत आहे. अतिरिक्त पोलीस आयुक्त शैलेश बलकवडे, उपायुक्त निखील पिंगळे, सहायक आयुक्त राजेंद्र मुळीक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुदर्शन गायकवाड, सहायक निरीक्षक नितीनकुमार नाईक, आझाद पाटील, मयूर सूर्यवंशी, संदीप जाधव, संदीप शेळके, योगेश मांढरे, युवराज कांबळे, चेतन गायकवाड, रवींद्र रोकडे, दिनेश बास्टेवाड, दिशा खेवलकर यांनी ही कारवाई केली.

# वाहतूक कोंडीमुक्तीसाठी दोन हजार अतिक्रमणे जमीनदोस्त

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : शहर आणि परिसरातील राष्ट्रीय आणि राज्य मार्गांवरील अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणांवर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) धडक मोहीम राबविण्यात येत असून गेल्या नऊ दिवसांत सुमारे दोन हजार अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे जमीनदोस्त करण्यात आली आहेत. या कारवाईत दोन लाख चौरस मीटरपेक्षा जास्त क्षेत्र मोकळे करण्यात आल्याने रस्त्यांनीही मोकळा श्वास घेतला आहे.

शहर आणि परिसरात काही दिवसांपासून अनधिकृत बांधकामांचे प्रमाण वाढत आहे. यामुळे वाहतुकीचा प्रश्न निर्माण होत असून नागरिकांसह



वाहनचालकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. त्यामुळे महामार्ग कोंडीमुक्त करण्याच्या दृष्टीने पीएमआरडीएसह राष्ट्रीय महामार्ग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका यांनी संयुक्त मोहीम हाती घेतली आहे. या कारवाईत गेल्या नऊ दिवसांत १ हजार ९९२ अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आली आहे. यात एक लाख ९९ हजार दोनशे चौरस मीटरवरील अतिक्रमणे जमीनदोस्त करण्यात आली. यात प्रामुख्याने वर्दळ असणाऱ्या राज्य आणि राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमणे काढण्यावर भर देण्यात येत आहे.

पुणे-नाशिक रस्ता, पुणे-सोलापूर रस्ता आणि चांदणी चौक ते पौड रस्ता या भागातील अनधिकृत बांधकाम तसेच अतिक्रमणावर पथकाच्या माध्यमातून कारवाई करण्यात येत आहे. या धडक मोहिमेदरम्यान काही अतिक्रमणधारक स्वत:हून आपले अतिक्रमणे काढून घेत आहेत.शहरासह परिसरात वाढत्या अतिक्रमणामुळे वाहतूक कोंडी होत असल्याने मोहीम हाती घेण्यात आली आहे. येत्या काही दिवसांत कारवाई वेगाने करून रस्ते अतिक्रमणमुक्त करण्यात येतील.

- डॉ. योगेश म्हसे, महानगर आयुक्त, पीएमआरडीए

### कारवाईचा तपशील

**पुणे-नाशिक रस्ता :** रस्त्याचे एकूण अंतर - २६ किलोमीटर, कारवाईची संख्या - ७०२, कारवाईचे अंदाजित क्षेत्रफळ- ७०२०० चौरस फूट

**पुणे-सोलापूर रस्ता :** रस्त्याचे एकूण अंतर - २५ किलोमीटर, कारवाईची संख्या - ७७२, कारवाईचे अंदाजित क्षेत्रफळ - ७७२०० चौरस फूट,

**चांदणी चौक-पौड रस्ता :** रस्त्याचे एकूण अंतर - १६ किलोमीटर, कारवाई संख्या - ५१८, कारवाईचे अंदाजित क्षेत्रफळ - ५१८०० चौरस फूट

## दिल्ली गोवा एक्सप्रेसला मिळाला जेजुरी थांबा

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : पुणे कोल्हापूर लोहमार्गावरून धावणारी हजरत निजामुद्दीन गोवा एक्सप्रेस ही अति जलद धावणारी रेल्वे आता एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून जेजुरी रेल्वे स्थानकात अल्पवेळ थांबणार आहे, अशा प्रकारचे नियोजन रेल्वे प्रशासनातर्फे सुरू असल्याची माहिती मध्य रेल्वे विभाग व्यवस्थापक धर्मवीर मीना, पुणे विभाग व्यवस्थापक राजेश कुमार वर्मा, पुणे आरपीएफच्या प्रियंका शर्मा यांनी दिली . श्रीक्षेत्र जेजुरी येथील खंडोबाच्या देवदर्शनासाठी राज्यातील भाविकांबरोबरच इतर राज्यातून अनेक भाविक येतात परंतु रेल्वे स्थानकावर सर्व गाड्या थांबत नसल्याने भाविकांची गैरसोय होत होती.

## संक्षिप्त

### शिवनेरीच्या धडकेत एक ठार, दोन गंभीर

**जनप्रवास । प्रतिनिधी**

मुंबई : प्रभादेवी ब्रिजवर मध्यरात्री अडीच वाजताच्या सुमारास विरुद्ध दिशेनं देणाऱ्या शिवनेरी बसनं दुचाकीवरुन जाणाऱ्या तीन तरुणांना उडवलं. या अपघातात एका तरुणाचा मृत्यू झाला असून दोन जण गंभीर जखमी आहेत. मृत्यू झालेल्या तरुणाचं नाव प्रणय बोडके (२९) असून तो शरद पवारांच्या राष्ट्रवादी पक्षाच्या सोशल मीडिया विभागाचं काम पाहत होता.

या घटनेनंतर राष्ट्रवादीचे (श.प) प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनीही दु:ख व्यक्त करत प्रणय याला श्रद्धांजली वाहिली आहे. प्रणय बोडके , करण शिंदे आणि दुर्वेश गोरडे हे तिघजण स्कूटरवरुन परळ येथून दादरला होळीसाठी फुले आणण्यासाठी जात होते. यावेळी विरुद्ध दिशेनं भरधाव वेगात येणाऱ्या शिवनेरी बसने त्यांच्या स्कूटरला धडक दिली. यात प्रणय बोडके याचा केईएम रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला तर दुर्वेश आणि करण हे दोघेही गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर ग्लोबल रुग्णालयात उपचार सुरू आहेत. इकबाल शेख असे शिवनेरी चालकाचे असून अपघातानंतर तो पळून जाण्याच्या तयारीत असतानाच त्याला घटनास्थळाजवळ असलेल्या काही स्थानिकांनी पकडले. आरोपीला भोईवाडा पोलीस ठाण्यात नेऊन पोलिसांच्या ताब्यात दिलं आहे. पोलीस घटनेचा पुढील तपास करत आहेत.

### न्यायालयाचा कोरटकरला पुन्हा दिलासा

**जनप्रवास । प्रतिनिधी**

कोल्हापूर : इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत धमकी प्रकरण आणि छत्रपती संभाजी महाराज शिवाजी महाराज यांच्या आक्षेपार्ह विधानानंतरही कोल्हापूर जिल्हा सत्र न्यायालयाकडून प्रशांत कोरटकर याला पुन्हा एकदा अटकेपासून दिलासा मिळाला आहे. कोरटकर याला अटक होणार नसून १७ मार्च रोजी पुढील सुनावणी होणार आहे.

कोल्हापूर जिल्हा सत्र न्यायालयात त्यांनी हजर राहावे की नाही, याबाबत सुनावणी पार पडली. यावेळी न्यायालयाने हे निर्देश दिले आहेत. इंद्रजीत सावंत यांना धमकी देणाऱ्या प्रशांत कोरटकरला मंगळवारी मुंबई उच्च न्यायालयाने झटका दिला होता. तर उच्च न्यायालयाकडून कोल्हापूर जिल्हा सत्र न्यायालय देखील पहिल्या सुनावणी बाबत ताशेरे ओढले होते. दरम्यान, स्थानिक कोर्टात आमची बाजू ऐकून घेतली नाही. त्यामुळे दुपारी कोल्हापूर न्यायालयात होणाऱ्या सुनावणीत सरकारी पक्षाची बाजू ऐकून घेण्याची विनंती मुंबई उच्च न्यायालयात सरकारी वकिलांनी केली होती. त्यानुसार, सुनावणी झाली. जुना राजवाडा पोलीस ठाण्याने आणि राज्य सरकारकडून कोरटकर याचा अंतरिम जामीन रद्द करण्याची मागणी केली होती. त्यावर उच्च न्यायालयाने कोरटकरला दिलेला अंतरिम दिलासा आज संपतोय. त्यामुळे सत्र न्यायालयाचा आदेश रद्द करण्याची गरज नाही. असे स्पष्ट होते.

### उद्याचा अंक नाही

धुलिवंदन निमित्त दै.'जनप्रवास' कार्यालयास शुक्रवार दि.१४ मार्च २०२५ रोजी सुट्टी असल्याने शनिवार दि.१५ मार्चचा अंक प्रसिध्द होणार नाही, याची वाचक, विक्रेते, जाहिरातदार, हितचिंतकांनी नोंद घ्यावी.

- व्यवस्थापिका

# वीज होणार स्वस्त..पण महावितरणचा आर्थिक डोलारा वीजग्राहकांवरच अवलंबून!

वीज दिवसेंदिवस महाग होत जाणार या समजाला विराम देत यंदा प्रथमच महावितरणकडून येत्या पाच वर्षांसाठी वीजदर वाढीचा नव्हे, तर दर कमी करण्याचा प्रस्ताव दाखल करण्यात आला आहे. वीजग्राहकांना आर्थिक दिलासा देणाऱ्या अनेक वैशिष्ट्यांचा हा प्रस्ताव आहे. यात दरमहा १०० युनिट वीजवापर करणाऱ्या राज्यातील ७५ टक्के घरगुती वीजग्राहकांसाठी येत्या पाच वर्षांत २३ टक्के वीजदर कमी करण्यात येणार आहे. तर १०० ते ३०० युनिट वीज वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांसाठी पुढील वर्षाचा अपवाद वगळता त्यापुढे सलग चार वर्ष वीज दर १२ टक्क्यांनी कमी होणार आहे. सोबतच घरगुती ग्राहकांना टीओडी' मीटरच्या माध्यमातून सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंतच्या वीजवापरात प्रतियुनिट ८० ते १ रुपयांपर्यंत सवलत प्रस्तावित केली आहे. यासह उद्योगांवरील क्रॉस सबसिडीचा बोजा हटविण्यात येणार असल्याने वीजदर स्वस्त होत जाणार आहेत.

सन २०२५-२६ ते सन २०२९-३० पर्यंत बहुवार्षिक वीजदर निश्चितीकरणाच्या प्रस्तावातून वीजग्राहकांना आर्थिक दिलासा मिळणार आहे. तर दुसरीकडे सरकारच्या मालकीची कंपनी असलेल्या महावितरणला देखील वीजग्राहकांनी आर्थिक दिलासा देणे आवश्यक आहे. त्यासाठी वीजग्राहकांचे एकच आद्यकर्तव्य म्हणजे दरमहा नियमितपणे वीजबिलांचा भरणा करणे. महावितरणचा संपूर्ण आर्थिक डोलारा हा वीजबिलांच्या वसूलीवरच अवलंबून आहे. विजेशिवाय जगणे हा विचारच आजमितीस कोणी करु शकत नाही. २४ तास विजेची गरज आहे. त्यामुळे वीजबिल भरण्यास देखील अधिक प्राधान्य देणे अपेक्षित आहे.

ग्राहकांनी दरमहा वीजबिलांचा नियमित भरणा करणे का आवश्यक आहे तर मुख्य म्हणजे महावितरण स्वत: वीजनिर्मिती करीत नाही. विविध वीजनिर्मिती कंपन्यांकडून वीज खरेदी करून ती मागणीनुसार सर्व वर्गवारीतील ग्राहकांना पुरवठा करते. वीजपुरवठा व ग्राहकसेवा देणारी महावितरण कंपनी ही स्वत:च एक ग्राहक आहे. महावितरणतर्फे महानिर्मिती तसेच इतर खासगी वीजकंपन्यांकडून वीज खरेदी केली जाते. ही वीज उपकेंद्रांपर्यंत आणण्यासाठी महापारेषणला वहन आकार द्यावा लागतो. वीजबिलांमधील सुमारे ८० ते ८५ टक्के रक्कम ही वीजखरेदी,



पारेषण खर्च आदींवर खर्च होते. त्यानंतर कंत्राटदारांची देणी, नियमित व बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांचे वेतन, कार्यालयीन खर्च, विविध कर, दैनंदिन देखभाल व दुरुस्तीचे कामे आणि व्याजासह कर्जांचे हप्ते अशा दरमहा देणी द्यावी लागतात. या सर्वांचे पैसे वीजग्राहकांनी भरलेल्या वीजबिलांच्या रकमेतून दिले जातात.

महावितरण ही जनतेच्या मालकीची कंपनी आहे. त्यामुळे ना नफा, ना तोटा' (रेव्हेन्यू न्यूट्रल) तत्त्वाने वीजपुरवठा व ग्राहकसेवा देण्यात येते. परंतु एक ग्राहक म्हणून महावितरणवर वीजखरेदीचा, पारेषणचा खर्च तसेच विविध कर्ज व त्याच्या हप्त्यांचे कोट्यवधी रूपयांचे दायित्व आहे. मात्र वीजबिलांची थकबाकी वाढत आहे, ही वस्तुस्थिती आहे. महत्वाचे म्हणजे विजेचे दर निश्चित करण्याचा महावितरण किंवा अन्य कोणत्याही वीज कंपनीला अधिकार नाही. तर दाखल केलेल्या प्रस्तावांवर जनसुनावणी घेऊन मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडून वीजदर निश्चित केले जातात. सर्व घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक व इतर ग्राहकांनी वापरलेल्या विजेसाठी मा. आयोगाने निश्चित केलेल्या दराप्रमाणे महावितरणकडून बिलांची आकारणी केली जाते. मात्र वीजबिलांची थकबाकी वाढल्यास महावितरणला अनेक आर्थिक संकटांना सामोरे जावे लागते. एक समजून घेतले पाहिजे की, वीजबिल म्हणजे नागरिकांवर कोणत्याही प्रकारचा ठराविक किंवा निश्चित केलेला शासकीय किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांचा कर नाही. वीज बिल म्हणजे ग्राहकांनी प्रत्यक्षात वापरलेल्या विजेचे शुल्कच आहे. वीजजोडणी घेतलीच नाही तर वीजबिल किंवा विजेचे शुल्क भरण्याचा प्रश्नच नाही. तसेच वीजजोडणी घेतल्यानंतरही विजेचा वापर केला नाही तर केवळ स्थिर आकारच भरावा लागतो. त्यामुळे अत्यावश्यक असलेल्या विजेचा वापर ग्राहकांकडून झाल्यावरच त्यापोटी आलेले विजेचे शुल्क म्हणजेच वीजबिल आहे.

वीज आता एक मूलभूत गरज झालेली आहे. अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी देखील वीज महत्वाची आहे. घरातील टीव्ही, फ्रिज, मोबाईल, मुलांचे शिक्षण, नोकरदारांचे ऑनलाईन काम, घरातील उपकरणे इत्यादी सर्व विजेवरच अवलंबून आहेत. महिनाभर वीज वापरल्यानंतर बिलाचा दरमहा भरणा करणे अपेक्षीत आहे व आवश्यकही आहे. मात्र दुर्दैवाची बाब म्हणजे अतिशय मूलभूत गरज बनलेल्या विजेचे बील भरण्यास इतर खर्चाच्या तुलनेत फारसे प्राधान्य दिले जात नाही. त्यामुळे वीजबिलांची थकबाकी कमी होण्याऐवजी वाढतच आहे.

अनेक ग्राहकांना असेही वाटत असेल की, या महिन्याचे केवळ चारशे-पाचशे रुपयांचे वीजबिल आहे. पुढील महिन्यात भरू. पण चारशे-पाचशे रुपयांचे वीजबिल असलेले ग्राहक हजारोंच्या संख्येत असतात. त्यांनी बिल भरले नाहीतर थकबाकी कोट्यवधींच्या घरात जाते. पुणे परिमंडलात तब्बल ३८ लाख २५ हजार वीजग्राहक आहेत. मात्र महिन्याअखेर सरासरी ७ लाख १५ हजार घरगुती, व्यावसायिक व औद्रिक ग्राहकांकडे २०५ ते २१० कोटी रुपयांची सरासरी थकबाकी दिसून येते. यात घरगुती थकबाकीदारांची संख्या सर्वाधिक म्हणजे ६ लाखांवर आणि थकबाकी सुमारे १३५ कोटींवर असल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रामुख्याने घरगुतीसह इतर वीजग्राहकांनी वीज बिलांचा नियमित भरणा करून महावितरणला सहकार्य करण्याची खरी गरज आहे.

**– लेखक**

**निशिकांत राऊत, उपमुख्य जनसंपर्क अधिकारी, महावितरण, पुणे**

## अंतरंग



### अनुत्तीर्ण अडकले

शालेय स्तरावरील अत्यंत महत्वाच्या अशा दोन परीक्षा म्हणजे पाचवी आणि आठवी या दोन इयत्तांच्या परीक्षा होत. कारण या दोन्ही वर्गात विद्यार्थ्यांचा बौद्धिक व भावनिक स्तर बदलतो आणि म्हणून या दोन परीक्षा गांभीर्याने होणे गरजेचे असते पण शासनाच्या धोरणानुसार या दोन्ही परीक्षेत जरी विद्यार्थी अनुत्तीर्ण झाला असेल तरी त्याला ढकलत ढकलत दहावीपर्यंत न्यावा असेच आजवर चालू राहिलेले होते. त्यामुळे जो अक्षर न लिहिता येणारे मुले दहावीपर्यंत जात होती आणि याचा परिणाम म्हणून बारावीच्या परीक्षेत अनुत्तीर्ण होण्याचा प्रमाण वाढत राहिले. पण आता केंद्र सरकारच्या धोरणनुसार यात बदल होत आहे. ही निश्चितच शिक्षण क्षेत्राचा हुरूप वाढविणारी बाब होणारी आहे. आता नव्या धोरणानुसार या दोन्ही वर्गातील विद्यार्थी जर अनुत्तीर्ण झाले; तर दोन महिन्यांनी त्यांची पुन्हा परीक्षा घ्यावी व त्या परीक्षेत तो जर अनुत्तीर्ण झाला तर त्याला त्याच वर्षात बसू द्यावे व त्याने त्याच वर्षांचा वर्षभर अभ्यास करून पुन्हा परीक्षा द्यावी असा हा निर्णय आहे.


शैक्षणिक हिताच्या दृष्टीने हा एक महत्वाचा निर्णय आहे. खरे तर शालेय शिक्षणाच्या एकूण अभ्यासक्रम पद्धती प्रत्येक शिक्षकाच्या वाट्याला येत असलेल्या तासिका याबाबत नेहमीच चर्चा होत आल्या आहेत. या विद्यार्थ्यांच्याकडून पुरेसा आणि समाधानकारक वेळ मिळत नाही अशी तक्रार अनेक शिक्षण करीत असतात. कारण या दोन वर्गातील विषय हे भावी शिक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहेत. प्रामुख्याने भाषा, गणित आणि विज्ञान हे तीन विषय या वर्गांना जाणकार आणि अनुभवी शिक्षकांनी शिकवावेत अशी अपेक्षा आहे. तसे काही शाळांतून वर्षभराचे वेळापत्रक करताना तरतूद ही केली जाते. विद्यार्थ्यांच्या वयानुसार विद्यार्थ्यांचा विषयबाबतचा आकलन गट निश्चित होत असतो.

काही काही विद्यार्थी हे विषय सहजपणे पचवितात तर शैक्षणिक दृष्ट्या फारशी गती नसलेले विद्यार्थी मागे पडत असतात असा हा पूर्वानुभव आहे. पालकांना आपले पाल्य पुढच्या वर्गात जाणे एवढेच महत्वाचे वाटत असते. ते पुढच्या वर्गात कसे गेले याची चौकशी पालक कधी करत नसतात. त्यामुळे आजपर्यंत अशा सुमार विद्यार्थ्यांनाही पाचवीतून सहावीत आणि आठवीतून नववीत घालविले जात होते आणि पालक माझे लेकरू उत्तीर्ण झाले म्हणून आनंद व्यक्त करीत असत आता असे होणार नाही. ज्या विद्यार्थ्यांना भाषा, शास्त्र गणित समाधानकारक प्रगती दाखविता येणार नाही ते विद्यार्थी आता त्याच वजर्गात बसतील हे निश्चित झाले आहे. पुन्हा त्याला याच पाठ्यपुस्तकांचा अभ्यास करावा लागणार आहे. एकूणच सरसकट विद्यार्थी उत्तीर्ण करणे हे धोरण कोणत्याही काळात हिताचे असत नाही. कारण यातून परीक्षेचे आणि एकूण शिक्षणाचे गांभीर्यच कमी होते. विद्यार्थ्याला विषयाची आणि विषयाच्या गोडी लागणे आणि त्यातून त्याचा बौद्धिक व भावनिक स्तर उंचावणे हे यामुळे होत नसे. जेव्हा शिक्षणाधिकारी शाळांना भेट देऊन वर्गात प्रश्न विचारत असत त्यावेळी विद्यार्थी साध्या साध्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकत नाही हे यापूर्वी अनुभवयाला आले आहे आणि याबाबतची अनेक उदाहरणे वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाली आहेत. एकूणच या विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचा आवाका वाढावा असे धोरण पूर्वी पुरेशा गांभीर्याने आखले गेले नसावे त्यामुळे मातृभाषा मराठी असलेले विद्यार्थीसुद्धा प्रत्यक्ष मराठी विषयात अनुत्तीर्ण होत असल्याचे कटु वास्तव समोर येत गेले यातून या विद्यार्थ्यांचे हसे होत असल्याचे दिसून येत होते आणि त्यांचा न्यूनगंडही समोर येत होता. याबाबतही यापूर्वी काही काही शाळांनी वेगवेगळे शैक्षणिक प्रयोग करून पाहिले आहेत आणि त्याचे अहवाल शिक्षण खात्याकडे पाठविलेले आहेत. आता केंद्र शासनाने आणि केंद्रशासनाच्या शिक्षण खात्याने नवे धोरण जाहीर केले आहे ते या सर्वांवर समाधानकारक शैक्षणिक उपाय म्हणून उचित ठरेल, असे मानण्यास हरकत नाही. आता जो विद्यार्थी या दोन्ही वर्गात अनुत्तीर्ण होणार ते खाली बसणार आणि पालकांच्या दृष्टीने महत्वाची गोष्ट म्हणजे त्याच्या आयुष्यातील म्हणजे एक शैक्षणिक वर्ष वाया जाणार. कदाचित असे वर्ष वाया जाणे हीच त्याच्या दृष्टीने त्याच्या भविष्यातील शैक्षणिक यशाची पायाभूत बाब होऊ शकेल. म्हणून या निर्णयाचे शैक्षणिक क्षेत्रातून स्वागत होत आहे कारण दर्जेदार आणि अव्वल दर्जाच्या शिक्षणाकरिता आर्थिक सवलती मिळाव्यात पण शिक्षण सवलत नसावी.

## चर्चा



अभिनेते नाना पाटेकर नुकतेच इस्लामपुरात एका कार्यक्रमासाठी आले होते. तेथे त्यांनी अभिनेते आणि नेत्यांच्या भूमिका तसेच अभिनयावरून भाष्य केलं. अर्थात अभिनेत्यांचा अभिनय हा फक्त स्टेजवर आणि दिखाव्यापुरता असतो. पण नेत्यांचा अभिनय आणि त्यांचं खोटं बोलणं, दिलेले वचन न पाळणं आणि त्याची तमाही न बाळगणं हे खरोखरीच वाखणण्याजोगं आहे. कुणी त्याला निर्लज्जपणा म्हटलं तरी नेत्यांना त्याचा काही फरक पडत नाही. सध्याच्या राजकारणात चाललेलं रोजचं नाटक आणि त्याचा अंक जनतेला उबग आणणारा ठरू लागला आहे. पण राजकारणाचा धंदा मांडलेल्या राजकारण्याना त्याचं काही देणं घेणं नाही. उलट काहीवेळेला चुकीची कबुली दिली



जाते. आता शिंदेंचे सेना फोडणे, मुख्यमंत्रीपदाचे गुऱ्हाळ एकीकडे वादाचा विषय आहे, तर दुसरीकडे शिंदेंनी महिलांना १५०० रुपये देणे, एसटी बसेसची ५० टक्के सवलत अडचणीची ठरत असल्याचे त्यांचेच मंत्री कबुली देतात, पण शिंदे मात्र आम्ही बहिणींना लाभ देणारच म्हणत कात्रीही लावू लागलेत. याबाबत पारावरची चर्चा...!

**पांडूनाना** : आरं त्या शिंद्यांचं शिवशेना फोडन्याचं कौतिक किती दिस आयकायचं? आता तुमी योग्य केलं का वाईट याचं जनतेला काय देनं घेनं?

**बाबूराव** : व्हय, आरं पन तेच ते गुऱ्हाळ सुरूच हाय. आता बग न्हवं. शिंद्यास्नी मुक्यमंतरी कराया ठाकऱ्यांनी ईरोद केला आन् आपन खुरचीवं बसल्याचा आरोप करत्यात. म्हाईकास आगाडीत तवा म्हनं आजितदादासकट समद्यांचा इरोद नव्हता.

**पांडूनाना** : व्हय आन् शिंद्यास्नी मुक्यमंतरी केलं आसतं तर शिवशेना फुटली नसती.

**बाबूराव** : आरं त्यांचं काय मनावं घ्यायचं? आजितदादा, भुजबळ, तटकरे, वळशेपाटील, कांगरेसचं पृथवीराज चव्हान, आशोक चव्हान, बाळासायब थोरातापासनं समद्यांनी शिंद्यास्नी स्वीकारलं आसतं?

**पांडूनाना** : भुजबळसायब मातुर खरं बोललं भाद्दर.

**बाबूराव** : म्हजे शिंद्यास्नी फकस्त मुक्यमंतरीपदाचा इंटरेस्ट हुता हे ते आन् बाशिदं कबुल करत्यात म्हन.

**पांडूनाना** : ते जावू दे, आरं बग न्हवं, हिकडं भनीस्नी २१०० रुपये देतो म्हटलं आन् १२ लाख भनीस्नी आता नाकारलं. आता भनी, ज्येष्टांनी एशटीची सवलत आवगड झाल्याचं मंतरी यशवंत जादव म्हंत्यात.

**बाबूराव** : न्यायालयानंच शिक्षामोरतब केलंयाच न्हवं. मोपतमदनं लोकं आळशी आन् तिजोरी रिकामी हुतीया.

**पांडूनाना** : तरीबी शिंदे म्हंत्यात आमी देणारच.

**बाबूराव** : ते नाना पाटेकर म्हटलं ते खरंच हाय.

**पांडूनाना** : राजकारन्यांचं रोज नवं नाटक. जनतेच्या डोस्क्याभाईरचं हायती. आपुन फकस्त बगायचं, ते त्यानास्नी हावं ते करनारच.

## पंचांग

विक्रम संवत्- २०८१ फाल्गुन शके संवत्- १९४६
संवत्सर - क्रोधीनाम अयन- उत्तरायण मास- फाल्गुन
ऋतु- सौर वसंत शुक्ल पक्ष तिथि:चतुर्दशी १०:३६:१०
नक्षत्र:पूर्वाफाल्गुनी ३०:१९:२२+ योग:धृति १३:०२:२५
करण:वणिज १०:३६:१० करण:विष्टि २३:२७:२९ सूर्य:कुम्भ चन्द्र:सिंह
हिजरी सन् - १४४६ मुस्लिम मास -रमजान तारीख - १२
विशेष हुताशनी पौर्णिमा होळी पारशी आबान मासारंभ दत्त महाराज कविश्वर पुण्यतिथी - पुणे पौर्णिमा प्रारंभ सकाळी १०.३५

## राशी भविष्य...

**मेष** : नवीन योजना अंमलात आणाल. परिवारात वातावरण चांगले राहील. आर्थिक स्थिती चांगली. जास्तीची आशा ठेवू नका. धंद्यात लाभ होईल. कामाची सुरुवात चांगली होईल. काही शुभकार्ये पार पडतील. यामधून एखादी जबाबदारी शिरावरून उतरू शकाल.

**वृषभ** : आपली बुद्धीवादी समस्या सुटेल. सुख समृद्धी वाढेल. हलगर्जीपणाची कामे टाळा. घाई गडबडीने कामे करू नका.आर्थिक फायद्याच्या काही चांगल्या बातम्या हाती घेऊन नववर्षात पदार्पण कराल.

**मिथून** : वाद-विवाद, भांडण तंटे होण्याची शक्यता. धंद्यात लक्ष द्या. वेळीच लक्ष न दिल्यास नुकसान होवू शकते. अभ्यासाची आवड लागेल. घरात एखादी मौल्यवान वस्तूची खरेदी विशेष उत्साह आणणारी ठरेल.

**कर्क** : व्यावसायिक जबाबदारी व्यवस्थित पार पाडा. प्रवास सुखाचा होईल. आर्थिक स्थिती उत्तम राहील. कुटुंबियांकडून सहकार्य मिळेल. उत्पन्नात वाढ होईल.

**सिंह** : व्यवहारात अडचणी येतील. परेशानी व धावपळ वाढेल. परिश्रमाच्या मानाने त्याचे फळ कमी मिळेल. खर्चात कपात करावी. मुलांना व्यवहारात जास्तीचे कष्ट करावे लागतील.

**कन्या** : आर्थिक कामे पूर्ण होतील. परिवाराकडून सहकार्य मिळेल. काही नवीन योजना हाती घ्याल. रागावर नियंत्रण ठेवा. मोठे व्यवहार करताना एकदम धोका पत्करू नका. वारसा हक्काचे प्रश्न थोड्या सबुरीने सोडवा.

**तूळ** : मित्र व हितचिंतकांच्या भेटी होतील आईची तब्येत ठिक राहील. गृहोपयोगी वस्तू खरेदी करण्याचा योग, उद्योग धंदा चांगला चालेल. संततीच्या दृष्टीने एखादी चांगली बातमी आपला उत्साह वाढविणारी ठरेल.

**वृश्चिक** : परिवाराच्या मदतीने पुढे जाल. व्यावसायिक कार्यात फायदा होण्याची शक्यता. वेळ वाया घालू नका. जीवन साथीदारांचे पक्के आश्वासन तर बेकारांना नोकरीची खात्री यातून नववर्षाच्या उज्ज्वल पहाटेचे स्वागत करता येईल.

**धनू** : वरिष्ठ लोकांमध्ये प्रतिष्ठा वाढेल. चातुर्याने काम केल्यास यश निश्चित. नवीन संपत्ती जमविण्याचा योग. व्यसनापासून दूर रहा. एखाद्या चांगल्या बौद्धिक चर्चेने वर्षाची सुरुवात होईल. आपली पक्की असलेली मते प्रभाव टाकतील.

**मकर** : चातुर्याने काम केल्यामुळे वरिष्ठांकडून प्रशंसा मिळेल. आर्थिक लाभ होण्याची शक्यता. अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका. कौटुंबिक परिवाराकडून सहकार्य मिळेल.

**कुंभ** : व्यावसायिक अथवा जीवनातील समस्या वाढण्याची शक्यता. कौटुंबिक चिंता सुटेल. विद्यार्थ्यांसाठी परीक्षेत यश मिळेल. दळणवळण विभागातील लोकांना आपले महत्व वाढविता येईल.

**मीन** : आवक-जावक वाढेल. थांबलेली कामे चलाखीमुळे पूर्ण होतील. यश, प्रतिष्ठा वाढेल. जबाबदारीचे काम सांभाळून करा. जीवनसाथीच्या व्यवहारात सुधारणा होईल. केलेल्या कामाचे चांगले फळ मिळेल.

## पारावरचा फड



विधानसभा निवडणुकीच्या यशानंतर वर्षानुवर्षे रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अर्थात महापालिका, जिल्हा परिषद, नगरपालिकांच्या निवडणुका मार्गी लागतील अशी अपेक्षा होती. अर्थात ओबीसी आरक्षणाचा न्यायप्रविष्ट वाद ही त्यात मोठी अडसर आहे. आज २८ जानेवारीला लांबलेल्या सुनावणीत त्याचा फैसला होईल अशी अपेक्षा होती. पण पुन्हा सुनावणी महिनाभर लांबणीवर गेली आहे. त्यामुळे या संधीसाठी आस लावून बसलेल्या आजी-माजी, नव्हे सर्वच संस्थांमध्ये बॉडी अस्तित्वात नसलयने सर्वजण माजीच आहेत. अशा माजी व भावी नगरसेवक, सदस्यांच्या आशेवर पाणी फिरले आहे. यासंदर्भात यासंदर्भात पारावरची चर्चा...!

**पांडूनाना** : ईधानसबेच्या यशानंतर म्हायुतीवालं काय बी करून मुन्शिपाल्टी, झेडपी आन् कारपोरेशनच्या इलेक्शान मार्गी लावत्याल आसं वाटलं हुतं. पण कुटलं काय आन् फाटक्यात पाय.

**बाबूराव** : आरं येवडा वैतागतुयास का?

**पांडूनाना** : न्हाय तर काय, बग न्हवं? ह्या बड्या नेत्यांचं समदं पार पडलं. आता दुसऱ्या-तिसऱ्या फळीतलं नगरशेवक, झेडपी सदस्य आन् त्यातनं कारभारी हुन्याच्या आशा लावून हायती. हिकडं इलेक्शानचा माहुल म्हनून हौशी कार्यकरतं आस लावून हायती. त्यांना काय संदीच मिळंना.

**बाबूराव** : आरं चालायचं, आन् ह्यातनं सरकारी बाबू मातुर खुश आसत्याल. कारन ह्यांची कुनाची ढवळाढवळ न्हाय. समदं काय आसंल ते नेतं आन् परशासन ह्यांच्यातच ठरतंया.

**पांडूनाना** : ते खराय तुजं. पन कार्यकरतं बी जगली पाह्यजेत. त्यांची दुकानं चालली पाह्यजेत ह्याचं नेत्यास्नी काय नसंल का? पन न्यायालयाचं काय त्यांच्या हातात हाय का?

**बाबूराव** : ही ईरोदक म्हंत्यात, समदंच सत्ताधारी मॅनेज करत्याती, मग त्याबाबत काय हुनार न्हाय का?

**पांडूनाना** : सुनावनी म्होरं गेली त्यात ते काय करनार?

**बाबूराव** : आरं आशानं आता इलेक्शान पावसाळ्याआगुदर व्हायचं काय चित्र दिसत न्हाय.

**पांडूनाना** : खराय तुजं. पन ह्यातनं एक बरं झालंया बग. ज्ये वरसानुवरसं राजकारन ह्योच धंदा करत हुतं ते आता दोन-चार वरसाच्या गॅपनं कामधंद्याला लागलं.

**बाबूराव** : व्हय, ह्यातली आगुदर दुसऱ्याच्या नावानं ठेकं घ्यायची. आता लाबारथी नसल्यानं थेट ठेकं घ्याय लागली. ज्याला हे जमत न्हाय ती मातुर बाद झाली.

**पांडूनाना** : व्हय, पन ह्यातनं लोकाची कामं होत न्हायती त्याचं काय?

**बाबूराव** : आरं कोन आसलं काय आन् न्हाय काय, शहरं हाय तशीच ऱ्हानार हायती, फक्त दुकानदारी बंद.

## उपदेश कथा



**देशप्रेम**

स्वामी विवेकानंदांच्या मनात भारताविषयी भक्ती होती. या देशाच्या उद्धाराचा विचार सदैव त्यांच्या अंत:करणात चालू असे. अमेरिका आणि अन्य पाश्चात्य देशांचा दौरा आटोपून स्वामीजी पुन्हा भारतात यावयास निघाले तेव्हा एका ब्रिटिश मित्राने त्यांना विचारले, आपण गेली चार वर्षे पाश्चात्य जगातील ऐश्वर्यसंपन्न, नेत्रदीपक, शक्तीमान असं आयुष्य अनुभवलं. आता आपल्याला भारतात परत जाताना कसं वाटतं? स्वामीजी म्हणाले, मी येण्यापूर्वी भारतावर माझं खूप प्रेम होतं आता तर भारतातील धुळीचाही प्रत्येक कण, तिथली हवा मला पवित्र वाटत आहे. ती भूमी आता अधिकच पवित्र वाटत आहे.' संन्याशाला असे एखाद्या विशिष्ट देशाविषयी ममत्व का वाटावे ? असा प्रश्न त्यांच्या ब्रिटिश मित्राने विचारला असता स्वामीजी म्हणाले की, 'जो स्वदेशावर प्रेम करू शकत नाही, तो विश्व कसे कवेत घेणार? आधी देशप्रेम नि मगच विश्वबंधुत्व!

**कथा उपदेश : जो आपल्या मायदेशावर प्रेम करतो. त्यालाच विश्वबंधुत्व साध्य होते.**

---------------------------------------------------------------

पं. मदनमोहन मालवीय हे काशीचे कर्मठ ब्राह्मण. स्नानसंध्या, पूजा-अर्चा यात कधी कसूर करत नसत त्यामुळे होई काय, आगगाडी वेळेवर पकडण्याचे 'पातक' त्यांच्याकडून होत नसे! एकदा मालवीयजी धापा टाकीत स्थानकावर पोहचले नि गाडी सुटणार एवढ्यात कसाबसा त्यांनी डबा गाठला पण तिकिट काढायचे गडबडीत राहून गेले. अलाहाबाद या स्थानकावर उतरून त्यांनी तिकिट तपासनिसांना आपली अडचण सांगितली. त्याने सांगितले, 'आम्ही तुम्हाला ओळखतो. तुम्ही खुशाल बाहेर पडा !' पण या गोष्टीला त्यांची सदसद्विवेकबुद्धी राजी होईना. ते म्हणाले, 'तुम्ही माझ्याकडून तिकिटाचे पैसे घ्या' तपासनीस म्हणाला, 'तुम्हाला मग भुर्दंडही भरावा लागेल!' त्यालाही मालवायजी तयार नव्हते. शेवटी त्यांनी चिरंजीवांना तिकीट खिडकीवर पाठवून अलाहाबाद ते बनारसचे तिकीट आणवले नि तपासनिसांसमोर त्याचे तुकडे केले व मगच ते बाहेर पडले!

**कथा उपदेश** : फुकट प्रवास करू नये.

### राजकारणातील गुन्हेगारीकरण थांबावे

राजकारण म्हंटले की तिथे कोणताही विषय वर्ज नाही. मग गुन्हेगारीकरण ही त्यात आले. मात्र सध्या गुन्हेगारीचे अति उदात्तीकरण राजकारणात सुरू आहे. राज्याच्या निर्मितीपासून गुन्हेगार हे राजकारणात प्रवेशित झाल्याचे दाखले आहेत. तर काही नामांकित नेते हे देखील गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले सध्या पहावयास मिळत आहेत. दाऊद हा राज्याच्या राजकारणाचा एक भाग असल्यासारखेच झाले आहे. मध्ये अंजली दमानिया यांनी दाऊद यांचे एका नेत्याशी संबंध असल्याचा आरोप केला होता. तर दुसरीकडे राज्यातील एका बड्या नेत्याचे दाऊदशी संबंध असल्याचे वृत्त सतत झळकत असते. तसाच प्रकार आता बीड जिल्ह्यात पहावसाय मिळत आहे. त्यामुळे राजकारणात गुन्हेगारांचा शिरकाव होताना दिसतो आहे. प्रत्येक राजकीय नेता अशी गुंडांची फौज जोपासताना दिसतो आहे. मग सुसंस्कृत राजकारण कसे होणार. साम, दाम, दंड, भेद हे राजकारणाची चतु:सूत्री असली तरी गुंडांचा अतिरेक हे राज्याच्या लौकिकास शोभणारे नाही. त्यामुळे राजकारणातील गुन्हेगारीकरणास आळा बसावा किंवा ते थांबावे. परंतु राज्यात काही प्रकरणे अशी घडत आहेत की गुन्हेगारांशिवाय राजकारण शक्यच नाही असा प्रघात खुल्या सभेत जाहीररीत्या कबूल केला जातो. याला अटकाव गरजेचा आहे.

## जन की बात...



### कीर्तनाचा व्यवसाय नको...

प्राचीन काळापासून देशास किंबहुना राज्यास कीर्तनाची मोठी परंपरा आहे. कीर्तन याचा अर्थ किर म्हणजे वाईट तण म्हणजे गवत शेतातील हाणीकारक गवत काढून टाकणे म्हणजे कीर्तन. याचाच मनुष्य जीवनातील कीर वाईट तण म्हणजे विचार काढून टाकणे असा होतो. पूर्वी ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, सोपानदेव, निवृत्तीनाथ, गाडगेमहाराज, रामदास यांनी समाजातून काहीही अपेक्षा न ठेवता समाजकल्याण हेच आपल्या जीवनाचे अंतिम ध्येय समजून लोकांना मार्गदर्शन केले. मात्र सध्याचे महाराज हे विशिष्ट एक रक्कम घेतल्याखेरजी कीर्तन करत नाहीत. कीर्तनाची सुरुवात वास्तविक जनजागृती करण्याकरिता झाली. मात्र आताचे कीर्तनकार बिदागीशिवाय जागृती करण्यास तयार होत नाही हे कीर्तन पंरपरेला गालबोट आहे. दोन तासासाठी किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीसाठी किंवा वेळ वाढेल तसे रक्कम वाढण्याचे सांगून हे कीर्तनकार कसले समाज प्रबोधन करणार हा प्रश्न आहे. केवळ पैशासाठी मांडलेला बाजार आता थांबायला हवा. त्याकरिता आता युवा किंवा नवोदित कीर्तनकारांनी समाजातील वाईट विचार दूर करण्यासाठी निरपेक्ष वृत्तीने कीर्तन करण्यास पुढाकार घ्यावा, असा विचार रूढ होताना दिसतो आहे. कीर्तनात यापूर्वी जातीय व्यवस्था किंवा समाजातील विषमेवर भाष्य केले जात होते. मात्र आज रोजी स्त्रियांवर होणारे राजरोसपणे होणारे अत्याचार वाढत चाललेल्या बालगुन्हेगारीचा आलेख तसेच आरक्षण यासारखे समाजासाठी उपयुक्त प्रश्न मांडता येतात. त्यामुळे समाजाचे कल्याण होईल. मात्र आजचे कीर्तनकार यात धन्यता न मानता मानधनावर त्यांचे लक्ष आहे. तर दुसरीकड समाजमाध्यमांवर कीर्तन ऐकण्याचे प्रकार सुद्धा यामुळे वाढीस लागले आहेत. त्यामुळे कीर्तनकारांनी दक्षिणो ऐवजी प्रबोधन करावे.




### भरधाव वाहनांना रोख हवा..

राज्यात दिवसेंदिवस भरधाव वाहनांनी नागरिकांना चिरडल्याच्या घटनांत वाढ होताना दिसते आहे. यापूर्वी वर्षाकाठी एखादी अशी दुर्घटना घडताना दिसत होती. मात्र यंदा पुण्यातील पोर्शे कार दुर्घटनेनंतर सततच वाहनांनी निष्पापांना चिरडण्याचे प्रकार वाढीस लागले आहे. सलमान खान याचे हिट अँड रन प्रकरण अजूनही विस्मरणातून जात नसताना पुण्यात पोर्शे कारने थरार उडवून दिला. तर नुकतेच मुंबईत पदपथावर झोपलेल्या नागरिकांना एका भरधाव वाहनाने चिरडले यात सात जणांचा हकनाक बळी गेला. वास्तविक शासनाने यावर आता कठोर निर्बंध आणावेत. रात्रीच्यावेळी हायवेवर अशा वाहनांची वेग मर्यादा मर्यादित रहावी, याकरिता कोणतीतरी नियमावली करता येते का किंवा एखादी नवी प्रणाली वापरता येते का याचे तज्ज्ञांकडून समजावून घ्यावे. तसेच नागरिकांनीही रस्त्याच्या बाजूला झोपण्याचे टाळावे. मुंबई, पुण्यानंतर हे लोण आता निमशहरी भागात सुद्धा पसरले असून सर्रास भरधाव गाडीने नागरिकांना चिरडले जात आहे. असे प्रकार थांबायला हवेत. तर महामंडळाने बस चालक ठेवताना काळजी घ्यायला हवी. कारण पुण्यातील संतोष माने प्रकरण किंवा मुंबईतील मोरे चालकाचे प्रकरण सध्या ताजेच आहे. त्यामुळे हिट अँड रनसाठी सतर्कता गरजेची आहे.

# राहुरी येथे सावित्रीबाई फुले विद्यालयात नैसर्गिक रंग निर्मिती कार्यशाळा

■ जनप्रवास प्रतिनिधी

राहुरी : सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयात हरित सेनेच्या वतीने नैसर्गिक रंग निर्मिती कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत विद्यार्थिनींनी विविध फुलांपासून व भाज्यांपासून पर्यावरणपूरक रंग तयार करण्याची प्रक्रिया शिकली.



विद्यार्थिनींनी पालक भाजीपासून हिरवा रंग, पळसाच्या फुलांपासून केसरी रंग, बीटापासून जांभळा रंग, झेंडूच्या फुलांपासून लाल रंग, गुलाबाच्या फुलांपासून गुलाबी रंग तयार केले. कार्यशाळेदरम्यान विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण तुपविहीरे यांनी रासायनिक रंगांच्या दुष्परिणामांवर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, रासायनिक रंगांमधील घातक घटकांमुळे त्वचा व डोळ्यांचे विकार, श्वसनास त्रास, तसेच गंभीर आजार उद्भवू शकतात. विशेषत: काळ्या रंगातील ऑक्साईडमुळे मूत्रशयाचे विकार होऊ शकतात, तर चंदेरी रंगातील ॲल्युमिनियम ब्रोमाइड त्वचेसाठी अत्यंत घातक आहे, ज्यामुळे कॅन्सरसारख्या रोगांचा धोका वाढतो. मात्र, नैसर्गिक रंगांनी कोणताही अपाय होत नाही.

या कार्यशाळेत इयत्ता नववीतील विद्यार्थिनींनी नैसर्गिक रंग तयार करून प्रात्यक्षिक सादर केले. सहभागी विद्यार्थिनींमध्ये मिसबा शेख, श्रद्धा तोडमल, तेजस्विनी देवकर, श्रावणी गाडे, शर्वरी जावळे, आम्रपाली पारडे, तनुश्री डोईफोडे यांचा समावेश होता. कार्यक्रमाला विद्यालयाचे पर्यवेक्षक मनोज बाबा, हरित सेना सचिव तुकाराम जाधव, संतोष जाधव, प्रकाश शिंदे, सविता गव्हाणे, संदीप कुंभारे, हलीम शेख यांची उपस्थिती होती. नैसर्गिक रंगांच्या प्रचार व प्रसारासाठी अशा कार्यशाळा महत्त्वाच्या ठरतात, असेही यावेळी उपस्थितांनी सांगितले.

# कोल्ह्याचे पिल्लू आईच्या कुशीत विसावले : वनविभागाची माहिती

■ जनप्रवास वार्ताहर

नारायणगाव : नारायणगाव येथील दत्तात्रय पाटे यांच्या उसाच्या शेतात ऊसतोड चालू असताना रविवारी दि ९ रोजी सकाळी कोल्ह्याचे नवजात दोन दिवसांचे पिल्लू ऊसतोड मजुरांना आढळून आले होते दरम्यान या पिल्लाला येथील शेतकरी लक्ष्मण उर्फ अंबादास वाजगे राजेंद्र वाजगे यांच्या घरी दिवसभर ठेवल्यानंतर सतत तीन दिवस रात्री ज्या ठिकाणी सापडले त्या ठिकाणी ठेवण्यात आले होते.

अखेर तिसऱ्या दिवशी म्हणजेच मंगळवार दिनांक अकरा रोजी रात्री नऊ ते बुधवारी सकाळी सात वाजण्याच्या दरम्यान या कोल्ह्याच्या पिल्लाला त्याच्या आईने नेले असण्याची शक्यता वन विभागाचे वनक्षेत्रपाल प्रदीप चव्हाण व वनरक्षक ज्ञानेश्वर पवार यांनी वर्तवली अशाप्रकारे तीन दिवसांच्या अथक व अविरत परिश्रमानंतर कोल्हयाच्या पिल्लाची व त्याच्या आईची भेट घडवण्यास वनविभागाचे कर्मचारी यशस्वी ठरले आहे.



# मीडिया मॉनिटरिंग खासगी संस्थेकडे देण्याच्या सरकारच्या निर्णयाला विरोध

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे वतीने तिव्र आंदोलन करणार - जिल्हाध्यक्ष दत्ता गाडगे

■ जनप्रवास प्रतिनिधी

पारनेर : राज्य सरकारने वृत्तवाहिन्या, वृत्तपत्रे आणि डिजिटल माध्यमांवरील बातम्यांचे संकलन व विश्लेषण करण्याचे काम खासगी संस्थेला देण्याचा निर्णय घेतल्याने तसेच हा निर्णय पत्रकारितेच्या मूलभूत तत्त्वांना आणि लोकशाही मूल्यांना बाधा आणणारा असून, माध्यम स्वातंत्र्यावर गंभीर आघात करणारा असल्याचे मत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष दत्ता गाडगे यांनी अहिल्यानगर येथे बोलताना व्यक्त केले.




आज दि.१२ मार्च रोजी सकाळी १२ वाजता पारनेर तहसील कार्यालयावर आणि दूपारी २ वाजता अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयामधे पत्रकारांसह जात त्यांना या संदर्भातील निवेदन देण्यात आले.

पत्रकारितेचा मुख्य हेतू जनतेपर्यंत सत्य व वस्तुनिष्ठ माहिती पोहोचवणे हा आहे. मात्र, सरकारकडून या कामासाठी खासगी संस्था नेमण्याचा निर्णय घेतल्यामुळे बातम्यांवर अप्रत्यक्ष सेन्सॉरशिप लादली जाण्याचा धोका आहे. हा निर्णय सरकारविरोधी मतप्रवाह दडपण्याचा आणि प्रसारमाध्यमांवर आपला अंकुश ठेवण्याचा प्रयत्न असल्याचे दिसते.देशाच्या लोकशाही मूल्यांचे रक्षण करण्यासाठी आणि पत्रकारितेच्या स्वतंत्र भूमिकेचे संरक्षण करण्यासाठी आम्ही महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई,अहिल्यानगर जिल्ह्याचे वतीने सरकारच्या या निर्णयाला तीव्र विरोध करत असल्याचे सांगीतले. १२ मार्च रोजी महाराष्ट्राचे संवेदशील आणि अभिव्यक्ति स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते आणि राज्याचे माजी मुख्यमंत्री स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या जयंती निमित्त महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई तर्फे राज्यव्यापी लेखणीबंद आंदोलन व निदर्शने करण्याचे ठरवले असून आपणास या निवेदनाद्वे पुन्हा एकदा आमच्या मागण्या सरकार दरबारी ठेवण्यास अवगत करत आहोत. पुढील ८ दिवसांत आमच्या मागण्या मान्य न झाल्यास आम्ही मंत्रालयाबाहेर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलने करु असा इशारा देत आहोत.

याप्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अहील्यानगर जिल्हाध्यक्ष दत्ता गाडगे,उपाध्यक्ष विनोद गायकवाड,तालुका सचिव संतोष कोरडे,सह सचिव ॲड्. सोमनाथ गोपाळे,उपाध्यक्ष वसंत रांधवण,उपाध्यक्ष श्रीनिवास शिंदे,तालुका खजिनदार नितीन परंडवाल,इलेक्ट्रॉनिक्स मिडीया प्रमुख महेश शिंगोटे आदींसह पत्रकार बांधव मोठ्या संखेने उपस्थित होते.

# प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी घेतला वनभोजन सहलीचा आनंद



■ जनप्रवास वार्ताहर

पुणतांबा : चांगदेवनगर येथील जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी वनभोजन सहलीचे आयोजन कवठीचा मळा येथे शेतमळ्यात करण्यात आले. विद्यार्थ्यांनी पायी प्रवास करून शैक्षणिक सहलीचा अनुभव घेतला. या सहलीत चांगदेवनगर आणि जाधव वस्तीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

विद्यार्थ्यांना शेतमळ्यात निसर्गाच्या सान्निध्यात आनंद मिळाला. सोपान पाटील बा धनवटे , गंगाधर धनवटे , सोपानराव धनवटे , वंदना धनवटे , विजय धनवटे संदेश यमाजी धनवटे, तसेच संतोष धनवटे, वैभव धनवटे, नामदेव धनवटे, आप्पासो धनवटे, ज्ञानेश्वर धनवटे, चांगदेव धनवटे, सुधाकर शिंदे, भगवान हरेर, मंदा जाधव, अशोक दत्तात्रेय धनवटे, अमोल डोखे, छाया सोपान धनवटे, पूजा धनवटे आदी उपस्थित होते. सहलीच्या प्रारंभी जागतिक महिला दिनानिमित्त उपस्थित महिलांसह ज्येष्ठ मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

विद्यार्थ्यांना परिसर, शेती, वृक्ष, पशुपक्षी, वाडी-वस्ती, मानवी जीवन आणि निसर्ग याबद्दल शिक्षकांनी माहिती दिली. यानंतर विद्यार्थ्यांसाठी विविध खेळ आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांना सोपान धनवटे यांनी भोजनाची व्यवस्था केली होती शिक्षक दिनेश जाधव, तुकाराम डोखे, दीपक कुलकर्णी, गणेश अंत्रे, गोविंद जाधव, प्राजक्ता मून, कानिफनाथ बनकर, श्रीमती खैरे मॅडम, कराटे प्रशिक्षक अशोक शिंदे आणि मिलिंद हे उपस्थित होते.

# मेहेर इंग्लिश स्कूल च्या पथनाट्यातून अनिष्ट विचारांची होळी

## स्त्री भ्रूणहत्या,महिला अत्याचार थांबवा पथनाट्यातून सामाजिक संदेश जीवनात नकारात्मकता व अनिष्ट विचार टाळावे : अनुरीता झगडे

■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : हिंदसेवा मंडळाच्या मेहेर इंग्लिश स्कूल तर्फे होळी चा सण अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला.दिल्लीगेट येथे मेहेर इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी पथनाट्य सादर केले.या पथनाट्याद्वारे "अनिष्ट विचारांची होळी" करण्यात आली.या पथनाट्यातून सामाजिक संदेश देण्यात आले.महिलावरील अत्याचार, बलात्कार थांबवा,हुंडा देणे घेणे बंद करा,स्त्री भ्रूणहत्या थांबवा, स्त्री जन्माचे स्वागत करा,देश भ्रष्टाचारमुक्त करा,कचरा रस्त्यावर टाकू नका,भुत,मंत्र, जादुटोणा या गोष्टी करु नका, महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदला,नवस करणे बंद करा, शिक्षणाचा व्यवसाय बंद करा, अन्न वाया घालवणे,नकारात्मक विचार काढून सकारात्मक विचार ठेवा,मोबाईल मुळे बालपणी हरवलेले खेळ,दुसऱ्याला हिणवणे,इतरांची तुलना आपल्या पाल्या सोबत करु नका,स्पर्धा करु नका अशा सर्व अनिष्ट विचारांची होळी पथनाट्यातून मेहेर इंग्लिश स्कूलच्या शिक्षिका व विद्यार्थ्यांनी केली.




# पाणी पुरवठा सुरळीत न झाल्यास आयुक्तांच्या दालनात ठिय्या आंदोलन करणार - अविनाश घुले

■ जनप्रवास प्रतिनिधी

नगर : सध्या उन्हाळ्याची तीव्रता जाणवत असून, त्यामुळे शहरात पाण्याचा प्रश्न गंभिर झाला आहे. विशेषत: प्रभाग क्र.११ मध्ये गेल्या अनेक दिवसांपासून पाणी पुरवठा कमी दाबाने व अपुर्या प्रमाणात होत आहे. तरी मनपाने येत्या चार दिवसात या भागातील पाणी पुरवठा सुरळीत करावा, अन्यथा प्रभागातील नागरिकांसह आयुक्तांच्या दालनात ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशारा मनपा माजी स्थायी समिती सभापती अविनाश घुले यांनी दिला आहे. .

यावेळी बोलताना अविनाश घुले यांनी प्रभाग ११ मधील पाण्याची वस्तूस्थिती मांडतांना सांगितले, गेल्या काही दिवसापासून प्रभाग ११ मधील पूनममोती नगर ,पार्श्वनाथ कॉलनी ,जेन पार्क ,चेतन्य कॉलनी ,नवजीवन कॉलनी ,अरिहंत कॉलनी ,विदयासागर कॉलनी ,आशीर्वाद कॉलनी



,कानडे मळा परिसर ,चोधरी नगर ,कोंबडी वाला मळा ,हातमपुरा परिसर ,कोठी परिसर ,वृन्दावन कॉलनी ,गंज बाजार परिसर,धरती चोक परिसर ,पारशा खुंट परिसर आदिं भागात पाणी पुरवठ्याबाबत विस्कळीतपणा आलेला आहे. त्यामुळे नागरिकांचे मोठ्या प्रमाणात हाल होत आहे.

प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होतांना दिसत आहे. पाणी पुरवठ्याचे नियोजनाच्या आभावामुळे नागरिकांचे पाण्यामुळे हाल होत आहेत. तरी तातडीने यात सुधारणा व्हावी, अन्यथा नागरिकांसह आंदोलनाशिवाय पर्याय राहणार नाही, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगेत कंटेनर सह २१ लाखाचे पार्सल जळून खाक, कर्डे येथील घटना

■ जनप्रवास प्रतिनिधी

कारेगाव : कंपनीतून पार्सल माल भरुन कोईमतूर येथे चालेल्या कंटेनरने शिरुर चौफुला रस्त्यावर कर्डे गावाजवळ रस्त्याच्या कडेला असलेल्या इलेक्ट्रीक पोलला धडक दिल्याने झालेल्या अपघातात कंटेनरचे डिझेल सांडून लागलेल्या आगीत कंटेनर व कंटेनर मधील पार्सल जळून खाक झाले असुन. एकूण २१ लाखाचे नूकसान झाले आहे .

याबाबत कंटेनर चालकाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासंदर्भात हेमंत दिलीप वानखेडे वय ३५ वर्षे, व्यवसाय वायरमन रा बाबुराव नगर, शिरूर ता. शिरूर, जि. पुणे यांनी कंटेनर चालक कुप्पुरवामी आर. रामलिंगम रा. ईराबड़ी राको गाव ता. बोप्पीरेपटटी जि. धर्मापुरी राज्य तमिळनाडू यांच्या विरोधात फिर्याद दिली आहे.

९ मार्च २०२५ रोजी सायंकाळी पावणे चारच्या सुमारास करडे, ता. शिरूर येथे हा अपघात झाला असुन. कंटेनर वरील चालक कुप्पुरवामी आर. रामलिंगम याच्या कडील कंटेनर क्र. एन. ५२ ए.ए. १२२७ सेफ एक्स्प्रेस प्रा. लि. रांजणगाव गणपती ता. शिरूर जि. पुणे या कंपनीतून पार्सल माल भरला व हे पार्सल रांजणगाव, कारेगाव, न्हावरा फाटा, चौफुला मार्गे कोईमतुर कडे घेवून जात असताना करडे गावचे पुढे भारत पेट्रोल पंप पास करून पुढे चौफुल्याकडे जात असताना वाहनचालकाने रोडच्या कडेला असलेल्या इलेक्ट्रीक पोलला जोरात धडक दिल्याने झालेल्या अपघात इलेक्ट्रीक पोलवरील तारांचे घर्षण होऊन त्याच्या ठिणग्या खाली पडून जमिनी वरील गवतावर पडल्याने गवत जळाले तसेच कटेनरमधील डीझेल खाली सांडून कंटेनरला आग लागली व कंटेनर व त्यातील संपुर्ण पार्सल माल जळुन गेला व सुमारे २१ लाखाचे नूकसान झाले आहे.

ईलेक्ट्रीक पोल व तारांचे तुटुन अंदाजे तीस हजार रूपयाचे नुकसान झाले आहे.

याबाबत आधिक तपास पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार बनकर करत आहेत .

# शरदचंद्र पवार महाविद्यालयात वार्षिक दिन आणि बक्षीस वितरण संपन्न

■ जनप्रवास प्रतिनिधी

ओतूर : श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शरदचंद्र पवार कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालय ओतूर ( डुंबरवाडी ) ता.जुन्नर वार्षिक दिन व बक्षीस वितरण समारंभ ११ मार्च रोजी संपन्न झाला.

दि.३ मार्च पासून ते दि.११ मार्च पर्यंत महाविद्यालयातर्फे अनेक क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्या सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये- रांगोळी,सांस्कृतिक दिवस, सारी डे, कॅरेक्टर डे, गँग डे, हॅलोवीण डे, ब्लॅक अँड व्हाईट डे, गायन ,नृत्य, फॅशन शो, फन फेअर खाद्यपदार्थांचे स्टॉल. तसेच क्रीडा स्पर्धांमध्ये - क्रिकेट, बुद्धिबळ, व्हॉलीबॉल, कॅरम, बॅडमिंटन, थ्रो बॉल अशा अनेक स्पर्धांचे आयोजन केले होते. "विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी सर्व कार्यक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेऊन उपक्रम मोठ्या उत्साहात पार पाडले. या उपक्रमांमध्ये विशेष कामगिरी पार पाडणाऱ्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. विद्यार्थी गुणगौरव, कर्मचारी सन्मान, जिमखाना समिती सन्मान असे अनेक पुरस्कारांचे वितरण या वेळी करण्यात आले असून,अभ्यासक्रमासोबतच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी अनेक क्रीडा व सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात येतात "अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश दामा यांनी दिली.



विद्यार्थ्यांनी औषध निर्माण शास्त्र अभ्यासक्रमात इतके पारंगत व्हावे की औद्योगिक ,शैक्षणिक, संशोधन, मेडिकल सारखे कोणतेही क्षेत्र असो त्या क्षेत्रामध्ये सर्वोत्तम स्थानावर त्यांना गौरविण्यात यावे असे प्रतिपादन कार्यक्रमाचे प्रमुख उपस्थिती म्हणून लाभलेले अध्यक्ष आणि प्रमुख अधिकारी उल्हास धुप्पड फार्मास्युटिकल डेव्हलपमेंट ग्लेनमार्क फार्मास्युटिकल मालेगाव सिन्नर यांनी केले. औषध निर्माण शास्त्रातील विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल आहे फक्त त्यांच्यामध्ये कष्ट करण्याची क्षमता व संयम हवा असे प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले व्हॉइस प्रेसिडेंट फॉर्मुलेशन डेव्हलपमेंट ग्लेनमार्क फार्मास्युटिकलचे डॉ.नितीन देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले.डॉ.रमेश काकड डायरेक्टर ऑफ शरदचंद्र पवार इन्स्टीटयूट मॅनेजमेंट यांनी देखील विद्यार्थ्यांना अभिनंदन पर शुभेच्छा प्रदान केल्या.

एम.जी.एम युनिव्हर्सिटी छत्रपती संभाजी नगर विद्यापीठाकडून नुकतीच डॉक्टरेट पदवी मिळवणाऱ्या डॉ. सुशील पालीवाल यांचा देखील सन्मान करण्यात आला.

महाविद्यालयातील कर्मचारी सन्मान सोहळा देखील या ठिकाणी पार पडला त्यामध्ये सर्वोत्तम कामगिरी बजावणारे शिक्षक वर्गामधून पदवी डॉ अस्मिता गायकवाड आणि प्रोफेसर वृषभ हुप्परगे, डिप्लोमा फार्मसी मधून प्रोफेसर सोहम घोडके यांना सन्मानित करण्यात आले. शिक्षकेतर कर्मचारी वर्गामधून उत्कृष्ट ग्रंथपाल सुवर्णा माडगूळकर मॅडम ,उत्कृष्ट बस चालक प्रवीण मिंडे यांना गौरविण्यात आले अशी माहिती सांस्कृतिक कार्यक्रम अधिकारी डॉ. शितल बिडकर यांनी दिली.

कार्यक्रमादरम्यान ट्रेनिंग आणि प्लेसमेंट ऑफिसर डॉ. वैशाली अडसरे यांनी ट्रेनिंग आणि प्लेसमेंट ब्राउजर २०२४-२५ चे प्रकाशन व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते केले.

कार्यक्रमादरम्यान जिमखाना जनरल सेक्रेटरी आर्यन देशमुख, कल्चरल सेक्रेटरी तन्या हांडे व त्यांचे संपूर्ण सहकारी यांनादेखील सन्मानित करण्यात आले होते.

संस्थेचे अध्यक्ष विशाल तांबे व मानद सचिव वैभव तांबे यांनी

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.सदर कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी डॉ. सुमित जोशी,प्रो.अश्विनी गावडे, प्रो संतोष कर्पे,प्रो. प्रणाली दांगट, प्रो.निशिगंधा जाधव, प्रो ऋतुजा कोकणे, प्रो.अजिंक्य दिघे.डॉ.किरण महाजन,डॉ. अभिषेक मेहेर, प्रो पुलाटे, प्रो कुटे, प्रो मत्ते, प्रो भोसले,प्रो राऊत, प्रो.चैताली, प्रो.पाटे, सौ.अर्चना डुंबरे,वैभव फापाळे, सुनील फापाळे आदींनी अथक परिश्रम घेतले.

## संक्षीप्त वृत्त

### शिवसेनेच्या वतीने स्व. अनिल राठोड यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

#### जनतेच्या सेवेसाठी महापालिकेवर पुन्हा एकदा भगवा फडकविण्याचा शिवसैनिकांचा निर्धार




■ जनप्रवास : प्रतिनिधी

नगर : शिवसेनेच्या वतीने माजी मंत्री स्व. अनिल राठोड यांच्या ७५ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. मंगलगेट येथील शिवसेनेच्या संपर्क कार्यालयात झालेल्या अभिवादन कार्यक्रमात स्व. अनिल राठोड अमर रहे! च्या घोषणा देण्यात आल्या. या अभिवादन कार्यक्रमाप्रसंगी जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, शहर प्रमुख सचिन जाधव, दिलीप सातपुते, संभाजी कदम, माजी नगरसेवक बाळासाहेब बोराटे, गणेश कवडे, दत्ता जाधव, प्रशांत गायकवाड, दत्ता कावरे, संजय शेंडगे, आप्पा नळकांडे, सुनील लालबोंद्रे, पै. महेश लोंढे, परेश लोखंडे, सलोनी शिंदे, शोभा चव्हाण, अनिता बहुले, सुरेश तिवारी, घनश्याम घोलप, पोपट पाथरे, पांडुरंग घोरपडे, नंदू बेद्रे, रवींद्र लालबोंद्रे, रवींद्र घोरपडे, शिवबा चव्हाण आदींसह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### १२ एप्रिल हनुमान जन्मोत्सवापर्यंत सामूहिक हनुमान चालीसा पठण

■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : श्रीरामभक्त हनुमान सत्संग मंडळातर्फे वार्षिक अनुष्ठान ३१ दिवसीय महाहनुमान चालीसा होळी पौर्णिमा ते हनुमान जन्मोत्सवापर्यंत चालणार्या सामूहिक हनुमान चालीसा पठण व भजन संध्या कार्यक्रम दररोज रात्री ८ ते १०:३० या वेळेत नगर शहरांत विवीध ठिकाणी अत्यंत भक्तीभावाने सुरू होणार असुन सर्व अहिल्यानगर शहरवासीयांनी या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे अवाहन श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळाच्यावतीने करण्यात आले.

श्रीरामभक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्ट श्रीराम मंदिर नवीपेठ यांच्यावतीने ३१ दिवसीय कार्यक्रम गेल्या १८ वर्षापासून करण्यात येत आहे. गुरूवार दि.१३ मार्च २०२५ होळी पौर्णिमा या दिवशी श्रीराम मंदिर नविपेठ येथुन रात्री ८ वाजता शुभारंभ होईल व १२ एप्रिल २०२५ हनुमान जन्मोत्सव या दिवशी समारोप होईल. दरम्यान या ३१ दिवसीय होणार्या कार्यक्रमांची भाविकांना माहिती मिळावी यासाठी शहरातील प्रत्येक प्रमुख मंदिरात माहिती फलक लावण्यात आले आहे.

### आफीया आरिफ सय्यदचा पहिला रोजा संपन्न



■ जनप्रवास प्रतिनिधी

जामखेड : आफीया आरिफ सय्यद (वय वर्षे ७) जामखेड .जि अहिल्यानगर या चिमुकलीने पवित्र रमजानचा जीवनातील पहिला रोजा नूकताच पूर्ण केला. आई, वडील, आजी, आजोबा, मामा, मावशी आदि नातेवाईकांकडुन कौतुक केले जात आहे.

### यवत महामार्गालगत अतिक्रमणावर पीएमआरडीए ची कारवाई




■ जनप्रवास प्रतिनिधी

यवत : दि१३ मार्च रोजी पुणे–सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील कासुर्डी टोलनाका ते यवत दरम्यानच्या अतिक्रमणांवर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण बांधकाम विभाग व पीएमआरडीए विभागाने संयुक्त कारवाई केली.महामार्गावर असणारी अनधिकृत अतिक्रमणे जेसीबी आणि क्रेनच्या सहाय्याने जमीनदोस्त करण्यात आली. कुठलीही कल्पना न देता अचानक कारवाई झाल्याने अतिक्रमणधारक व अतिक्रमण कारवाईस आलेल्या अधिकारी यांच्यात किरकोळ शाब्दिक चकमकी यावेळी पाहायला मिळाल्या.अतिक्रमण काढण्यासाठी यवत पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. कासुर्डी येथून अतिक्रमणाची कारवाई यवतकडे येत असल्याची माहिती यवत येथील अतिक्रमण धारकांना मिळतात त्यांनी तात्काळ आपापल्या जागेसमोरील अतिक्रमणे काढण्यास सुरुवात केली परंतु अनेकांची दुकाने या कारवाईत पाडण्यात आली आहेत. अतिक्रमण कारवाई करत असताना अधिकाऱ्यांनी तारांकित हॉटेलधारकांच्या अतिक्रमण बाबत विशेष व्हीव्हीआयपी सेवा दिली असल्याचे दिसून आले.सरसकट अतिक्रमण कारवाई न करता केवळ गोरगरीब व्यवसायिकांच्या दुकानांवर कारवाई झाल्याचे यावेळी स्पष्ट दिसून आले यामुळे अतिक्रमणधारक रोष व्यक्त करत असल्याचे दिसून आले.अनेक वर्षांपासून महामार्गलगत असणारी दुकाने पडल्याने अनेकांच्या संसाराचा कणा मोडला आहे.दुकाने पडल्याने अनेकांचे आर्थिक नुकसान झाले आहे.व्यवसाय कुठे व कसा करायचा हा मोठा प्रश्न कासुर्डी व यवत येथील अतिक्रमण धारकांसमोर उभा राहिला आहे.

# अखेर. .पारनेर शहर बीट चौकी कार्यान्वित !

## दैनिक जनप्रवास इफेक्ट

■ जनप्रवास प्रतिनिधी

पारनेर : गेल्या काही महिन्या पासून पारनेर शहरातील बसस्थानक चौकात अवैध ऑनलाईन जुगार, मटका, गांजा, गुटखा विक्री, बसस्थानक परिसरात कॉलेज मधील विद्यार्थ्यांची फ्री स्टाईल हाणामारी, या सर्व पार्श्वभूमीवर पोलिसांचा कायमचा वचक निर्माण व्हावा म्हणून पारनेर पोलीस ठाण्याच्या अंतर्गत पारनेर शहर बीट चौकी तयार करण्यात आली. या चौकीचे मागील काही दिवसापूर्वी शहराच्या सुरक्षिततेसाठी बीट चौकीचे उद्घाटन करण्यात आले होते. मात्र दोन दिवसच हि चौकी सुरू होती. त्या नंतर मात्र या चौकीला अचानक कुलूप लावण्यात आले होते . या प्रश्नाबाबत दैनिक जनप्रवास मध्ये पोलीस प्रशासनाचे लक्ष वेधून घेण्यात आले होते.या बातमीची दखल घेऊन पारनेर शहर बीट चौकी कार्यान्वित करण्यात आली आहे.त्या बद्दल पारनेर शहरातील नागरिक दैनिक जनप्रवासचे सर्वत्र आभार मानत आहेत.

पारनेर शहरातील बसस्थानक चौकात अरुंद रस्त्यामुळे कायमच वाहतुकीची कोंडी होत असल्याचे दिसून येत आहे त्या मुळे आता वाहतुकीचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे.त्यातच आता ज्या ठिकाणी शहर बीट चौकी करण्यात आली आहे. त्या परिसरात ऑनलाईन बिंगो, मटका,जुगार,पत्ते राजरोस पने चालू आहेत त्या वर सुद्धा परिणाम होणार आहे.तर याच रुष यांची कायमच वर्दळ असते. या गांजा पिणाऱ्या व्यक्ती समोरून जायला महिला कचरत असतात. पण नाईलाजास्थ्व कामा निमित्त जावे लागते. तर या चौकीच्या समोर काही अंतरावरच एका बिल्डिंग मध्ये बाजार तळाच्या बाजूला राजरोस ऑनलाईन लॉटरी बिंगो मटका जुगार सुरू आहे.




बसस्थानक वर कायमच कॉलेजचा विद्यार्थ्यांचा या ना त्या कारणावरून फ्री स्टाईल हाणामारी सुरू असतात. त्यातच आता शहर व परिसरात चोऱ्यांचे प्रमाण वाढत चालले आहे. राहुलनगर, संभाजीनगर, लोणी रोड, जामगाव रोड, पारनेर शहर यांच्या सुरक्षेसाठी या पोलीस बीट चौकीची फार गरज आहे.

पोलीस बीट चौकी सुरू झाल्याने परिसरातील नागरिकांना आनंद झाला आहे. बंद पोलीस चौकी कार्यान्वित झाल्याने परिसरातील अवैध धंदे वर कारवाई होऊ शकते.

# रूईछत्रपती येथील ढासी केटीवेअरचे काम निकृष्ट दर्जाचे

## ठेकेदाराची ग्रामस्थांना अरेरावी, कामाची चौकशी करावी - ग्रामस्थांची मागणी

■ जनप्रवास प्रतिनिधी

पारनेर : दुष्काळी तालुका म्हणून ओळख असलेल्या पारनेर तालुक्यात वाहून जाणारे पाणी अडविण्यासाठी कोट्यवधीचे कामे सध्या चालू आहेत, मात्र यावर ना प्रशासनाचे लक्ष आहे ना गाव कारभारी यांचे, ग्रामस्थांनी तक्रार केली तर शासकीय अधिकारी जुमानत नाहीत तर ठेकेदार इतके पोहोचले आहेत की तक्रार करताल तर याद राखा असा दमच देऊ लागले असल्याने हा कोट्यवधींचा निधी पाण्यात जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, पारनेर तालुक्यातील रूईछत्रपती येथील हंगा नदीवर ढास वस्तीलगत लाखो रुपये खर्च करून केटीवेअर बांधला जात आहे. केटीवेअरचे सुरुवातीपासूनच काम अतिशय निकृष्ट दर्जाचे सुरू आहे. संबंधित ठेकेदाराने चक्क पाण्यात स्टिल रोवून काम उरकण्याचा प्रताप केला असून स्टिल कमी वापरणे, सिमेंट कमी वापरले जात असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली. यावर ठेकेदाराने माझ्या मर्जीनुसार काम होईल तुम्ही कामावर येऊन फोटो काढले आणि कामगारांनी तुम्हाला मारले तर मी जबाबदार नाही असा दमच ठेकेदार ग्रामस्थांना देत आहे.

सतत दुष्काळाशी सामना करावा लागत असलेल्या पारनेर तालुक्यात पावसाळ्यात हंगा नदी पात्रातून मोठ्या प्रमाणात पाणी वाहून जाते. हे पाणी जाग्यावर आडवून ठेवल्यास त्याचा शेतकऱ्यांना फायदा होईल. यासाठी केटिवेअर होणे गरजेचे होते. अशी मागणी गेली अनेक वर्षांपासून ग्रामस्थ करत होते. यासाठी निधी ही मिळाला मात्र हे कामच अतिशय निकृष्ट दर्जाचे होत असून याकामाची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी अशी मागणी सुहास वाबळे यांनी केली आहे.

# बीडच्या मस्साजोग नंतर शिरूर श्रीगोंदा यांच्या शिवेवरही घडला निर्घुण खून...

## तरुणाचे शीर धडा वेगळे दोन हात एक पाय तोडले तर एक पाय अर्धवट तोडला

■ जनप्रवास प्रतिनिधी

जांबूत : शिरूर तालुका श्रीगोंदा तालुक्याचे शिवेवर दाणेवाडी ता. श्रीगोंदा या ठिकाणी १८ ते २२ वयाच्या अनोळखी तरुणा चा मृतदेह विहिरी मध्ये आढळून आला आहे. या मृत देहाचे शीर दोन हात व एक पाय नसल्याचे दिसून आले आहे. तर एक पाय कापण्याचा प्रयत्न केला असल्याच्या खुणा ही आढळून आले आहे. यामुळे शिरूर व श्रीगोंदा तालुक्यात खळबळ उडाली आहे.

हा मृतदेह शिरूर येथून दाणेवाडी येथील महाविद्यालयीन तरुणाचा असल्याचा संशय त्यांच्या नातेवाईकांनी व्यक्त केला आहे. जीवाचा थरका उडवणारा मृतदेह पाहून अनेकांच्या जीवाची घबराट उडाली. मृतदेहाचे शीर दोन्ही हात व पाय सापडलेला नाही.



नक्की हा मृत्यू देह कोणाचा याबाबत शंका कुशंका सुरू असली तरी दानेवाडी ता श्रीगोंदा येथील माऊली सतिश गव्हाणे हा १९ वर्षीय महाविद्यालयीन तरुण ७ मार्च २५पासून बेपत्ता असल्याचे त्याचे चुलते परशुराम गव्हाणे यांनी सांगितले याबाबतची मिसिंगची फिर्याची त्याचा भाऊ अविनाश सतीश गव्हाणे यांनी शिरूर पोलीस स्टेशन येथे दिली आहे. परंतु हा मृत देह नक्की त्याचा का आणखी कोणाचा याबाबत आज तरी शंका आहे.

शिरूर पोलीस स्टेशन येथे आज मिसिंग तरुणाचे कुटुंबीय व नातेवाईक यांनी शिरूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांची भेट घेतली असून, दाणेवाडी येथे सापडलेला मृत्यू देह हा त्यांच्यात मुलाचा असू शकतो परंतु मृतदेहाचे शीर, दोन्ही हात, उजवा एक पाय नसलेला , डावा पाय अर्धा तुटलेला अवस्थेत सापडल्याने कुटुंबही द्विधा मनस्थिती मध्ये आहे.. मिसिंग फिर्यादी बाबत चौकशी सुरू असून सीसी टीव्ही कॅमेरे जमा करण्याचे काम सुरू आहे. दाणेवाडी येथील मृतदेह बाबत माहिती गोळा करण्याचे काम आहे सुरू असून, शिरूर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण गुन्हे अन्वेषण विभाग, श्रीगोंदा पोलीस, अहिल्यानगर गुन्हे अन्वेषण विभाग पदके तपासासाठी रवाना झाली आहे.

# जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिलांना प्रमाणपत्र वाटप

## बँक ऑफ बडोदा मांडवगण फराटा शाखेच्या वतीने महिलांना मोफत प्रशिक्षण

■ जनप्रवास प्रतिनिधी

मांडवगण फराटा : नागरगावं ११-०३-२०२५ , रोजी पापड, लोणचे मसाले यांचे प्रशिक्षण प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. त्यामध्ये प्रथम क्रमांक ७६% चैताली घाटे.

द्वितीय क्रमांक ७५ %सुप्रिया फराटे. तृतीय क्रमांक कल्याणी फराटे ७१% असे नंबर काढण्यात आले.

या सर्व महिलांचे नंबर व यांना प्रमाणपत्र वाटप जागतिक महिला दिनाचे औचित्य साधुन करण्यात आले तर या कार्यक्रमाचे आयोजन हे मांडवगण फराटा येथील अस्मिता भवन येथे करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला महिलांची मोठी उपस्थिती होती. तसेच पापड लोणचे मसाले असे अनेक उपयुक्त जीवनावश्यक पदार्थ हे महिला आपल्या आर्थिक गरजा भागवण्यासाठी बनवतात व त्यापासून आपल्या कुटुंबाला आर्थिक हातभार लागतो त्यामुळे आपल्या कुटुंबाची आर्थिक प्रगती सुधारते व जीवनमान उंचावते असे उद्योग व व्यवसाय महिलांनी करण्यासाठीं त्यांना मार्गदर्शन देण्याचे काम हे बँक ऑफ बडोदा मांडवगण फराटा शाखेच्या वतीने मोफत प्रशिक्षण तसेच उमेद अभियान बचत गटांना केले जाते त्यामुळे यामध्ये महिलांना जागृत करून त्यांची आर्थिक उन्नती साधली जाते. होतकरू महिला व जागृत महिला या बचत गटामार्फत प्रशिक्षण यशस्वीपणे पार पाडतात व त्यांना प्रशिक्षण देऊन महिलांचे नंबर काढले जातात.हा कार्यक्रम यशस्वीपणे मांडवगण फराटा येथील अस्मिता भवन येथे पार पडला . याप्रसंगी मांडवगण फराटा सीआरपी स्वाती महाडिक व तसेच सीआरपी शोभा वेदपाठक यांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.नंतर यशस्वी महिलांचे अभिनंदन करत पुढीलप्रमाणे वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या व त्यांचा सन्मान करण्यात आला त्यानंतर कार्यक्रमात सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता झाली.



# शहा वीज उपकेंद्रातून चासनळी वीज उपकेंद्राच्या लिंक लाईनचे काम पूर्ण : आ.आशुतोष काळे

■ जनप्रवास तालुका प्रतिनिधी

कोपरगाव : सिन्नर तालुक्यातील शहा येथे उभारण्यात आलेल्या १३२ के. व्ही. वीज उपकेंद्रातून चासनळी वीज उपकेंद्राला जोडण्याचे लिंक लाईनचे काम पूर्ण झाले असून लवकरच चासनळी वीज उपकेंद्राला शहा वीज उपकेंद्रातून वीज पुरवठा लवकरच सुरु होणार असल्याची माहिती आ.आशुतोष काळे यांनी दिली आहे.

माजी आमदार अशोकराव काळे व आमदार माणिकराव कोकाटे यांनी त्यांच्या कार्यकाळात कोपरगाव तालुक्यातील पश्चिम भागाच्या गावातील तसेच सिन्नर तालुक्याच्या पूर्व भागातील शेतकऱ्यांच्या विजेच्या समस्या सोडविण्यासाठी १३२ केव्ही वीज उपकेंद्र मंजूर करून आणले होते. हे वीज उपकेंद्र कोपरगाव मतदार संघातच उभारले जाणार होते परंतु ते सिन्नर तालुक्यातील शहा येथे उभारण्यात आले. कृषी मंत्री ना. माणिकराव कोकाटे व आ.आशुतोष काळे यांनी संयुक्तपणे या वीज उपकेंद्राच्या कामाला चालना दिल्यामुळे हे शहा येथील १३२ के.व्ही. वीज उपकेंद्र कार्यान्वित झाले होते. तेव्हापासून या वीज उपकेंद्रावरून कोपरगाव मतदार संघातील कोळपेवाडी, पोहेगाव, चासनळी वीज उपकेंद्र १३२ के. व्ही. उपकेंद्राला जलद गतीने जोडा अशा सूचना आ.आशुतोष काळे यांनी कार्यकारी अभियंता थोरात यांना जानेवारी महिन्यात दिल्या होत्या. तेव्हापासून शहा येथील १३२ के.व्ही. वीज उपकेंद्रावरून चासनळी लिंक लाईनचे काम शीघ्र गतीने सुरु असल्यामुळे शहा उपकेंद्रातून ३३/११ केव्ही चासनळी उपकेंद्रापर्यंत १७ कि.मी. वाहिनीचे काम पूर्ण असून लवकरच चासनळी वीज उपकेंद्राला शहा वीज उपकेंद्रातून वीज पुरवठा सुरु होणार आहे. कोपरगाव उपकेंद्राचा भार कमी झाल्यामुळे कोपरगाव तालुक्याचा देखील वीजपुरवठा सुरळीत होणार असल्यामुळे चासनळी उपकेंद्रावरून वीजपुरवठा होणाऱ्या चास हंडेवांडी कारवाडी व परिसरातील गावातील शेतकरी, व्यावसायिक व घरगुती वीज ग्राहकांनी आ.आशुतोष काळे यांचे आभार मानले आहे.



# 'प्लास्टिक मुक्ती'साठी सरसावले सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालय

■ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : 'प्लास्टिकमुक्त सिंहगड रोड' अभियानासाठी क्षेत्रीय कार्यालयाचे अधिकारी आणि कर्मचारी सरसावले आहेत. प्लास्टिकच्या बाटल्याऐवजी मातीच्या भांड्याचा वापर करावा, असे आवाहन प्रशासनाने नागरिकांना केले आहे. जी बी एस च्या उद्रेका नंतर पालिका कर्मचाऱ्यांनी कठोर पावले उचलली असून वेग वेगळे उपक्रम राबवले जात आहेत. नागरिकांचे मोठ्या प्रमाणात प्रबोधन केले जात आहे.

सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्यांवर यापुढे कडक कारवाई करण्यात येणार आहे. तसेच सीसीटीव्ही फुटेजच्या अधारे कचरा टाकणाऱ्यांचा २४ तासांच्या आत शोध घेऊन त्यांच्यावर महाराष्ट्र महापालिका अधिनियम कायद्यानुसार कारवाई करण्यात येणार आहे. सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयात आयोजित केलेल्या मोहल्ला कमिटीच्या बैठकीत सहायक आयुक्त नामदेव भजवळकर यांनी ही माहिती दिली. या वेळी विविध विभागांच्या अधिकाऱ्यांसह सत्तरहुन अधिक नागरिक उपस्थित खडकवासला धरणाखालील खडकवासला, होते. किरकटवाडी, नांदेड, धायरी आदी गावांचा समावेश झाल्यापासून परिसरात कचऱ्याची समस्या गंभीर झाली आहे. यात प्लास्टिक कचऱ्याचा समावेश जास्त आहे. त्यामुळे सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाने 'प्लास्टिकमुक्त सिंहगड रोड अभियान सुरू केल्याचे भजबळकर यांनी या वेळी सांगितले.

# पाणीचोरी करणाऱ्या पाटस टोल प्लाझाच्या ठेकेदाराला अजून अभय का ?

## पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी आर्थिक वाटाघाटी करून सोडून दिल्याची चर्चा

■ जनप्रवास प्रतिनिधी

पाटस : येथील टोल प्लाझाच्या पुणे – सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील झाडांची देखभाल करणाऱ्या ठेकेदाराने काही दिवसांपूर्वी खडकवासला कालव्यातून पाणी चोरी करूनही अद्याप पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्याला पाठीशी घालत कोणतीच कारवाई केली नाही याबद्दल शेतकऱ्यांमध्ये नाराजी पसरली आहे.



पुणे – सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील टोल प्लाझाच्या झाडांची देखभाल करणाऱ्या ठेकेदाराने गुरुवारी (दि. ६) खडकवासला कालव्यातून पाणी चोरी केली होती. यावेळी पाटबंधारे विभागाचे पाटसचे शाखा अभियंता उत्कर्ष पाटील यांनी त्याला रंगेहात पकडले होते. मात्र एक फोन आला आणि पाटील यांनी त्या ठेकेदारावर कोणतीही कारवाई न करता त्याला सोडून दिले. यासंदर्भात सहाय्यक अभियंता सुहास साळुंखे यांना विचारले असता त्यांनी उत्कर्ष पाटील यांना ठेकेदारावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यास सांगितले आहे असे उत्तर दिले होते. आजअखेर या घटनेला आठवडा उलटूनही पाटबंधारे विभागाकडून ठेकेदारावर कोणतीच कारवाई झाली नसल्याने शेतकरी वर्गात नाराजी पसरली आहे. शेतीसाठी मोटार पंप लावून पाणी घेतल्यावर शेतकऱ्यांना गुन्हे दाखल करून नाहक त्रास देणारे पाटबंधारे विभाग ठेकेदाराला मात्र पाठीशी घालत आहे. ठेकेदाराकडून दररोज हजारो लिटर पाणी चोरून महिन्याकाठी लाखोंची बिले काढली जात आहेत. गरीब शेतकरी मात्र पाण्याअभावी पिकं जळून उत्पन्न घटल्याने कर्जबाजारी होत आहे. पाटबंधारे विभाग आणि पाटस टोल प्लाझाचा ठेकेदार यांच्या 'अर्थपूर्ण' संबंधामुळे हा पाणीचोरीचा खेळ खुलेआम सुरू असून या सर्व प्रकाराला राजकीय आश्रय असल्यानेच असे धाडस केले जात आहे यात तीळमात्र शंका नाही.

# महिनाभरात पाणी योजनेचा वीजपुरवठा बारा वेळा खंडित

## ऐन उन्हाळ्यात शहराच्या पाणी पुरवठ्यात अडथळे
## आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांचे महावितरणला पत्र

■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : शहराच्या पाणी पुरवठा योजनेवरील वीजपुरवठा सातत्याने खंडित होत आहे. १५ फेब्रुवारी ते १० मार्च या कालावधीत १२ वेळा वीजपुरवठा काही मिनिटांसाठी खंडित झाला आहे. त्यामुळे पाणी उपसा बंद पडून शहराला नियमित व पूर्ण दाबाने पाणी पुरवठा करण्यात अडचणी येत आहेत. याबाबत गांभीर्याने दाखल घेऊन तत्काळ उपाययोजना कराव्यात, असे पत्र प्रशासक तथा आयुक्त यशवंत डांगे यांनी महावितरण कंपनीच्या अधीक्षक अभियंत्यांना दिले आहे.

कंपनीकडून १५ फेब्रुवारीला सायंकाळी ७.२० ते ७.३० पर्यंत, १६ फेब्रुवारीला रात्री १२.२५ ते रात्री १२.३५ पर्यंत, १८ फेब्रुवारीला रात्री ९.१५ ते ९.२० पर्यंत, २२ फेब्रुवारीला सकाळी ९.३५ ते ९.४० पर्यंत व दुपारी ४.२० ते ४.२५ पर्यंत, २४ फेब्रुवारीला सकाळी १०.१५ ते १०.२५ पर्यंत, २५ फेब्रुवारीला दुपारी ३.३० ते ३.३९ पर्यंत, २ मार्च रोजी दुपारी १.३५ ते १.४० पर्यंत, ४ मार्च रोजी सकाळी ७.४० ते सकाळी ७.५० पर्यंत व दुपारी ४.५५ ते ५.०५ पर्यंत, ७ मार्च रोजी दुपारी ३.०० ते ३.२० पर्यंत, १० मार्च रोजी सायंकाळी ५.३० ते ५.३५ पर्यंत वीज पुरवठा खंडीत झाला होता.



वीज पुरवठा काही मिनीटे खंडीत झाला तरी मुळानगर, विळद व नागापूर येथील कार्यरत पंपीग स्टेशन येथून पाणी उपसा सुरळीत होण्यास सुमारे दोन ते तीन तासाचा अवधी लागतो. त्यामुळे अनियमीत पाणी उपसा होवून शहरातील वितरणासाठीच्या टाक्या वेळेत भरता येत नाहीत. पर्यायाने शहरास नियमीत व पूर्ण दाबाने पाणी पुरवठा करण्यास अडचणी निर्माण होत आहेत. वीज वितरण कंपनी कडून वीज पुरवठा सातत्याने विस्कळीत होत असल्याने मुळानगर, विळद व नागापूर येथील पंपींग स्टेशन पंपीग चालू बंद करावी लागत असल्याने मुळानगर ते वसंतटेकडी दरम्यान कार्यरत मुख्य जलवाहिन्यांची व पंपींग मशिनरींचे नादुरूस्तीचे प्रमाणही वाढत आहे. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसानही होत आहे.

# दिघोळ माळेवाडी ग्रामपंचायत भाजपाच्या ताब्यात

## सभापती प्रा. राम शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सविता शिंदे सरपंचपदी

■ जनप्रवास प्रतिनिधी

जामखेड : प्रा राम शिंदे विधानपरिषदेचे सभापती झाल्यापासून मतदारसंघातील वातावरणात चांगला बदल होतांना दिसत आहे. जामखेड तालुक्यातील दिघोळ ग्रामपंचायतच्या सरपंचपदी सविता संतोष शिंदे यांची निवड करण्यात आली आहे. सरपंच निवडीच्या वेळी सविता संतोष शिंदे व यमुनाबाई सदाशिव रंधवे या दोन फॉर्मपैकी यमुनाबाई रंधवेंचा फॉर्म मागे घेण्यात आला व सविता संतोष शिंदे यांची दिघोळ ग्रामपंचायतच्या सरपंचपदी बिनविरोध निवड करण्यात आली. या निवड प्रक्रियेत माजी पंचायत समिती सदस्य मनोज राजगुरू, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवक तालुकाध्यक्ष पै. सुरज रसाळ, माजी सरपंच नानासाहेब गीते, दिघोळ माजी उपसरपंच भारत शिंदे, तंटामुक्ती अध्यक्ष पै. धीरज रामभाऊ रसाळ यांनी मोलाची कामगिरी बजावली.

यावेळी सर्कल नवले ग्रामसेवक रफीक तांबोळी तलाठी देसुरकर यांच्या नियंत्रणात निवड झाली. यावेळी ग्रामपंचायत सदस्या रेखा अर्जुन गीते, उपसरपंच दशरथ कचरू राजगुरू ,भीमराव विधाते ,पवन नंदकुमार डावकर, राणी नवनाथ आवारे, ज्ञानेश्वर रंधवे, नागनाथ उमाप, तय्यब शेख, हनुमान पोद्दार, रोहित मोठे, वसंत रसाळ, गणेश जाधव, राहुल टाके , सागर जाधव, नारायण कोचाळे, रविकिरण गायकवाड, योगेश शिंदे, दत्ता शिंदे, अंकुश शिंदे, परमेश्वर तागड, सोमा दगडे, ओंकार बोंद्रे, दीपक रसाळ, लक्ष्मण तागड, सुमित लोखंडे, यांच्यासह आदी मित्रपरिवार उपस्थित होते. सभापती प्रा राम शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व घटकांना बरोबर घेऊन गावाच्या विकासासाठी एकत्रित काम करणार असल्याचे मा पंचायत समिती सदस्य मनोज राजगुरू व तंटामुक्ती अध्यक्ष पै धीरज रसाळ यांनी सांगितले.

### धीरज रसाळ किंगमेकर

दिघोळ ग्रामपंचायत सरपंचपदासाठी यमूनाबाई सदाशिव रंधवे व सविता संतोष शिंदे यांचे दोन अर्ज आले. सविता शिंदे गटाचे दोन सदस्य समोरच्यांनी फोडले हे लक्षात येताच धीरज रसाळ यांनी यमूनाबाई रंधवे गटाचे दोन सदस्य मोठ्या कौशल्याने आणले त्यामुळे सविता शिंदे गटाचे ६ सदस्य झाले. यमूनाबाई रंधवे कडे दोनच सदस राहिले. त्यामुळे यमूनाबाई रंधवेंनी उमेदवारी अर्ज माघारी घेतला.आणि सविता संतोष शिंदे बिनविरोध सरपंच घोषित करण्यात आल्या या निवडीत तंटामुक्ती अध्यक्ष पै धीरज रसाळ किंगमेकर ठरले.





# डॉ.राजेंद्र पिपाडा यांचा आगळा वेगळा अभिष्टचिंतन सोहळा साजरा

■ जनप्रवास प्रतिनिधी

राहाता :यापुढेही सर्वसामान्य, शेतकरी, कष्टकरी, कामगार यांच्या प्रश्नासाठी असेच अहोरात्र झटत राहु अशी ग्वाही वाढदिवसा निमित्ताने आपल्या सर्वांच्या साक्षीने देतो असे मनोगत भाजपा नेते डॉ.राजेंद्र पिपाडा यांनी आपल्या अभिष्टचिंतन प्रसंगी बोलताना व्यक्त केले. महाराष्ट्राची संस्कृती असणारा वारकरी सांप्रदयाचा वसा जपत भाजपा नेते डॉ.राजेंद्र पिपाडा यांचा अभीष्टचिंतन सोहळा वारकरी व भजनी मंडळ व जेष्ठांच्या वतीने साजरा झाला.



याप्रसंगी राहाता प्रेस क्लबचे अध्यक्ष रामकृष्ण लोंढे, आरपीआयचे दिलीपराव वाघमारे, प्रगतशील शेतकरी शिवाजीराव आनाप, धडाडीचे कार्यकर्ते पोपटराव वर्पे, जैन श्रावक संघाचे अध्यक्ष अनिल पिपाडा, मदनलालजी पिपाडा महावीर पिपाडा, राजेश भन्साळी ,संजय पिपाडा, कमलनयन टाकी, वीरेश रुणवाल, कमलेश धाडीवाल, नेमीचंद लोढा, सुनील धाडीवाल, सुमतीलाल ताथेड, अजित शेठ धाडीवाल, नरेंद्र पिपाडा ,अभय पिपाडा महेंद्र पिपाडा प्रफुल पिपाडा, बाबू शेठ रायसोनी उपस्थित होते. तर वारकरी संप्रदायातील बांधवांनी पसायदान म्हणत वातावरण भक्तीमय बनविले. एक आगळा वेळा अभिष्टचिंतन सोहळा पार पडला. यावेळी बोलताना डॉ. पिपाडा म्हणाले की आम्ही आमचे आयुष्य पुर्णपणे सर्वसामान्य, शेतकरी, कष्टकरी,कामगार यांच्या प्रश्नासाठी संघर्ष करण्यासाठी झोकुन दिले आहे. माझा जन्म शेतकरी कुटुंबात झाला असल्यामुळे शेतक-यांची पिडा व दुख हे जवळुन पाहिलेले आहे. त्यामुळे जेव्हा जेव्हा त्यांच्यावर अन्यायची परिस्थीती येईल तेव्हा तेंव्हा आम्ही खंबीर उभे राहु. शिर्डी संस्थानचे कामगार असो किंवा गोरगरिबांचे प्रश्न असो आम्ही सदैव प्रामाणिकपणे त्यांच्यासोबत राहिलो व यापुढेही राहणार. अशा शब्दात डॉ.राजेंद्र पिपाडा यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

# परिक्रमा फार्मसी कॉलेज मध्ये राष्ट्रीय ऑनलाइन सेमिनार संपन्न


## १००० हून अधिक प्रतिनिधींचा सहभाग; औषधनिर्माण, शिक्षण आणि उद्योग यामधील सहकार्यावर भर

■ जनप्रवास प्रतिनिधी

श्रीगोंदा : तालुक्यातील काष्टी येथील परिक्रमा शैक्षणिक संकुलनातील परिक्रमा फार्मसी कॉलेजच्या वतीने ''ब्रिजिंग अॅकॅडेमिया आणि इंडस्ट्री: प्रगत औषधनिर्माण शिक्षणासाठी औद्योगिक गरजांशी संलग्नता'' या विषयावर राष्ट्रीय स्तरावरील ऑनलाइन सेमिनार ८ मार्च २०२५ रोजी मोठ्या उत्साहात पार पडला. या सेमिनारला संपूर्ण भारतभरातून १००० हून अधिक प्रतिनिधी ऑनलाइन माध्यमातून सहभागी झाले.

कार्यक्रमाच्या उद्घाटन सत्रात प्रमुख पाहुण्यांमध्ये परिक्रमा ग्रुपचे सीईओ अॅड. प्रतापसिंह पाचपुते, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पुंड, परिक्रमा फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. सुनील निर्मल, सेमिनार संयोजक डॉ. निकुंज सोलंकी, समन्वयक डॉ. सोनल सोलंकी आणि संपूर्ण फार्मसी महाविद्यालयाचा प्राध्यापकवर्ग आणि कर्मचारी उपस्थित होते.

शिक्षण आणि उद्योग यांच्यातील दरी भरून काढण्यावर भर या सेमिनारमध्ये औषधनिर्माण शिक्षणाला औद्योगिक गरजांशी कसे जोडले जाऊ शकते, यावर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांसाठी कौशल्याधारित शिक्षण, संशोधन आणि उद्योगांशी प्रत्यक्ष सहकार्य यावर भर देण्याची गरज वक्त्यांनी अधोरेखित केली.




मुख्य सत्रात प्रख्यात तज्ज्ञांनी व्याख्याने दिली, त्यामध्ये – डॉ. शिवानी देसाई –सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया, पुणे, डॉ. अश्वनी पाटील –डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेस अँड रिसर्च, पुणे,डॉ. हेमंत तावले –आरकेएच फार्मास्युटिकल कन्सल्टन्सी, नवी मुंबईसंशोधन, आर्टिफिशियल इंटेलिजन्स (अख), औषध विकासातील नवकल्पना आणि नियामक चौकटींचे औषधनिर्माण क्षेत्रातील महत्त्व यावर यावेळी सखोल चर्चा झाली.

सेमिनारच्या यशस्वी आयोजनाबद्दल संस्थेच्या मान्यवरांचे अभिनंदन

या राष्ट्रीय स्तरावरील सेमिनारच्या यशस्वी आयोजनाबद्दल बबनरावजी पाचपुते विचारधारा ट्रस्टचे संस्थापक माजी मंत्री बबनरावजी (दादा) पाचपुते, संस्थेच्या अध्यक्षा डॉ. सौ. प्रतिभाताई पाचपुते, सचिव . आमदार विक्रमसिंह पाचपुते, मुख्य कार्यकारी अधिकारी . अॅड. प्रतापसिंह पाचपुते, अॅकॅडेमिक डायरेक्टर मा.सौ. इंद्रायणी प्रतापसिंह पाचपुते, मुख्य प्रशासकीय अधिकारी व अतिरीक्त कार्यकारी अधिकारी अनिल पुंड, डेप्युटी अॅकॅडेमिक डायरेक्टर प्रा. डॉ. संजीव कदमपाटील तसेच परिक्रमा तंत्रनिकेतनमहाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत सूर्यवंशी, प्राचार्य डॉ. मोहन धगाटे, प्राचार्य डॉ. सुदर्शन गिरमकर, प्राचार्य डॉ. पी. ए. इथापे, प्राचार्य डॉ. रमेश शिंदे यांनी सर्व स्टाफ व आयोजकांचे अभिनंदन केले व भविष्यातही अशा उपक्रमांच्या माध्यमातून औद्योगिक क्षेत्राशी शैक्षणिक संस्था जुळवून आणण्याची गरज अधोरेखित केली.

''उद्योगासोबत शिक्षणसंस्थांची भागीदारी गरजेची'' – डॉ. निकुंज सोलंकी,सेमिनारचे संयोजक डॉ. निकुंज सोलंकी यांनी सांगितले की, ''सध्याच्या काळात औषधनिर्माण उद्योगाची गरज ओळखून शिक्षणपद्धती विकसित करणे आवश्यक आहे. उद्योग आणि शिक्षणसंस्थांमध्ये प्रत्यक्ष सहकार्य वाढल्यास विद्यार्थी अधिक सक्षम होतील.''

कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी डॉ. सुनील निर्मल आणि अॅड. प्रतापसिंह पाचपुते यांनी विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख शिक्षण आणि संशोधनाकडे वळण्याचा सल्ला दिला.

फार्मा अन्वेषण २०२५ – राष्ट्रीय फार्मसी शिक्षण दिन या निमित्ताने पार पडलेल्या या सेमिनारमुळे औषधनिर्माण शिक्षण क्षेत्रात नवा दृष्टीकोन निर्माण झाला असून, विद्यार्थ्यांना उद्योगासोबत जुळवून घेण्यासाठी संधी उपलब्ध करून देण्याचा हा एक महत्वपूर्ण टप्पा ठरला आहे.

# महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा दुधी भोपळ्याचा सुधारीत वाण राष्ट्रीय पातळीवर प्रसारीत

■ जनप्रवास प्रतिनिधी

राहुरी विद्यापीठ : महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत अखिल भारतीय समन्वित संशोधन प्रकल्प (भाजीपाला पिके) या योजनेची वार्षिक आढावा बैठक दि. ३ ते ५ मार्च, २०२५ रोजी पंजाब कृषि विद्यापीठ, लुधियाना (पंजाब) येथे संपन्न झाली. या बैठकीसाठी पंजाब कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सनबिर सिंग घोंसाल, दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे सह संचालक डॉ. संजय सिंग, लुधियाना येथील पंजाब कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. ए.एस. धट, वाराणसी येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषद–भारतीय भाजीपाला संशोधन संस्थेचे प्रकल्प समन्वयक डॉ. राजेश कुमार, लुधियाना येथील पंजाब कृषि विद्यापीठाचे उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. टी.एस. धिल्लोन, दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे ए.डी. जी. डॉ. सुधाकर पांडे, वाराणसी येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषद–भारतीय भाजीपाला संशोधन संस्थेचे संचालक डॉ. एन.राय, दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. के.ई. लवांडे व देशातील वेगवेगळ्या राज्यातील ६० प्रकल्पाचे एकुण ४०० शास्त्रज्ञ आणि राहुरी येथील महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या भाजीपाला संशोधन प्रकल्पाचे डॉ. बी.टी. पाटील, डॉ. शर्मिला शिंदे, प्रा. चिमाजी बाचकर व डॉ. शालीग्राम गांगुर्डे उपस्थित होते.

या बैठकीमध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठातील अखिल भारतीय समन्वित भाजीपाला संशोधन प्रकल्पाच्या भाजीपाला लागवडीबाबत, बिजोत्पादन आणि पीक संरक्षणाबाबतच्या एकुण सहा शिफारशी मंजुर करण्यात आल्या. तसेच या आढावा बैठकीत महात्मा फुले कृषि विद्यापीठातील भाजीपाला संशोधन प्रकल्पाने संशोधीत केलेला दुधी भोपळ्याचा आर. एच.आर.बी.जी.–५४ (फुले गौरव) हा सुधारीत वाण राष्ट्रीय पातळीवर मध्यप्रदेश, गोवा व महाराष्ट्र या राज्यांसाठी प्रसारित करण्यात आला.



हा सुधारीत वाण डॉ. बी.टी. पाटील, वाय.आर. पवार व डॉ. एस.ए. अनारसे यांनी विकसीत केला आहे. या वाणाची फळे मध्यम लांबीची (२७ ते ३० सें.मी.), दंड गोलाकार असून सरासरी फळांचे वजन ५४० ते ५५० ग्रॅम आहे.

हा वाण भुरी आणि केवडा रोगास प्रतिकारक्षम असून फळांचे उत्पन्न सरासरी ४१३.०० क्वि./हे. मिळते अशी माहिती वरीष्ठ भाजीपाला पैदासकार तथा उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. बी.टी. पाटील यांनी दिली.

या उत्कृष्ट कामगिरीबद्दल भाजीपाला पिकांमध्ये काम करणार्या सर्व शास्त्रज्ञांचे विद्यापीठातील विविध स्तरातून कौतुक होत आहे.

# अखेर! लोणीकंद हद्दीतील बेकायदेशीर खडी क्रशर तहसीलदारांकडून सील

## खनिज विभागाचा गलथान कारभार चव्हाट्यावर

■ जनप्रवास प्रतिनिधी

लोणीकंद : लोणीकंद ता. हवेली हद्दीतील बेकायदेशीरपणे व नियमांचे उल्लंघन करून सुरू असलेले गौण खनिज खडी क्रशर प्लांट अपर हवेली तहसीलदार तृप्ती कोलते यांनी 'सील' केले आहेत. नागरीकांच्या तक्रारी आल्यावर तपासणी दरम्यान विना परवाना आढळल्याने सात खडी क्रशर प्लांट बेकायदेशीर असल्याचे स्पष्ट झाल्यावर तहसीलदारांनी कारवाई करत क्रशर सील केले आहेत,आतापर्यंत भावडी व लोणीकंद हद्दीतील सतरा खडी क्रशरला ताळे लावण्यात आले आहे यावरून गौण खनिज विभागाचा गलथान कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.



याबाबत नागरिक आंदोलन करणार असल्याचे निवेदनही प्राप्त झाले यामुळे तहसीलदारांनी तत्काळ खडी क्रशरची पाहणी करीत ते 'सील' केले आहे. या खडी क्रशरचे मालक शासकीय अधिकाऱ्यांच्या डोळ्यांत धूळ फेकण्याचे काम करत असून त्यांना राजकीय किंवा शासकीय आश्रय असल्याने गेली अनेक वर्षापासून क्रशर सुरू असल्याची चर्चा नागरीकांमध्ये जोर धरू लागली आहे. लोणीकंद ग्रामपंचायतीच्या हद्दीतील क्रशर धूळ प्रदूषण नियम पायंदळी तुडवणाऱ्या व शासन परवानगी नसलेल्या तसेच संपूर्ण कागदपत्रांची पूर्तता नसणाऱ्या क्रशर कायमस्वरूपी बंद करण्याचा ठरावही ग्रामपंचायतीने बहुमताने मंजूर केला आहे, क्रशर मुळे होणाऱ्या धूळ प्रदूषणापासून परिसरातील नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

# जर दोघांचेही विवाहबाह्य संबंध असतील तर...

कुठल्याही नात्यात पती-पत्नीच्या नात्यात कुण्या एका पार्टनरला जोडीदाराला विवाहबाह्य संबंधाची 'बाहेर'च्या आकर्षणाची भुरळ पडू शकते. थोडक्यात हे स्वत:च्या पार्टनरला फसवणंच असतं. अशा फसवणुकीचं समर्थन करता येत नाहीच, पण तरीही आपल्या जोडीदाराला का फसवतात याची कारणं जाणून घेणं आवश्यक आहे.



पती-पत्नीत वाद - भांडण हा नवा विषय नाही, पण हा प्रकार ज्यावेळी हाताबाहेर जातो आणि एक पार्टनर मनातून दुखावला जातो तेव्हा तो किंवा ती टोकाचं पाऊल उचलून जोडीदाराला प्रकरणात प्रेम - जिव्हाळा यापासून नाकारलं जाणं हे कारण असतं.

साधारणपणे टोकाचं भांडण झाल्यावर स्वत:ला असहाय्य वाटतं. हा एकदम नाजूक आणि गुंतागुंतीचा क्षण असतो. अशावेळी पार्टनरला फसवणं ही एकप्रकारची प्रतिक्रिया ठरू शकते. अशा प्रसंगात मित्र किंवा कुटुंबातील इतर लोक इतके टोकाला गेलेले असतात की, आपण कोणाची मदत घ्यावी हे त्यांना सुचत नाही. जो कोणी सहानुभूती दाखवेल त्या व्यक्तीच्या जवळ जातात, पण या कृतीचा पश्चाताप करण्याची वेळ त्यांच्यावर येते, असं मानसोपचार शास्त्रज्ञ दीप्ती मखिजा यांनी सांगितलं.

लैंगिक विसंगती किंवा अनुरूपता

अन्न-पाणी-निवारा आणि मैथुन या माणसाच्या आदिम गरजा आहेत. इतर गरजांप्रमाणे माणसाला मैथून सुख मिळालं नाही तर, तो मरत नाही, पण तो अतृप्त राहतो. मैथुन सुखापासून वंचित राहतो. लैंगिक इच्छा किंवा गरजा याबद्दल बहुतेक जोडीदार एकमेकांशी लाजेखातर बोलत नाहीत. असं बोललं तर आपल्यावर अश्लिल असा शिक्का लागेल असं त्यांना वाटतं, पण ज्यावेळी हे असमाधान एका मर्यादेबाहेर जातं तेव्हा ते सुख बाहेर मिळवण्याचा प्रयत्न केला जातो. लग्न संबंधात भावनिक अनुरूपतेप्रमाणेच लैंगिक अनुरूपताही महत्वाची आहे. जेव्हा यात विजोडता निर्माण होते तेव्हा जोडीदार बाहेरचं सुख शोधण्याचा प्रयत्न करतो.

गृहित धरू नका

जर लग्नाच्या आधी आणि लग्नानंतर जोडीदाराला गृहित धरत असाल, तर ती मोठी चूक ठरेल. लग्नाला अनेक वर्षे झाल्यावर आपल्या जोडीदाराचं कौतुक करणे, त्याच्या / तिच्या ड्रेसचं हेअरस्टाईल वगैरेचं कौतुक करत नाहीत. त्यांना या गोष्टी महत्वाच्या वाटत नाहीत, पार्टनर कौतुक करत नाही म्हटल्यावर आपल्यात इंटरेस्ट घेण्यासारखं राहीलं नाही, अशी भावना निर्माण होते. नेमके याच काळात कोणी कौतुक केलं तर, स्वत:चा अहंकार सुखावण्यासाठी बाहेर सुख शोधण्याची प्रवृत्ती निर्माण होऊ शकते.

याचप्रमाणे नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने, बिझनेस, पार्टी, ट्रिप यामुळे जोडीदार एकमेकांपासून दूर राहात असतील तर, अशा अनेक कारणांमुळे जोडीदारांना बाहेरचं आकर्षण वाटू शकतं. अशा प्रसंगात पार्टनर्स एकमेकांची फसवणूक करत असतील तर, ती त्यांना विन-विन सिच्युएशन वाटते, पण सत्य यापेक्षा वेगळं असू शकतं. ही फसवणूक उघडकीस आली नाही तर, 'थ्रिल' मिळविण्यासाठी तो/ती वेगळ्या चक्रात अडकण्याची शक्यता असते, पण हा अप्रामाणिकपणे उघडकीस आला तर, ते स्वत:विषयीचा आदर घालवून बसतात, पण लग्नाचं नातं टिकवून ठेवायचं असेल तर, अशा नात्याना पूर्णविराम द्यावा लागतो.

# सुंदर दिसणे ही प्रत्येकाची प्राथमिकता

सुंदर दिसणे ही प्रत्येकाची प्राथमिकता आहे. आपण दररोज तयार होण्यासाठी पुरेसा वेळ नसेल तर कमीत कमी इतका प्रयत्न जरूर करावा की आपल्या रूपामध्ये कोणत्याही प्रकारची कमी राहू नये. सौंदर्य विशेषज्ञांच्या अनुसार मेकअपची बेसिक पध्दत प्रत्येकाने जाणून घेणे जरूरीचे आहे.



मेकअपमधील छोट्या, छोट्या गोष्टीही या दृष्टीने महत्वपूर्ण ठरतात. ज्यांच्या सहाय्याने आपण नेहमी स्मार्ट आणि सुंदर दिसू शकाल.

नखांची नेलपॉलिश आपली सौंदर्यप्रती असलेली जागरूकता दर्शविते. यासाठी नखांसाठी नवनवीन नेलपॉलिशचा उपयोग करावा. जुनी अगोदरची नेलपॉलिश रिमूव्हने दूर करून त्यावर नवीन नेलपॉलिशचा थर द्यावा.

० बाजारामध्ये अनेक शेडस्‌चे हेअर कलर उपलब्ध आहेत. सफेद केसांना हेअर कलरचा उपयोग करताना आपल्या स्क्रिन टोनशी मॅच होणारा कोणताही हेअर कलर निवडावा. शक्यतो केसांसाठी दोन शेडच्या हेअर कलरची निवड करावी. जेणेकरून त्यांचा चांगला इफेक्ट मिळेल.

० कोरड्या आणि निस्तेज केसांसाठी अनेक उपाय उपलब्ध आहेत. अत्याधिक कोरड्या केसांसाठी थोड्याशा पाण्यामध्ये तीन-चार थेंब तेल मिसळून लाव-ावे आणि केस बांधून ठेवावेत.

० चेहऱ्याच्या सौंदर्यात ओठांवरील लिपस्टिकने अधिक भर पडते. आपल्या ओठांवर लिपस्टिक अधिक वेळ टिकून राहात नसेल तर नेहमी क्रिमीमॅटची लाइट शेडची लिपस्टिक निवडावी. लिपस्टिक लावण्याअगोदर हलकेसे फाऊंडेशन लावावे. मॅट लिपलाइनरने आउटलाईन बनवावी व नंतर लिपस्टीक लावावी.

० शाप आयब्रोजचा असर जबरदस्त असतो. आपण कितीही चांगला मेकअप आपण कितीही चांगला मेकअप केला तरी आयब्रोजशिवाय तो उठून दिसणार नाही. यासाठी आयब्रोजला मेकअपला साजेसा शेप द्यावा. अशा प्रकारच्या मेकअप टिप्स अवलंबून आपण नेहमी स्मार्ट आणि सुंदर दिसू शकाल.

# दिवसभर खात राहू नका

आपले शरीर म्हणजे विषनिर्मितीचा कारखाना. हे विष सतत आपल्या शरीरातून बाहेर पडायला हवे. जर ७२ तासांपर्यंत मूत्रपिंडाद्वारे व १५ दिवसांपर्यंत आतड्यांद्वारे शरीरातील घाण बाहेर पडली नाही तर एकामागून एक रोग सौंदर्य व स्वास्थ्य नष्ट करतात. यासाठी मलमूत्र विसर्जनाचे आवेग रोखू नये. तसेच पुरेशी विश्रांती घ्यावी. नैसर्गिक राहण्यासाठी आपली दिनचर्या अशी ठेवा.



* सकाळी बिछान्यातून उठताच पोटभर पाणी प्या. दिवसभरही भरपूर पाणी प्या. पाणी शरीरातील विषारी घटक बाहेर काढते व मूत्रप्रणाली निरोगी राखते. यामुळे त्वचाही उजळ राहते.

* मोकळ्या हवेत वेगाने चाला. दीर्घ श्वास घ्या व सोडा. गवतावर अनवाणी फिरा.

* दिवसभर खात राहू नका. ठरलेल्या वेळीच जेवण व नाश्ता करा.

* पोटाला तड येईपर्यंत जेवू नका. भुकुपेक्षा कमी जेवा. जेवणाच्या प्रारंभी फळे व भाज्यांचा सलाद खा. यामुळे आपण जास्त खाऊ शकणार नाही.

* दुपारच्या व रात्रीच्या जेवणाव्यतिरिक्त जादा भूक लागल्यास तळकट, तेलकट बाजारू चाट-भाज्यांपेक्षा मोडांची धान्ये, फळे व भाज्या खा.

* जर आपण ओव्हरवेटने त्रस्त असाल तर आठवड्यातून किमान २-३ वेळा उकडलेले अन्न खा. तांदूळ, भात तळकट, तूपकट पदार्थ टाळा.

* पोट साफ ठेवण्याचा प्रयत्न करा. महिन्यातून एकदा निर्विषीकरणासाठी फक्त कच्ची फळे, भाज्या व ज्यूस इ. च घ्या. हा नियम आपले शरीर हलके-फुलके होईपर्यंत पाळा. * उपवास करीत असाल तर फळे व भाज्या खा. त्यात खनिजे व व्हिटॅमिन्स भरपूर असतात. पण कॅलरीज कमी असतात; उदा. काकडी, पपई, कोबी, मोडाची कडधान्ये इ.

# जेव्हा आपल्याला त्या व्यक्तीची आठवण येईल तेव्हा

वेगाने बदलणाऱ्या या जगात काहीजणांची मानसिकता अद्यापही बदललेली नाही. यामुळेच अत्यंत बिनधास्त, आत्मविश्वासाने ओतप्रोत व्यक्तीही नाकारल्या जाणाऱ्या स्थितीत उन्मळून पडते व तिचे मन विषादाने एवढे भरून एकाजागी अडकून पडते की, वादळी बदलणारा समाजही तिला हलवू शकत नाही.

अशीच एक व्यक्ती पाच वर्षामागे भंगलेले प्रेम आजही कवटाळून त्रस्त आहे. आजही कदाचित आपले प्रेम परतेल असे तिला वाटते. राहून राहून तिचे मन हाच विचार करून दुखावते की, त्या व्यक्तीचे आपल्यावर थोडेही प्रेम नाही का? त्या व्यक्तीची प्रेमात भेटण्याची तगमग व आनंदाने क्षण म्हणजे फक्त एक देखावा होता का? असे विश्लेषणांच्या खपल्यांमागून खपल्या उकळीत ती आणखीणच निराशेच्या गर्तेत जाते.

मनाच्या गर्तेत पूर्णपणे गेल्यामुळे मोठ्या हून मोठा व सोपा आधारही दिसू शकत नाही. बुडत्याला काडीचा आधार अशी म्हण आहे, पण तो आधार घेण्याची मनात इच्छा हवी ना.



अशा भोवऱ्यातून स्वत:च बाहेर पडायला हवे. ज्या दिवशी या दुष्टचक्रातून बाहेर पडू इच्छाल तेव्हा आपल्याला आधारासाठी अनेक हात पुढे झालेले दिसतील.

जी व्यक्ती आपल्याला सोडून गेली आहे तिला आपण आजही वेळ देत आहात. पाच वर्षाचा काळ खूपच जास्त असतो. पाच महिन्यांपर्यंत रूसवे-फुगवे काढण्याचे, गैरसमज दूर करण्याचे समजू शकते. तेही संबंध तुटण्याचे त्या व्यक्तीला काही वाटत असेल तरच. अन्यथा ती त्या व्यक्तीच्या बेवफाईची स्वत:लाच शिक्षा ठरू शकते.


आपण स्वत:ला खूप शिक्षा दिली आहे. आता स्वत:ला माफ करा. खरे तर जिचे आपल्यावर प्रेम नव्हते अशा व्यक्तीवर आपण का प्रेम केले याचाच आपल्याला जास्त त्रास होत असतो.

आता जरा असे करा. जेव्हा आपल्याला त्या व्यक्तीची आठवण येईल तेव्हा आपल्याला तिच्या विषयीच्या साऱ्या खुपणाऱ्या गोष्टी कागदावर उतरून काढा. तेही रोज हळूहळू आपल्याला त्याच्याविषयी विचार करून व लिहून उबग येईल.

एक दिवस वाटू लागेल की, आपले त्याच्याबद्दल विचार करणे, लिहिणे सारे किती कंटाळवाणे व निरर्थक आहे. आपल्या मनातील त्याच्याबद्दलचे सारे विचार कागदावर उतरवल्यानंतर आपले मत मोकळे होईल आणि जीवन नव्याने जगण्याची उभारी येईल.

# आपल्या केसांच्या स्वच्छतेची व देखभालीची दक्षता घ्या

मी गोरी असते तर मी ही इतरांच्या आकर्षणाचे केंद्र असते; पण मी काळी असल्यामुळे माझ्याकडे कोणीच पाहात नाही. प्रत्येक क्षेत्रात इतरांना आपल्याकडे आकर्षित करू पाहणाऱ्या पण अनेक कारणांमुळे तसे करू न शकणाऱ्या महिला असतात. परंतू इतरांमध्ये आपली उपस्थिती दर्शवण्याची वा स्वत:ला इतरांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू बनवण्यात आपला रंग वा वेशभूषा अडथळा आणीत नाही. गरज असते ती फक्त स्वत:कडे थोडे लक्ष देण्याची, थोडासा बदल करण्याची आपल्यात कोणते बदल करायला हवेत ते पाहू या.



**सुदृढ त्वचा** – सर्वप्रथम स्वत:च्या त्वचेची पूर्ण काळजी घ्यायला हवी. रंग कसलाही असला तरी आपल्या चेहऱ्यावर आकर्षण असायला हवे. यासाठी जेवणात हिरव्या भाज्या, फळे इ.चे प्रमाण वाढवा पुरेशी झोप घ्या. तसेच त्वचेसाठी साबणाचा वापर कमी करा. बेसनाने चेहरा धुण्यास सुरूवात करा. आठवड्यातून एकदा घरगुती फेपॅक ही वापरा.


**केसांचे सौंदर्य** – आपली हेअर स्टाइलही आपल्या व्यक्तिमत्त्वात मोठा बदल घडवते. उत्तम हेअर स्पेशालिस्टकडून आपल्या व्यक्तिमत्त्वाला साजेशी हेअर स्टाइल बनवून घ्या. आपल्या केसांच्या स्वच्छतेची व देखभालीची दक्षता घ्या. बेकार व दुतोंडी केसांवर वरचेवर ट्रीटमेंट करीत राहा. आठवड्यातून एकदा तेल लावा. केस कंडीशन करण्यासाठी दही व कॉफी उपयुक्त असते.

**कपड्यांची निवड** – इंडियन असो वा वेस्टर्न स्टाइलचे सर्व कपडे व्यवस्थित विचारपूर्वक खरेदी करा. आपले व्यक्तिमत्त्व उजळेल व आपल्याला शोभेल असेच रंग निवडा. जर वर्किंगवूमन असाल तर याबाबत जरा जास्त दक्षता घ्या.

**आकर्षक फिगर** – आकर्षक दिसण्यासाठी उत्तम फिगरही हवी. त्यामुळे आपण आकर्षक दिसाल. जर फिगर उत्तम असेल तर आपण मेकअपशिवायही इतरांना आकर्षित करू शकता. यासाठी व्यायाम, ड्रेस इ.द्वारे फिगर आकर्षक बनवायला हवी.

# मेंदू म्हणजे उच्चकोटीची चीप आहे

तुम्हाला मिळालेलं शरीर हे ईश्वरनिर्मित जटिल यंत्र आहे. तुमच्या नावाने हे यंत्र चालते. अन्नावर जगते. या यंत्राला चांगले अन्न दिले तर ते व्यवस्थित काम करत राहील. आपल्या शरीराकडे कधीतरी त्रयस्थाच्या नजरेनं पाहा. जन्मापासून मरेपर्यंत अहोरात्र याचा हृदयपंप काम करीत असतो. शरीरातल्या शिरा म्हणजे वायरिंग आहे.



मेंदू म्हणजे उच्चकोटीची चीप आहे, जी संगणकापेक्षा अत्याधुनिक माहिती मिळवत असते. मेंदू एवढा ॲडव्हान्स असून आपण केवळ तो १० टक्क्यापर्यंतच वापरतो. डोक्यावरचा प्रत्येक केस म्हणजे अँटेना आहे व ते विश्वाशी संपर्क ठेवून असतात. आपण गरजेपुरती बुद्धी वापरत असल्याने शरीरांतर्गत एवढ्या खोलात शिरत नाही.

आपण ज्या गाड्या वापरतो, त्या गरज संपल्यावर आपण बंद करून गरजेला लावतो; परंतु तुम्ही मालक असून 'निद्राधीन' असता, तरीही शरीराचे कार्य अव्याहत सुरू असते. त्वचा बदलली जात असते. नको असलेली माहिती रिजेक्ट केली जात असते. शरीरात आलेली खाण्या-पिण्यातली विषके हटवण्याचे काम सुरूच असते. नव्या पेशी तयार होत असतात. मृत पेशी हटवल्या जात असतात.

अशा या मिळालेल्या अलौकिक शरीरासाठी व ते दीर्घकाळ टिकवण्यासाठी आपण काय केले पाहिजे याचा विचार करू.

पायाचे अवयव सुस्थितीत राहण्यासाठी, पोटातील अन्नपचनासाठी रोज अर्धा तास तरी चालले पाहिजे. म्हणजे व्यायाम व ताजी हवा शरीराला मिळेल.

शरीरात जे पार्टस्‌ कार्यप्रवण असतात त्यांच्या स्वच्छतेसाठी व उष्णता कमी करण्यासाठी किमान दर अर्धा-पाऊण तासाने ग्लासभर पाणी पिले पाहिजे. दारू पिल्याने नेमके उलटे घडते. शरीरातले पार्टस्‌ खराब होत राहतात व उष्णता आणि विषके वाढत जातात.

जंक फूड, फास्ट फूड खाऊ नका. भेसळीचे तेल पोटात गेले की, आतडी व हृदयावर ताण येतो. तसेच तेलकट, तळीव, मसालेदार पदार्थ न खाता साधे घरगुती भोजन घ्या. प्रवासात पाणी व फळेच खा. पाणी शुद्ध असावे. शक्यतो बिसलरी वा घरचे पाणी न्या. मूत्रभावना झाल्यास निचरा करून या. मूत्र अडवण्याची सवय त्रासदायक ठरते.

रात्रीचं जागरण, वाचन, टीव्ही पाहणं, गेम खेळणं वा मेंदूला ताण देणाऱ्या गोष्टी करू नका. सिगारेट ओढू नका. किमान ६ ते ७ तास निर्विघ्नपणे झोप झाली पाहिजे.

चाळीशीनंतर दर तीन-चार महिन्यांनी शरीराची गाडी दवाखान्याच्या गॅरेजला लावा व तपासणी करून घ्या. लाज वाटते म्हणून चष्मा लपवू नका.


जे काम आपल्याला होणं वा वेळेत पूर्ण होणार नसल्यास 'नाही' म्हणायला शिका. इतर जबाबदाऱ्या अंगावर घेतल्यास मानसिक तणाव निर्माण होतो.

आपण ज्या परिवारात राहातो, त्या परिवारासाठी किमान दोन तास दिले पाहिजेत. आपण ज्या धर्मात जन्मलो, त्या धर्माच्या देवाला, प्रेषिताला निदान झोपण्यापूर्वी आठवले पाहिजे.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे जगतो कसा कुणीही, तुम्ही 'यादगार' बनले पाहिजे. सत्याच्या मार्गाने चला म्हणजे हे शरीर ज्याने तुमच्या स्वाधीन केले तो परमेश्वर तुमची काळजी घेईल. असं केलं नाहीत तर एके दिवशी ऑल सिलेक्ट अँड डिलीट !

# हसरा माणूस सर्वांनाच आवडतो

हसरा माणूस सर्वांनाच आवडतो. जिथे हसरं, खेळकर वातावरण असतं, तिथे काम करणाऱ्यांची कार्यक्षमता उच्च दर्जाची असते. मनावर ताण नसल्यामुळे तिथली माणसं मोकळेपणानं वावरतात. एकमेकांना सहकार्य करतात. त्यामुळे कामाचा वेग आणि अचूकपणा वाढतो. सतत हसत राहण्यामुळे शरीराला ऑक्सिजनचा भरपूर पुरवठा होतो. त्यामुळे एक प्रकारे शरीराची साफसफाईदेखील होते. जेवणानंतर हास्यविनोदाचा कोणत्या ना कोणत्या प्रकारे आस्वाद घ्या. प्रियजनांशी गप्पा मारा. विनोदी साहित्य वाचा किंवा हास्यपट बघा. त्यामुळे साखरेची पातळी कमी होते. म्हणजेच डायबेटिसचं प्रमाण कमी होतं. हास्य हे नातेसंबंध व स्नेहसंबंध टिकवणारं अमृत आहे.



अप्रिय विषयसुद्धा खेळकर बोलण्यातून चांगले हाताळता येतात. त्यामुळे बोलणाऱ्याच्या मनात आपल्याला अपमानित करण्याचा हेतू नसून सद्भाव आहे याची दुसऱ्याला जाणीव होते आणि तो आपल्या चुका सुधारतो. कठोर बोलण्यानं माणसं दुखावली जातात आणि संबंध तुटतात. खेळकर, हसऱ्या संभाषणामुळे मनं प्रसन्न होतात आणि संबंध दृढ होतात, कारण उघड आहे - जो माणूस भेटल्यामुळे मनाला आनंद होतो, त्याचा सहवास माणसाला हवासा वाटतो. त्याच्याशी संबंध चांगले राखण्यासाठी माणूस त्याचं बोलणं ऐकायला तयार असतो. त्याच्या म्हणण्याप्रमाणे वागायला तयार असतो. हसऱ्या आणि आनंदी वृत्तीमुळे माणसाचा आत्मविश्वास वाढतो. त्याची इमेज तयार होतो. अशा माणसाला नेतृत्व द्यायला माणसं आनंदानं तयार होतात. रूक्ष, गंभीर भाषणापेक्षा हसरं; पण उद्बोधक भाषण माणसाच्या मनावर प्रभाव टाकतं. असं भाषण करणाऱ्याला असंख्य अनुयायी व चाहते मिळतात व ते त्याला नेता बनवतात.

हसाल तर तुमच्याबरोबर सगळं जग हसेल. रडाल तर मात्र एकट्यानं रडत बसावं लागेल, हा अनुभव सार्वत्रिक आहे. हसा आणि लठ्ठ व्हा, अशी दिशाभूल करणारा माणूस नुसता सुकडाच नाही, तर दुष्ट आणि रूक्ष असला पाहिजे किंवा एखाद्या स्लिमिंग पार्लरचा मालक असला पाहिजे. हसण्यामुळे मन हलकं आणि प्रसन्न तर होतंच; पण शरीरालाही अनेक लाभ होतात, असं सिद्ध करणारं संशोधन पुढे आलं आहे. वाढत्या महागाईच्या दिवसात आपल्याला औषधाने कुठे पुरणार आहे ? आपण आपला हसत राहण्याचाच रामबाण इलाज करूया. कारण हसण्यामुळे तात्पुरता का होईना, शारीरिक आणि मानसिक दुःखाचा विसर पडतो. दुःख चिंता, अडचणी यांच्यामुळे मनाला आणि शरीरालाही जडपणा येतो. हसण्यानं शरीराची हालचाल होते आणि मेंदूलाही 'फ्रेश' वाटतं. दुःखामुळे दुखण्यामुळे येणारी निष्क्रियता दूर होते आणि माणूस पुन्हा कामाला लागतो. हसण्यामुळे तन-मनावरचा भार नुसताच कमी होत नाही, तर तो हसताक्षणीच ताडबतोब कमी होतो. हास्य हे तणावमुक्त होण्यावरचं नैसर्गिक आणि मोफत औषध आहे. शरीरातली ताणतणाव वाढवणाऱ्या द्रव्यांची (हार्मोन्स) पातळी हसण्यामुळे खाली येते.

वाढत्या वयोमानाच्या खुणा लपवण्यासाठी हास्य हे सर्वोत्तम 'कॉस्मेटिक लोशन' आहे. जेव्हा हसण्यासाठी चेहऱ्याचे स्नायू प्रसरण पावतात तेव्हा चेहऱ्याला वाढीव रक्तपुरवठा होतो. त्यामुळे सुरकुत्या लपतात, चेहऱ्यावर लाली येऊन त्वचा आर्द्र बनते. परिणामी, माणसाचं वाढतं वय त्यात बेमालूम लपून जातं. हसण्यामुळे ताण कमी झाला की, स्वस्थ झोप लागते. म्हणूनच झोपण्यापूर्वी टीव्ही पाहात बसाल, तर एखादा विनोदी चित्रपट पाहा किंवा जोक बुक वाचा. रात्रीच्या जेवणासाठी सगळे कुटुंबीय एकत्र येत असाल, तर मन प्रसन्न करणारे विषय काढा आणि गप्पा मारा. थट्टामस्करी करा. भरपूर हसा. त्यामुळेही झोप चांगली लागेल. हसण्यामुळे माणूस लठ्ठ होतो, हा गैरसमज आहे. उलट हास्य माणसाला बारीक होण्यासाठी मदत करतं.

# जर भांडण धुमसत राहीले तर...

रावणाकडे सीता कैदेत राहीली तेव्हा पारटाचे शब्द ऐकून रामही चिडला होता व सीतेने अग्निपरीक्षा दिली आणि भूमिगत झाली होती. मला वनवासात का नेत नाही म्हणून उर्मिलाही लक्ष्मणाशी भांडली होती.



सवती मत्सराने रूक्मिणीही श्रीकृष्णाशी भांडत होती. सीतेला रामाकडे सन्मानपूर्वक पोहोचवा म्हणून मंदोदरीही रावणाशी भांडली होती. सांगायचा मुद्दा असा की भांडणे हा नवरा-बायकोचा हक्क असतो आणि नंतर भांडणातून प्रेम उद्भवते. चार-चार मुलांचे आई-बाप झाले तरी ते भांडतच असतात. अगदी गोडीचा जोडीचा संसार असला, तरी उभयतात दरी पडण्याची कारणे.

पत्नीचे बाळंतपण, मुलांचे शिक्षण व वसतीगृहाची सोय व खर्च, ऑफिसमधील एखादा सहकाऱ्याशी सलगीचा संशय, उभयतांचे आई-वडिल, मेहूणीशी सलगी, घराकडे लक्ष नाही अशी तक्रार, बदलीचे कारण, आयुष्याचा मध्यकाळ तब्येतीची तक्रार, चहाड्य, पगार नक्की किती व पैसा जातो कुठे, धंद्यात नुकसान वा डबघाई, लोकांची देणी/कर्ज, नातेवाईकांची लुडबूड, धंद्यात नुकसान, राहत्या जागेचा प्रश्न.

वरील कारणांनीच घरात तंटेबखेडे उद्भवत असतात. भांडणाऱ्या व्यक्तीला (पती वा पत्नीला) त्याच्या जोडीदाराने तत्काळ खुलासा द्यावा व संशयाचे भूत जागीच गाडावे. आपली चूक असेल, तर ती सुधारावी.

जर भांडण धुमसत राहीले, तर घरातील सुखशांती नष्ट होते. तब्येतीवर परिणाम होतो. माणूस व्यसनाला जवळ करतो मग परस्परातील दरी अधिकच रूंदावत जाते. मध्यमवयात उदासी येणे, मरगळ वाटणे अशा गोष्टी घडत असतात. काहीजण अनेक व्याप तापांनी हतबल होतात.

कुठेतरी निघून जावे असे वाटू लागते. आपल्या जोडीदाराला अशा वेळी समजून घ्या. त्याला धीर द्या.


दु:खातही मी बरोबर असेन असा विश्वास द्या. जगात सगळे स्वार्थी असतात फक्त पत्नी वा पती तेवढाच आपला असतो. आईनंतर पत्नी श्रेष्ठ हे कधीही विसरू नये.

# ऑफिसमध्ये, नातेवाईकांत सर्वच ठिकाणी सक्रिय राहा

महिलांना घरी,दारी नातेवाईकांत, ऑफिसमध्ये सर्वच ठिकाणी सक्रिय राहावे लागते. अशा वेळी महिलांनी फिट राहणे अत्यंत जरुरीचे असते. त्यांचे व्यक्तीमत्व नेहमीच आकर्षक, टवटवीत इतरांना हवे-हवेसे वाटले पाहिजे. त्यासाठी प्रथम त्यांनी निरोगी राहाणे आवश्यक आहे आणि राहणेही निरोगीपणाचे रहस्य आहे.

आपल्याला जर पुन्हा तरुण व्हायचे असेल वा तरुणच राहायचे असेल, तर आजपासून स्मितहास्याच्या टॉनिकशी अतूट नाते जोडा. हसणे कधीही फायदेशीर असते. प्लीज हसा ! आपल्या सौंदर्यासाठी, आपल्यासाठी, आपल्या मित्रमैत्रिणीसाठी अहो, हसरा चेहरा कोणाला आवडत नाही. चेहरा कितीही आकर्षक आणि कितीही सुंदर असला, तरी त्यावर हलकेसे स्मित नसेल, तर तो खुलत नाही. आरोग्यासोबतच आपल्या व्यक्तीमत्व विकासासाठीही आपले गोंडस स्मित अत्यंत आवश्यक असते. स्मितहास्य आपल्या प्रत्येक रुपात लोभसवाणे असते. एखाद्या अपरिचिताशी मैत्री सुरु करायची असो वा आपल्या माणसांतील गैरसमज दूर करायचे असोत. जर आपण लक्ष दिले असेल, तर आपले मंदस्तिम समोरच्या माणसावर जादू करीत असते. आणि न जाणो या स्मितहास्याचे रुपांतर खळखळत्या हास्यात होईल व त्यामुळेही आपलाच फायदा होईल. कारण खळखळून हसल्यामुळे संपूर्ण शरीरातील मज्जासंस्था, स्नायू, फुफ्फुसे व रक्ताभिसरण उत्तमरित्या काम करु लागेल. सर्वांत महत्वाचे म्हणजे हसण्यामुळे ताणलेले स्नायू सैल होतात. ज्या लोकांच्या चेहऱ्यावर नेहमी हास्य विलसत असते त्यांच्या चेहऱ्यावर तेज आणि ताजेपणा विलसत असतो. चमकदार चेहऱ्यामुळे ते इतरांपेक्षा वेगळे उठून दिसतात. स्तिहास्याचे इतरही अनेक फायदे आहेत. उदा. आपल्या मंदस्तिामुळे इंटरव्ह्यूच्या वेळी आपला आत्मविश्वास प्रकट होत असतो. हसतमुख माणसा प्रत्येकजण भेटू इच्छित असतो. याउलट उदास, दुर्मुखलेल्या चेहऱ्याच्या माणसाजवळ फिरकणेही टाळले जात असते.


# लहानपणी दूध पिण्याचा फायदा होतो म्हातारपणी



शक्ती आणि बुद्धीसाठी दूध प्यावं असं लहानपणापासून आपण ऐकत असतो. अनेकवेळा आपल्याला दूध पिणं आवडत नसूनही लहानपणी जबरदस्तीने दूध प्यावं लागलं असेल. पण आता नव्या संशोधनातून आपल्या या भारतीय पारंपरिक मान्यतेला दुजोरा मिळाला आहे. ब्रिस्टॉल विश्वविद्यालयातील काही संशोधकांनी शोध लावला, की बालपणी दूध किंवा इतर डेअरी उत्पादनं ज्यांच्या शरीरात मोठ्या प्रमाणावर गेली असतात, त्यांना वृद्धपकाळातही वेगाने चालणं जमू शकतं. तसंच त्यांचं संतुलन बिघडत नाही. बालपणी दूध प्यायल्यास वृद्धपकाळात शरीर थकत नाही असं संशोधनात स्पष्ट झालंय. संशोधनाच्या सुरुवातीलाच ही महत्वाची गोष्ट समोर आली आहे. डेली मेलने दिलेल्या माहितीनुसार ही माहिती महत्वपूर्ण ठरत आहे, कारण वृद्धपणी फ्रॅक्चर झाल्यास त्यावर उपाय करणं अधिक सोपं होईल.

# ऑफिसमध्ये काम करताना सतत झोप येतेय?

## 'हे' पाच उपाय केल्यास रहाल फ्रेश



ऑफिसमध्ये काम करताना झोप येणे खूप सामान्य आहे, परंतु झोप आणि आळस यामुळे कामात व्यत्यय येतो. विशेषतः दुपारच्या जेवणानंतर जास्त झोप येते, कारण दुपारनंतर शरीराची ऊर्जा पातळी कमी होऊ लागते, ज्यामुळे थकवा आणि झोप येते. याशिवाय ऑफिसमध्ये झोप येण्यामागे रात्रीची झोप अपूर्ण, थकवा, आरोग्य समस्या ही देखील कारणे असू शकतात.

आपल्यापैकी अनेकांची अशी तक्रार असते की, घरी असताना त्यांना झोप येत नाही, पण ऑफिसमध्ये त्यांना सतत आळस जाणवतो, झोप येते. तुमच्याबरोबरही हे वारंवार घडत असेल तर ते तुमच्यासाठी त्रासदायक ठरू शकते. ऑफिसमध्ये झोपेमुळे कामावरही परिणाम होतो. अशा परिस्थितीत ऑफिसमध्ये झोप टाळण्यासाठी तुम्ही काही महत्त्वाच्या टिप्स फॉलो केल्या पाहिजेत. दिवसा झोप येण्याच्या समस्येवर मात करण्याचे अनेक मार्ग आहेत.

ऑफिसमध्ये झोप येऊ नये म्हणून काय करावं?

**पॉवर नॅप**

जर तुम्हाला काम करताना झोप येत असेल तर पॉवर नॅप (दिवसाच्या वेळी घेतली जाणारी एक छोटी झोप) ते दूर करण्यासाठी प्रभावी ठरू शकते. सुमारे १०-२० मिनिटांची एक छोटीशी झोप घेतल्यास फ्रेश वाटू शकते. यामुळे आळस दूर होईल, ऊर्जा टिकून राहील आणि कामावर लक्ष केंद्रित करण्यास मदत होईल.

**हलके जेवण करा**

जड जेवण टाळावे. जेवणानंतर उर्जेचा अभाव असू शकतो. त्याऐवजी तुमची ऊर्जा पातळी वाढविण्यासाठी दुपारच्या जेवणात हलके प्रथिने, संपूर्ण धान्य आणि भाज्या खा. तसेच जास्त कार्बोहायड्रेट आणि जड जेवण खाणे टाळा, ज्यामुळे तुम्हाला सुस्ती येऊ शकते.

**हायड्रेटेड रहा**

डिहायड्रेशनमुळे थकवा आणि आळस येऊ शकतो. तुमच्या टेबलावर पाण्याची बाटली ठेवा आणि दिवसभर पाणी प्या. डिहायड्रेशन तुमच्या मूड आणि एकाग्रतेवर परिणाम करू शकते, ज्यामुळे थकवा येतो.


**कॅफिनचा वापर**

कॅफिनचे सेवन तुम्हाला त्वरित ऊर्जा देऊ शकते, परंतु ते हुशारीने वापरा. सकाळी किंवा दुपारी थोड्या प्रमाणात कॅफिन घेतल्याने तुम्हाला ऊर्जावान राहण्यास मदत होऊ शकते. परंतु, दिवसा उशिरा कॉफी किंवा एनर्जी ड्रिंक्स पिणे टाळा, कारण यामुळे रात्रीच्या झोपेवर परिणाम होऊ शकतो.

**हालचाल करत राहा**

जास्त वेळ एकाच जागी बसल्याने तुम्हाला थकवा आणि आळस येऊ शकतो. अधूनमधून उभे राहा, थोडे चाला, सहकाऱ्यांशी गप्पा मारा. शारीरिक हालचालींमुळे रक्ताभिसरण वाढते आणि तुम्हाला ऊर्जावान राहण्यास मदत होते.

# कसा ओळखायचा ओरिजनल खजूर?



रमजानचा महिना सुरू आहे. या पवित्र महिन्यात लोक उपवास ठेवतात आणि संध्याकाळी खजूर खाऊन उपवास सोडतात. खजूर हे केवळ परंपरेनुसार महत्त्वाचे नसून ते आरोग्यासाठीही खूप फायदेशीर आहेत.त्यामध्ये भरपूर ऊर्जा असते ज्यामुळे दिवसभर उपवास केल्यानंतरही आपल्याला शक्ती मिळते. खजूर खाल्ल्याने शरी-राला आवश्यक पोषण मिळते आणि पचनक्रियाही चांगली राहते. त्यामुळे रमजानमध्ये खजूर खाणे उत्तम मानले जाते. रमजाननिमित्त खजुराचे वेगवेगळे प्रकार बाजारात दाखल झाले असले तरी महागाईमुळे खजुरासह इतर सुक्यामेव्याचे देखील भाव काही प्रमाणात वाढले आहेत

बाजारातील विविध प्रकारच्या खजूरांमधून योग्य प्रकारचे खजूर निवडणे कठीण असते. परंतु, एका सोप्या पद्धतीने तुम्ही बनावट आणि चांगल्या दर्जाचे खजूर सहज ओळखू शकता. या छोट्याशा टीपने तुम्ही चांगले आणि पौष्टीक खजूर खरेदी करू शकता.

**कसा ओळखायचा ओरिजनल खजूर?**

आरोग्यासाठी चांगल्या दर्जाच्या खजूर निवडण्यासाठी त्याचा रंग काळजीपूर्वक पाहा. सर्वोत्तम खजूर हा सहसा मऊ आणि गुळगुळीत असतो, त्याचा रंग एकसमान असतो आणि खूप कोरड्या किंवा जास्त चिकट नसतात. चांगल्या प्रतीच्या खजुरामध्ये नैसर्गिक गोडवा असतो आणि त्यांचा सुगंध ताजेपणा दर्शवतो.

**बनावट तारखा खजूर**

बाजारात अनेक वेळा खजुरांना अधिक आकर्षक बनवण्यासाठी साखरेचा थर लावला जातो. म्हणूनच ओरिजनल खजूर ओळखण्यासाठी, त्यांना हलके दाबण्याचा प्रयत्न करा. जर खजूर खूप कडक किंवा अत्यंत चिकट असतील, तर ते ओरिजनल नाहीत.

कसा निवडाल ओरिजनल खजूर?

चांगल्या दर्जाचे खजूर मऊ असतात.

रंग निवडलेल्या खजूरांचा रंग एकसमान असावा.

सुगंध नैसर्गिक गोडवा असतो आणि त्यांचा सुगंध ताजेपणा दर्शवतो.

पॅकेजिंग स्वच्छ आणि सीलबंद पॅकेजिंगमध्ये असलेले खजूर निवडा जेणेकरून तुम्ही ते दीर्घकाळ ठेवू शकता.

■■■

# दीर्घकाळ तरुण दिसायचंय? मग 'ही' फळे खायलाच हवीत



वयस्कर झालेले कोणाला आवडते? बहुतांश जणांना आपण दिर्घकाळ तरुण दिसावे असे वाटत असते. हल्ली तर जास्तीत जास्त तरुण दिसण्यासाठी वेगवेगळे प्रयत्न केले जातात. मग हे वाढते वय लपविण्यासाठी कधी मेकअपचा आधार घेतला जातो तर कधी आणखी काही. पण बाह्यरुपासाठी प्रयत्न करण्यापेक्षा समस्येचे मूळ शोधून त्यादृष्टीने प्रयत्न केल्यास त्याचा निश्चतच चांगला फायदा होतो. यासाठी आपल्या आहार-विहारात बदल करणे आवश्यक असते. आहारात काही ठराविक घटकांचा समावेश केल्यास तुम्ही दिर्घकाळ तरुण दिसू शकता. यातही फळांचे विशेष महत्त्व असून विविध घटकांनी युक्त असणाऱ्या फळांचा आहारात समावेश केल्यास त्वचा चांगली राहण्यासाठी आणि तरुण दिसण्यासाठी त्याचा नक्कीच फायदा होतो. पाहूयात नेमकी कोणती फळे आपले वय जास्त दिसू नये म्हणून फायदेशीर ठरतात.

**स्ट्रॉबेरी** : स्ट्रॉबेरीमध्ये मोठ्या प्रमाणात अँटीऑक्सिडंटस आणि व्हीटॅमिन सी मोठ्या प्रमाणात असते. या घटकांमुळे तुमचे वय वाढले हे दिसत नाही. तसेच त्वचेतील कोलेजन वाढण्यासही स्ट्रॉबेरी उपयुक्त असतात. त्यामुळे त्याचा आहारात वापर केल्यास तुम्ही दिर्घकाळ तरुण दिसता.

**सफरचंद** : सफरचंदातील एन्झामाईन हा घटक शरीर आणि त्वचा फ्रेश ठेवण्यास उपयुक्त असतो. त्वचेला विशिष्ट टोन प्राप्त होण्यासाठीही सफरचंद फायदेशीर असते. 'ॲन ॲपल अ डे कीप डॉक्टर अवे' अशी प्रसिद्ध म्हण आहे. ती त्वचेच्या बाबतीतही उपयुक्त ठरते.

**पपई** : त्वचा उजळण्यासाठी पपई हा अतिशय उत्तम स्त्रोत आहे. शरीरातील टॉक्सिन्स बाहेर पडण्यासाठीही पपईत असणारे घटक उपयुक्त ठरतात. रोज पपई खाल्ल्यास चेहऱ्यावरील सुरकुत्या, डाग इत्यादीपासून तुमची सुटका करतात.

**कलिंगड** : कलिंगडात पाण्याचे प्रमाण सर्वाधिक असते त्यामुळे शरीरातील पाण्याची पातळी योग्य राहण्यासाठी कलिंगड अतिशय उपयुक्त ठरते. शरीरात पाण्याचे प्रमाण योग्य असेल तर नकळतच तुमची त्वचा चांगली राहते. त्यातील जीवनसत्त्वे आणि खनिजे यामुळेही त्वचा चांगली राहते.

**कीवी** : डेंग्यूच्या आजारावरील उपाय म्हणून वापरले जाणारे कीवी हे फळ मागच्या काही काळात भारतात विशेष प्रसिद्ध झाले. डोळ्याखाली येणारे डार्क सर्कल, चेहऱ्यावरील सुरकुत्या यांसाठी कीवीतील अँटीऑक्सिडंटस उपयुक्त ठरतात. या फळात असणारे व्हीटॅमिन ई आणि सी हे तुम्ही लवकर वयस्कर दिसणार नाहीत असे काम करतात.

# मधाने दूर होतील चेहऱ्याच्या विविध समस्या



मध खाण्याचे जितके फायदे असतात तितकेच फायदे ते त्वचेवर लावण्याने होतात. अर्धा चमचा मध जरी तुम्ही चेहऱ्यावर लावला तरी तुमचे सौंदर्य खुलेल आणि चेहरा उजळेल.

**टॅनिंग** : अर्धा चमचा मधात लिंबूचा रस आणि अर्धा चमचा बदामाचे तेल मिसळून पेस्ट बनवा. हे मिश्रण चेहऱ्यावर लावावे. ८० टक्के वाळल्यावर थोडे पाणी लावून मसाज करावी. नंतर धुवून टाकावे. आठवड्यातून दोनदा करावे, यामुळे चेहरा उजळेल.

**काळे डाग** : चेहऱ्याचा कोरडेपणा दूर करण्यासाठी मध, साय आणि बेसन यांचे उटणे लावल्यास चेहरा मुलायम होतो. यामुळे चेहऱ्यात चमक येईल. मध भाजलेल्या त्वचेचा उपचार करण्यातही सहायक ठरतो. एक्झिमा, त्वचा सुजणे आणि इतर विकारांध्ये मध प्रभावशाली आहे.

**ब्लॅकहेड्स** : अर्धा चमचा मधात अर्धा चमचा बेकिंग सोडा मिसळून पेस्ट बनवा. चेहऱ्यावर पाणी शिंपडा त्यानंतर ती पेस्ट लावा. त्यानंतर हलक्या हाताने रगडा. ४ ते ५ मिनिटे ठेवल्यानंतर चेहरा धुवा. यामुळे ब्लॅकहेड्स आणि व्हाइटहेड्स दूर होतात.

**पुरळ** : मध पिंपल्स दूर करण्यात उपयोगी ठरतो. गुलाब जल, लिंबू आणि मध एकत्र करून चेहऱ्यावर लावल्यास फायदा होतो. शिवाय अर्धा चमचा मधात अर्धा चमचा दालचिनी पावडर मिसळून पेस्ट बनवा. ही पेस्ट पिंपल्सवर लावा.

# घरच्या कुंडीत 'कोथिंबीर' लावताना काय करावे, काय नको? पाहा या टिप्स



अनेकांना बागकामाची आवड असते. फुलांपासून ते स्वयंपाकघरात उपयोगी असणाऱ्या रोपांची लागवड घरात अगदी आवडीने आणि हौसेने केली जाते. स्वयंपाकात पदार्थाची चव वाढविणारी कोथिंबीर बाहेरून आणल्यावर अगदी एका दिवसात खराब होते किंवा वाळून जाते. मात्र, घरातच तुम्हाला दररोज ताजी आणि कोवळी कोथिंबीर मिळाली, तर ते अधिक सोईचे होईल नाही का?

घरच्या घरी कोथिंबीर कशी लावायची आणि तिची काळजी कशी घ्यायची यासाठी यूट्युबवरील चरळठशलळशिचरूळइररस नावाच्या चॅनेलने कोथिंबीर लागवडीबाबत काही सोप्या अन् महत्वाच्या टिप्स व्हिडीओमधून दिलेल्या आहेत. त्या पाहा आणि वाटल्यास घरच्या घरी हा प्रयोग करून पाहा.

घरी कोथिंबीर लावताना या सहा गोष्टी लक्षात ठेवा

**कोथिंबिरीची लागवड करण्याआधी :**

कोथिंबिरीची लागवड करण्यासाठी जुन्या धण्यांचा अजिबात वापर करू नका. त्याऐवजी ताजे किंवा नवे धणे वापरावेत. तुम्ही जर जुन्या धण्याचा वापर केलात, तर त्यामध्ये रुजवण क्षमता कमी असते. परिणामी कोथिंबीर नीट उगवणार नाही किंवा त्या लागवडीचे हवे तसे परिणाम दिसणार नाहीत.

नवीन धणे कुंडीमध्ये टाकण्याआधी ते हातावर चांगल्या रीतीने मळून घ्यावेत. धण्याचे दोन भाग होईपर्यंत ते हातावर मळून घ्यावेत. हातावर मळून घेतलेले धणे कुंडीत लावण्याआधी किमान दोन तास तरी पाण्यामध्ये भिजवून ठेवावेत.

**धणे मातीत लावण्याची व पाणी देण्याची पद्धत :**

आता दोन तास पाण्यात भिजवून घेतलेले हे धणे कुंडी वा मातीमध्ये एका ओळीत किंवा एकत्रित पुंजका पद्धतीने लावून घ्या. आता लागवड केलेल्या धण्यांना अंकुर फुटून, कोथिंबीर उगवू लागली की, झारीच्या मदतीने आरामात पाणी द्या. तसेच, उगवलेल्या कोथिंबिरीला आवश्यकतेनुसार किंवा साधारण एक दिवसाआड पाणी द्यावे.

**कोथिंबीर उगवल्यानंतर घ्यावयाची काळजी**

कोथिंबीर लागवड केलेली कुंडी वा ती जागा जास्त सूर्यप्रकाश असेल अशा ठिकाणी असू नये. दिवसभरातून साधारण एक तासभर ऊन मिळाले तरीही कोथिंबिरीसाठी ते पुरेसे होते. त्यामुळे कोथिंबिरीची कुंडी त्याप्रमाणे स्वयंपाकघरात किंवा बाल्कनीत ठेवावी.

कोथिंबिरीचे स्वरूप लहान असताना त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे खत घालू नका. मात्र, तुम्ही कोथिंबीर ज्या मातीमध्ये लावणार आहात, ती माती कंपोस्ट खत किंवा शेणखतमिश्रित असावी. तसेच त्या मातीमधून पाण्याचा निचरा होईल याची काळजी घ्या.

जेव्हा तुम्हाला कुंडीतील कोथिंबीर वापरायची असेल तेव्हा केवळ तिची पाने तोडून घ्यावीत. त्यामुळे त्याच कुंडीत कोथिंबिरीचे रोप पुन्हा नव्याने वाढण्यास मदत होते.या अतिशय सोप्या, मात्र तेवढ्याच महत्त्वाच्या टिप्स घरात कोथिंबिरीची लागवड करताना लक्षात ठेवा.

# ग्लोईंग चेहऱ्यासाठी घरच्या घरीच तयार करा सिरम

**त्वचेसाठी होममेड सीरम**

केशारवश ािर्शीाा षेी ुाळपज्ञश्रश षीशश ाज्ञळप: चांगली आणि सुंदर त्वचा मिळवण्यासाठी टोनिंग, मॉइस्चरायझिंग करणे अत्यंत महत्वाचे आहे. चेहऱ्यावर सीरम लावल्याने त्वचेशी संबंधित अनेक समस्या दूर होण्यास मदत मिळते. फेस सीरम आपल्या त्वचेला पोषण देणाऱ्या घटकांचा वापर करून तयार केले जाते. या घटकांमध्ये पोषक असतात जे आपली त्वचा निरोगी आणि सुंदर ठेवतात. बाजारात उपलब्ध असलेले अनेक फेस सीरम हानिकारक रसायनांनी तयार केले जातात. अनेकदा आपण बाजारातून महागडे सीरम या आशेने विकत घेतो की ते आपला चेहरा उजळेल. परंतु, कधीकधी ते आपल्या हवा तसा रिझल्ट मिळत नाही. कधीकधी ते ऍलर्जीसारख्या समस्यांना कारणीभूत ठरतात. अशा परिस्थितीत, तुम्ही हे सिरम बाहेरुन विकत घेण्यापेक्षा घरीच बनवू शकता. होममेड सीरम तुमच्या त्वचेला केवळ नैसर्गिक पोषणच देत नाही तर कोणत्याही एलर्जीशिवाय तुमची त्वचा चमकदार आणि निरोगी बनवेल. घरच्या घरी सहज आणि नैसर्गिकरीत्या सीरम कसे तयार करायचे ते जाणून घेऊया, ज्यामुळे तुमचा चेहरा सुंदर आणि चमकदार दिसेल आणि पूर्णपणे सुरकुत्या जातील.

घरच्या घरी सीरम बनवा

साहित्य:

१ टीस्पून व्हिटॅमिन ई तेल

२ टीस्पून एलोवेरा जेल

१/२ चमचे शुद्ध गुलाब पाणी

३-४ थेंब लैव्हेंडर आवश्यक तेल (पर्यायी)

कृती:

मिश्रण तयार करा: स्वच्छ भांड्यात व्हिटॅमिन ई तेल, कोरफड जेल आणि गुलाब पाणी चांगले मिसळा. मिश्रणात लॅव्हेंडर तेलाचे काही थेंब घाला. त्वचेला आल्हाददायक सुगंध देण्याबरोबरच ते आरामही देईल.

चांगले मिसळा: सर्व साहित्य चांगले मिसळा जेणेकरून एकसारखे मिश्रण तयार होईल.

# मधाने दूर होतील चेहऱ्याच्या विविध समस्या

मध खाण्याचे जितके फायदे असतात तितकेच फायदे ते त्वचेवर लावण्याने होतात. अर्धा चमचा मध जरी तुम्ही चेहऱ्यावर लावला तरी तुमचे सौंदर्य खुलेल आणि चेहरा उजळेल.**टॅनिंग :** अर्धा चमचा मधात लिंबूचा रस आणि अर्धा चमचा बदामाचे तेल मिसळून पेस्ट बनवा. हे मिश्रण चेहऱ्यावर लावावे. ८० टक्के वाळल्यावर थोडे पाणी लावून मसाज करावी. नंतर धुवून टाकावे. आठवड्यातून दोनदा करावे, यामुळे चेहरा उजळेल. **काळे डाग :** चेहऱ्याचा कोरडेपणा दूर करण्यासाठी मध, साय आणि बेसन यांचे उटणे लावल्यास चेहरा मुलायम होतो.


**ग्रामपंचायत जवळार्जुन,ता.पुरंदर,जि.पुणे**

**B-१ टेंडर नोटीस क्र.१ सन २०२४/२५**

ग्रामपंचायत जवळार्जुन,ता.पुरंदर,जि.पुणे यांच्याकडुन खालील नमुद केलेल्या कामांची निविदा B-1 निविदा पध्दतीने (दोन सीलबंद लिफाफा पध्दतीने) जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडुन मागविणेत येत आहे. कोऱ्या निविदेचा नमुना ग्रामपंचायत जवळार्जुन,ता.पुरंदर,जि.पुणे यांच्याकडुन दि.१४/०३/२०२५ ते दि.२१/०३/२०२५ या कालवधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यंत देण्यात येतील व दि.१४/०३/२०२५ ते दि. २१/०३/२०२५ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत पोस्टाने/समक्ष ग्रामपंचायत मध्ये स्वीकारले जातील.सदर सीलबंद निविदा मासिक सभे दिवशी/ग्रामपंचायत सोई नुसार उघडण्यात येतील.

| अ क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकिय रक्कम | निविदा विक्री करण्याचा कालावधी | निविदा फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | जवळार्जुन येथे संविधान शिल्प सुधारणा करणे. | १८४४४५/- | दि.१४/०३/२०२५ ते दि.२१/०३/२०२५ | २३६/- | १८४४/- |

निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे.१) कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे चा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.२) कोऱ्या निविदा फी ग्रामपंचायत जवळार्जुन PDCC बँक शाखा जवळार्जुन खाते क्र.२९०००२५०००००००५ वर किंवा ग्रा.प. कार्यालयात रोख भरल्या नंतर उपलब्ध होतील. तसेच निविदा भरणे कामी आवश्यक अटी व शर्ती सोबत दिल्या जातील. ३) यापुर्वी केलेल्या कामांचे काम पुर्णत्वाचे दाखले जोडावेत ४) इसारा रक्कम ग्रामपंचायत जवळार्जुन ग्रामनिधी खाते पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा जवळार्जुन खाते क्र. २९०००२५०००००००५ च्या खाती भरल्याची पावती जोडण्यात यावी किंवा ग्रामपंचायत नावे धनादेश/डी.डी. जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही. ५) आपण तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा वेगवेगळा सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा प्रथम उघडण्यात येईल आपण सर्व नियमास पात्र झाल्या नंतर आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल.

सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा, कोणतीही निविदा स्विकारणेचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत जवळार्जुन यांनी राखुन ठेवला आहे.

सही/- ग्रामपंचायत अधिकारी | सही/- सरपंच
ग्रामपंचायत जवळार्जुन,ता.पुरंदर, जि.पुणे



**ग्रामपंचायत नानगाव, ता.दौंड,जि.पुणे**

**B-१ टेंडर नोटीस क्र.१ सन २०२४/२५**

ग्रामपंचायत नानगाव,ता.दौंड,जि.पुणे यांच्याकडुन खालील नमुद केलेल्या कामांची निविदा B-1 निविदा पध्दतीने (दोन सीलबंद लिफाफा पध्दतीने) जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडुन मागविणेत येत आहे. कोऱ्या निविदेचा नमुना ग्रामपंचायत नानगाव,ता.दौंड,जि.पुणे यांच्याकडुन दि.१४/०३/२०२५ ते दि.२१/०३/२०२५ या कालवधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यंत देण्यात येतील व दि.१४/०३/२०२५ ते दि. २१/०३/२०२५ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत पोस्टाने/समक्ष ग्रामपंचायत मध्ये स्वीकारले जातील.सदर सीलबंद निविदा मासिक सभे दिवशी/ग्रामपंचायत सोई नुसार उघडण्यात येतील.

| अ क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकिय रक्कम | निविदा विक्री करण्याचा कालावधी | निविदा फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | बंदिस्त गटर करणे.(पारगाव रोड ते प्राथमिक आरोग्य केंद्र). | ४९३१०५/- | दि.१४/०३/२०२५ ते दि.२१/०३/२०२५ | ५९०/- | ४९३१/- |
| २ | कंपोस्ट खत खड्डा व पत्रा शेड उभारणे. | २४७७८३/- | | २३६/- | २४७८/- |

निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे.१) कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे चा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.२) कोऱ्या निविदा फी ग्रामपंचायत नानगाव PDCC बँक शाखा नानगाव खाते क्र.१२९००१६००००००००९ वर किंवा ग्रा.प. कार्यालयात रोख भरल्या नंतर उपलब्ध होतील. तसेच निविदा भरणे कामी आवश्यक अटी व शर्ती सोबत दिल्या जातील. ३) यापुर्वी केलेल्या कामांचे काम पुर्णत्वाचे दाखले जोडावेत ४) इसारा रक्कम ग्रामपंचायत नानगाव ग्रामनिधी खाते पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा नानगाव खाते क्र. १२९००१६००००००००९ च्या खाती भरल्याची पावती जोडण्यात यावी किंवा ग्रामपंचायत नावे धनादेश/डी.डी. जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही. ५) आपण तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा वेगवेगळा सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा प्रथम उघडण्यात येईल आपण सर्व नियमास पात्र झाल्या नंतर आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल.

सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा, कोणतीही निविदा स्विकारणेचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत नानगाव यांनी राखुन ठेवला आहे.

सही/- ग्रामपंचायत अधिकारी | सही/- सरपंच
ग्रामपंचायत नानगाव,ता.दौंड,जि.पुणे



**पुणे महानगरपालिका**
**उप आयुक्त कार्यालय, परिमंडळ ३**
**निविदा जाहिरात- नविनकामे**

विक्री कालावधी दिनांक: १४/०३/२०२५ ते २४/०३/२०२५ वेळ:- दु: १२.०० पर्यंत — जाहिरात क्र-७३-DC-३-२०२४-२५

स्विकृती कालावधी दिनांक:-१४/०३/२०२५ ते २४/०३/२०२५ वेळ:- दु: १२.०० पर्यंत — टेंडर उघडणे दिनांक:- २५/०३/२०२५ - दु.१२:०० वाजता.

| अ. क्र. | निविदा क्र. | विभागाचे/ खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत | अंदाजित पुर्वगणित रक्कम | बयाणा रक्कम | कामाची मुदत (महिने) | निविदा विषयक जबाबदार यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | PMC/ZONE-3/DNK-SHKR-315-2024-25 | धनकवडी सहकारनगर क्षेत्रीय कार्यालय | धनकवडी सहकारनगर क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत असलेल्या CT/PT शौचालयात विद्युत विषयक देखभाल दुरुस्तीची कामे करणे (भाग २) | ४१५ | ८३८२६४.०० | ८३८३ | १ महिने | ९९७०१३८२३१ |

१. पुणे म.न.पा. ची वरील कामे ही अनुभवी /म.न.पा. मान्यता प्राप्त /शासन मान्यता प्राप्त ठेकेदारांकडुन (प्रत्येक कामासाठीच्या पुर्वपात्रता अटी टेंडर सेट मध्ये नमुद केल्यानुसार) करून घ्यावयाची आहेत आणि निविदेसोबत जोडलेल्या अटी शर्ती नुसार ठेकेदाराने सादर करावयाच्या कागदपत्रांवर ठेकेदाराने स्वाक्षरी करुन अ पाकिटात अपलोड करावयाचेआहे.
२) 'सदर कामांबाबत निविदा अटी शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा संचाची विक्री व स्विकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत आहे.
३) 'ऑनलाईन निविदा प्रक्रिये संबंधी संपुर्ण माहितीसाठी पुढील क्रमांकावर संपर्क साधावा Contact No :- 0120-4200462/0120-4001002/91-8826246593
४) निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास व स्विकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाईन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी टेंडरदाराची राहील.
५) कार्यालयीन आदेश क्रअतिमआ(वि.)/३२ दिनांक २२/०४/२०१६ नुसार बयाणा रक्कम ई.सी.एस/आर.टी.जी.एस/एन.ई.एफ.टी सुविधेमार्फतच स्विकारण्यात येणार आहेत.

सही/-
उप आयुक्त परिमंडळ क्र.३
पुणे महानगरपालिका, पुणे



**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.**
**आकाशचिन्ह व परवाना विभाग**
**ई निविदा सूचना क्र. ०४/२०२४-२५**

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वेगवेगळ्या आकाराचे अंदाजे १०० अनाधिकृत जाहिरात होर्डींग्ज् फलक कार्यालयाने आदेश दिलेनंतर सदरचे फलक स्ट्रक्चरसह स्वखर्चाने काढुन टाकणे व निघालेल्या स्क्रॅपचे एकुण वजनानुसार मंजुर दराने येणाऱ्या किंमतीमधुन किती रक्कम मनपाला देणार या करीता एजन्सी नेमणेबाबत. (जीएसटी वगळुन)

| अ. क्र. | कामाचे नाव | लोखंडी स्क्रॅपचा प्रती किलो दर र.रु. | अंदाजे वजन | एकुण निविदा रक्कम रुपये | बयाणा रक्कम | अनामत रक्कम | फॉर्म फी | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मनपा कार्यक्षेत्रातील अनाधिकृत जाहिरात फलक स्ट्रक्चरसह स्वखर्चाने काढुन टाकणे व निघालेल्या स्क्रॅपचे एकुण वजनानुसार मंजुर दराने येणाऱ्या किंमतीमधुन किती रक्कम मनपाला देणार या करीता एजन्सी नेमणेबाबत | २४/- | १,५०,००० कि.ग्रॅ. | ३६,००,०००/- | ३६,०००/- | १,८०,०००/- | २३९७/- | १ वर्ष |

**निविदेचे वेळापत्रक**

| | |
|---|---|
| ई- निविदा उपलब्ध कालावधी | दिनांक १३/०३ /२०२५ ते २७/०३/२०२५ |
| निविदा स्विकृती अंतिम दिनांक व वेळ | दिनांक २७ / ०३/२०२५ दुपारी ३.०० पर्यंत |
| निविदा उघडणेचा दिनांक | दिनांक ०२ / ०४ /२०२५ दु.३.०० वा (शक्य झालेस) |

सदर निविदेतील कामाचा तपशिल, अनामत,बयाणा, नियम,अटी,निविदा शेड्युल इ माहिती मनपाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.
सदरची ई टेंडरिंग प्रक्रियेअंतर्गत निविदा ई टेंडरिंग पद्धतीने वेबसाईटवरुन भरता येईल. कोणतेही कारण न देता निविदा पुर्णता किंवा अंशता मंजुर अथवा नामंजुर करणेचा अधिकार मा. अति.आयुक्त यांनी स्वताकडे राखून ठेवला आहे.
सदरची निविदा https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.
सदरची ई निविदा प्रणाली वापराबाबत काही तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास NIC यांचेकडील ईमेल supporteproc nic.in AWdm Help Desk Number ०१२०-४२००४६२, ०१२०-४००१००२, ०१२०-४००१००५, ०१२०-६२७७७८७ या दुरध्वनीवर संपर्क साधावा.

सही/-
सह आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.

क्र.आप/५/कावि/१०२/२०२५ दि.१३/०३/२०२५

## कला विश्व



### मीच ब्रेकअप केलं, बिपाशा बासूच्या एक्स बॉयफ्रेंडने दिली कबुली

नव्वदच्या दशकातील काही मॉडेलपैकी एक मॉडेल म्हणजे डिनो मोरिया त्याने मॉडेलिंगबरोबरच चित्रपटांमध्येही आपलं नशीब आजमावण्याचा निर्णय घेतला. डिनोच्या करिअरपेक्षा त्याचं लव्ह लाईफ चांगलंच चर्चेत राहिलं. यात बॉलीवूड अभिनेत्री बिपाशा बासूचं नावदेखील घेतलं जातं. १९९६ पासून डिनो आणि बिपाशा एकमेकांना डेट करत होते. पण २००२ मध्ये हे दोघे काही कारणाने वेगळे झाले. मात्र या दोघांच्या ब्रेकअपचं नेमकं कारण काय होतं? याबद्दल नुकतंच डिनोने भाष्य केलं आहे.

पिंकव्हिलाला दिलेल्या मुलाखतीत डिनोने बिपाशाबरोबरच्या ब्रेकअपबद्दल सांगितले आणि कबूल केले की, त्याने स्वत:च तिच्यापासून वेगळे होण्याचा निर्णय घेतला होता. बिपाशाला तेव्हा परिस्थितीचा सामना करणं खूप कठीण जात होतं आणि ब्रेकअपनंतर लगेचच 'राज' चित्रपटाचे चित्रीकरण करणेही तिच्यासाठी सोपे नव्हते. याबद्दल डिनोने भाष्य केलं आहे. तसंच त्याने सध्याच्या नात्याबद्दलही भाष्य केलं.

यावेळी डिनोने असं म्हटलं की, 'राज'च्या काळात आम्ही वेगळे झालो होतो. खरे सांगायचे तर, आमच्यातील काही समस्यांमुळे मीच बिपाशापासून वेगळं होण्याचा निर्णय घेतला. तिला खूप त्रास होत होता. ती नाराज होती आणि यामुळेच तिला रोज भेटणं हे माझ्यासाठी खूप कठीण होतं. आम्ही आमचं नातं सुधारण्याचा प्रयत्नही केला, पण ते शक्य होत नव्हते. यामुळे, आम्ही पुढे जाण्याचा निर्णय घेतला.

याच मुलाखतीत डिनोला त्याच्या सध्याच्या नात्याबद्दल विचारण्यात आले तेव्हा तो हसला आणि म्हणाला, 'प्रेम करणं चांगलं असतं. तुम्ही जितके जास्त प्रेम वाटाल, तितके जास्त प्रेम तुम्हाला मिळेल. कारण प्रत्येकाला असं वाटतं की, कुणीतरी आपल्यावर प्रेम करावं. मात्र यावेळी डिनोने त्याच्या प्रियसीबद्दलचा काहीच खुलासा केला नाही. त्यामुळे आता त्याची नवीन साथीदार कोण आहे? हे गुलदस्त्यात आहे.

दरम्यान, डिनोच्या कामाबद्दल बोलायचे झाले तर, गेल्या काही काळापासून तो दाक्षिणात्य चित्रपटांमध्ये दिसत आहे. बॉलीवूडमध्ये, तो शेवटचा २०१५ मध्ये आलेल्या 'अलोन' चित्रपटात दिसला होता. त्यानंतर आता तो लवकरच 'हाऊसफुल ५' मध्ये दिसणार असल्याचे म्हटलं जात आहे.



### अभिनेत्याने सेटवर आलेल्या चाहत्याला कानशिलात लगावलेली; तब्बल ९ वर्षे...

सेलिब्रिटींबरोबर फोटो काढता यावा, त्यांना भेटता यावं यासाठी बरेच चाहते एअरपोर्टवर किंवा त्यांच्या शूटिंग सेटवर पोहोचतात. अशाच एका चाहत्याला बॉलीवूड अभिनेत्याने सेटवर झापड मारली होती. गोविंदाच्या सुपरहिट विनोदी चित्रपटांमुळे त्याचे जगभरात चाहते आहेत, त्याला भेटण्यासाठी चाहते खूप गर्दी करायचे. २००८ मध्ये एका चित्रपटाच्या सेटवर गोविंदाने संतोष राय नावाच्या माणसाला झापड मारली होती. यानंतर गोविंदा वादात अडकला होता. चाहत्याला मारल्या प्रकरणी तब्बल ९ वर्षे खटला चालला होता. यासंदर्भात आता गोविंदाने भाष्य केलं आहे. संतोषने आपल्याला धमकावण्याचा प्रयत्न केला आणि तब्बल ३-४ कोटी रुपये मागितले होते, असा खुलासा गोविंदाने केला. मुकेश खन्ना यांच्याशी बोलताना गोविंदा म्हणाला, झापड मारण्याचे प्रकरण माझ्यासाठी लकी ठरले. कारण त्याने गैरवर्तन केलं आणि मी त्याला झापड मारली. हा खटला ९ वर्षे चालले आणि शेवटी, माझ्या एका मित्राने मला त्याच्यावर स्टिंग ऑपरेशन करण्यास सांगितलं आणि तो जे काही बोलला ते रेकॉर्ड करण्यास सांगितलं. गोविंदाच्या मते, त्या माणसाने स्वत: ला 'राक्षस' म्हटलं आणि अभिनेत्याला 'ईश्वर (देव)' म्हटलं. त्या व्यक्तीने मला खटला मागे घेण्यासाठी ३-४ कोटी रुपये मागितले. मी ते संभाषण रेकॉर्ड करून कोर्टात पाठवलं, असं गोविंदाने सांगितलं. संतोष नावाचा एक चाहता सेटवर एका महिलेशी गैरवर्तन करत होता, त्यानंतर रागाच्या भरात गोविंदाने त्याला झापड मारली होती. मग संतोषने गोविंदाने माफी मागावी अशी मागणी करत खटला दाखल केला. त्याचं नाव संतोष होतं. बऱ्याच महिलांनी मला सांगितलं की त्याच्याशी वाईट वागू नकोस, त्याच्याशी मी आदराने वागावं असं त्यांनी सांगितलं. पण तिथे मला कोणीही पाठिंबा दिला नाही. जे तिथे माझ्यामुळे उभे होते तेच मला खाली खेचण्याचा प्रयत्न करत होते, असं गोविंदाने नमूद केलं. गोविंदाने २०१७ मध्ये तो चाहता व कोर्टासमोर लेखी दिलगिरी व्यक्त केली, त्यानंतर हे प्रकरण मिटले. गोविंदाकडून आर्थिक नुकसानभरपाई घेतली नाही, असं तो चाहता त्यावेळी म्हणाला होता.

दरम्यान, आता गोविंदा पुन्हा चित्रपटांकडे वळतोय. त्याने कपिल शर्माच्या शोमध्ये त्याच्या आगामी तीन सिनेमांची घोषणा केली. 'बाएं हाथ का खेल', 'पिंकी डार्लिंग' आणि 'लेन देनः इट्स ऑल अबाउट बिझनेस,' अशी त्याच्या तिन्ही चित्रपटांची नावं आहेत.

# पुणे आणि परिसरात उष्णतेच्या लाटेचा तडाखा

जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : पुणे आणि परिसरातील अनेक भागांमध्येही कमाल तापमानाने ४० अंशांचा टप्पा ओलांडला आहे.

होळीच्या सणानंतर उन्हाच्या चटक्याने विदर्भासह पुण्यातही तापमान वाढले आहे. विशेषत: विदर्भातील अकोला येथे ४१.३ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. नागपूर, ब्रह्मपुरी, चंद्रपूर आणि वर्धा या शहरांमध्येही कमाल तापमान वेगाने वाढत असून, नागरिक उन्हाच्या प्रखरतेमुळे त्रस्त झाले आहेत.

पुणे आणि परिसरातील अनेक भागांमध्येही कमाल तापमानाने ४० अंशांचा टप्पा ओलांडला आहे. बुधवारी राजगुरूनगर येथे ४०.७ अंश सेल्सिअस



तापमानाची नोंद झाली. तसेच, कोरेगाव पार्क, शिरूर आणि तळेगाव ढमढेरे येथेही कमाल तापमान ४० अंशांपेक्षा जास्त नोंदविले गेले.

दुपारी दोननंतर उन्हाचा तडाखा वाढल्यामुळे पुण्यातील प्रमुख रस्त्यांवर वाहनांची वर्दळ कमी झाली. लक्ष्मी रोड, जंगली महाराज रोड, बाजीराव रोड आणि कर्वे रोडवर गर्दी तुलनेने कमी होती. उन्हाच्या झळांपासून वाचण्यासाठी नागरिक सावलीचा आसरा घेत असल्याचे चित्र दिसले.

हवामान विभागाने विदर्भातील काही जिल्ह्यांसाठी ११ ते १३ मार्चदरम्यान उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. नागपूर आणि अकोल्यासह चंद्रपूर, ब्रह्मपुरी, अमरावती आणि वर्धा येथे पुढील काही दिवस तापमान उच्च राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

राज्यात यंदा फेब्रुवारी महिन्याच्या मध्यानंतरच उन्हाळ्याची तीव्रता जाणवू लागली होती. मार्चच्या सुरुवातीपासूनच तापमान झपाट्याने वाढत आहे आणि आगामी काही दिवसांत सरासरीपेक्षा जास्त तापमान राहण्याची शक्यता आहे.

नागरिकांनी काळजी घ्यावी : उष्णतेच्या झळांपासून वाचण्यासाठी नागरिकांनी पुढील उपाययोजना कराव्यात: शक्यतो दुपारच्या वेळी घराबाहेर जाणे टाळावे. पुरेसे पाणी प्या आणि शरीर हायड्रेट ठेवा. हलके, सुती कपडे परिधान करा. उन्हात फिरताना टोपी, सनग्लासेस आणि सनस्क्रीनचा वापर करा. उष्णतेचा तडाखा विदर्भासह पुण्यात जाणवत आहे. पुढील काही दिवस उन्हाचा चटका अधिक वाढणार असल्याने नागरिकांनी काळजी घेणे आवश्यक आहे. हवामान विभागाने उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे.

## पानिपत येथे 'मराठा शौर्य स्मारक' होणार : मंत्री जयकुमार रावल

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : पानिपत येथे मराठा युद्धवीरांचे शौर्य स्मारक राज्य शासनाच्या वतीने उभारले जाईल, अशी घोषणा मराठा शौर्य दिन कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी केली होती. त्यानुसार शासन आदेश निर्गमित झाला आहे. शासनाच्या वतीने सर्व प्रक्रिया पूर्ण करून हरियाणा राज्यातील पानिपत येथील 'कालाअंब' परिसरात लवकरच 'मराठा शौर्य स्मारक' उभारले जाईल, अशी माहिती पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी दिली.

या यासंदर्भात अधिक माहिती देताना मंत्री श्री. रावल म्हणाले की, हरियाणा राज्यातील 'कालाअंब' येथे लवकरच या स्मारकासाठी जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया सुरू होईल. त्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजा यांचा भव्य पुतळा उभा केला जाईल. तसेच मराठा शौर्याचे प्रतीक असणारे संग्रहालय, दृकश्राव्य कार्यक्रम व आवश्यक त्या सुविधा निर्माण केल्या जातील. यासाठी हरियाणा राज्य शासनाशी समन्वय साधण्यासाठी मी स्वत: समन्वयक म्हणून काम करणार आहे. या प्रकल्पाला जमीन अधिग्रहित करण्यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास विभाग नोडल यंत्रणा म्हणून काम करणार आहे. मराठा साम्राज्याचा जाज्वल्य इतिहास लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आवश्यक ते उपक्रम राबवण्यात येतील.

सतराव्या आणि अठराव्या शतकात मराठा साम्राज्याचा विस्तार अफगानिस्तानापर्यंत झाला होता. मराठा शौर्य वीरांच्या अतुलनीय पराक्रमामुळे अटक पासून ते कटक पर्यंत हिंदवी स्वराज्याचा झेंडा रोवला गेला. १७६१ साली अहमदशाह अब्दाली विरुद्ध झालेल्या पानिपत रणसंग्रामामध्ये मराठा वीरांनी झुंज दिली. या लढाईत मराठा साम्राज्याची अपरिमित अशी हानी झाली मात्र इतिहासामध्ये ही लढाई त्याग, बलिदान, राष्ट्रप्रेम, लढाऊ वृत्ती, राष्ट्राकरिता संपूर्ण समर्पण या करिता संस्मरणीय आहे. तसेच या युद्धातील मराठा वीरांच्या बलिदानाला नमन करण्याच्या उद्देशाने हे मराठा शौर्य स्मारक होत आहे, असेही मंत्री श्री. रावल यांनी सांगितले.

## दुष्काळमुक्त महाराष्ट्राचे स्वप्न पूर्ण होणार; जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : सिंचन विभागामध्ये गोदावरी खोरे, कृष्णा खोरे, तापी खोरे, विदर्भ सिंचन, कोकण खोरे विकास महामंडळाकरिता राज्य सरकार विशिष्ट कालबद्ध कार्यक्रम तयार करून आवश्यक त्यास निधी उपलब्ध करून देईल. त्याचबरोबर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीसुद्धा नदीजोड प्रकल्पाकरिता निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासित केले आहे. यामुळे महाराष्ट्रातील सिंचन प्रकल्प अधिक गतीमान होतील आणि दुष्काळमुक्त महाराष्ट्राचे स्वप्न पूर्ण होईल. असे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी विधानपरिषदेत सांगितले.

विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, विधान परिषद सदस्य सर्वश्री अभिजित वंजारी, शशिकांत शिंदे, प्रवीण दरेकर, विक्रम काळे, सदाशिव खोत, राजेश राठोड, कृपाल तुमाने, सत्यजित तांबे,



शिवाजीराव गर्जे, अमोल मिटकरी, पंकज भुजबळ या सदस्यांनी विधानपरिषद नियम २६० अन्वये भूमिका मांडली. यावर जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी विधानपरिषददेत राज्यातील पाणी व्यवस्थापन, सिंचन प्रकल्प आणि दुष्काळ निवारणासाठी शासनाने हाती घेतलेल्या उपाययोजनांवर विस्तृत माहिती दिली.

सन २००५ च्या समन्यायी पाणी वाटपाच्या कायद्यानुसार २०१३ मध्ये मेंढीगिरी समिती स्थापन करण्यात आली होती. त्यावेळी ६५% पाणी वाटपाचे धोरण ठरले होते. मात्र, नंतरच्या काळात मेंढीगिरी समितीने पावसप्रमाणे पाणी वापराचे पुनर्लोकन करण्याची शिफारस केली. त्यानुसार, २६ जुलै २०२३ रोजी मांदाडे समितीची स्थापना करण्यात आली आणि त्यांच्या शिफारसीनुसार हे प्रमाण ५८% करण्यात आले आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने महाराष्ट्र जलसंपत्ती नियामक प्राधिकरणाला (चथठ) या निर्णयासंदर्भात जनतेच्या हरकती मागवण्याचे निर्देश दिले आहेत. १५ मार्चपर्यंत हरकती प्राप्त झाल्यानंतर अंतिम निर्णय घेतला जाईल.

राज्यातील जलसंधारण व सिंचन प्रकल्पांचा आढावा घेताना सरकारने गोदावरी खोऱ्यातील प्रकल्प पूर्ण करण्यासाठी ३,४१० कोटी रुपये तर २०२५-२६ साठी २,३७५ कोटी रुपये मंजूर केले आहेत. तसेच, विदर्भातील वैनगंगा-नैनगंगा नदीजोड प्रकल्पासाठी १८,५७५ कोटी रुपये तर कोकण-गोदावरी खोऱ्यासाठी १३,९९७ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

शासनाने सिंचन प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणावर निधी मंजूर केला आहे. त्यात कोकण-तापी खोऱ्यात ३४.८० ढचउ पाणी उपलब्ध करण्याचे सर्वेक्षण सुरू असून, या वर्षी १६० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. तसेच, दुष्काळग्रस्त भागातील सिंचन व्यवस्थापन सुधारण्यासाठी जुन्या कालव्यांची दुरुस्ती करण्यासाठीही शासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी यावेळी आहे.

## रेडीओ क्लब येथील नवीन जेट्टीचे मंत्री नितेश राणे यांच्या हस्ते भूमीपुजन

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई, : रेडीओ क्लब येथील प्रवासी जेट्टी, टर्मिनल इमारतीचे भूमीपुजन आज बंदरे मंत्री नितेश राणे यांच्याहस्ते करण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. प्रदीप, मुख्य अभियंता सुरेंद्र टोपले, वरीष्ठ प्रशासकीय अधिकारी प्रदीप बढीये, अधिक्षक अभियंता सुधीर देवरे आदी उपस्थित होते.

जेट्टी बाबत स्थानिकांनी उपस्थित केलेल्या शंकांचे निरसनही यावेळी मंत्री नितेश राणे यांनी केले. गेट वे ऑफ इंडिया येथील अस्तित्वातील जेट्टीवरील सुविधा प्रवाशांकरीता अपुरी पडत असल्याने वृद्ध व्यक्ती, स्त्रीया व लहान मुले यांना अडचणी निर्माण होतात. या प्रस्तावित जेट्टीमुळे गेट वे ऑफ इंडिया येथील जेट्टीवरील



ताण कमी होण्यास मदत होणार आहे.

अशी असणार जेट्टी - टर्मिनल इमारत ८० मीटर बाय ८० मीटर, ३५० लोकांची क्षमता असलेले म्पीथिएटर, बर्थिग जेट्टी, अप्रोज जेट्टी, अग्नीसुरक्षा प्रणाली, सीसीटीव्ही यंत्रणा, गार्डनिंग व सुशोभीकरण. या कामाच्या ठिकाणी भु - गर्भ चाचणी करण्यात आली आहे.

## राज्यातील ९ कोटीपेक्षा जास्त सातबारे ऑनलाईन उपलब्ध : महसूल राज्यमंत्री योगेश कदम

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : राज्यात सातबारा ऑनलाईन करण्याची मोहीम राबवण्यात येत आहे. जवळपास ९ कोटी १२ लाख सातबारा ऑनलाईन केले आहेत. ज्या गावांमध्ये सातबाराचे संगणकीकरण झाले आहे तिथे १०० टक्के ऑनलाईन फेरफार देण्यात येत असल्याची माहिती महसूल राज्यमंत्री योगेश कदम यांनी विधानपरिषदेमध्ये दिली. म.वि.प. नियम २६० नुसार मांडण्यात आलेल्या प्रस्तावास उत्तर देताना राज्यमंत्री कदम बोलत होते.

राज्यात ४२ लाख ३४ हजार फेरफार ऑनलाईन पद्धतीने दिल्याचे सांगून राज्यमंत्री कदम म्हणाले, की, यामुळे शेतकऱ्यांची होणारी अडचण सोडवली आहे. राज्यातील सव्वाचार हजार गावांमधील कोणत्याही सातबाराची माहिती ऑनलाईन उपलब्ध होत आहे. ही एक अतिशय चांगली सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे

मुंबई शहरातील कोळीवाड्यांच्या सर्वेक्षणाचे काम सुरू असून ४१ कोळीवाड्यांपैकी ३१ कोळीवाड्यांचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. कोळीवाड्यांची परिस्थिती, तेथील घरे याची माहिती सर्वेक्षणाच्या माध्यमातून घेण्यात येत आहे. सर्वेक्षणाच्या अहवालानुसार कोळीवाड्यांच्या विकासाची कार्यवाही करण्यात येईल.

महसूल विभाग सक्षमपणे काम करत असून सर्वसामान्य नागरिकांना न्याय देण्याची शासनाची भूमिका असल्याचे राज्यमंत्री कदम यांनी सांगितले.

## प्रदूषणाच्या तक्रारींबाबत आवश्यक उपाययोजना करा: पर्यावरण आणि वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : राज्यातील प्रदूषणाच्या तक्रारी गांभीर्याने घेतल्या असून आवश्यक उपाययोजना करण्यात येत असल्याचे पर्यावरण आणि वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी विधानपरिषदेत सांगितले.

सदस्य सुधाकर अडबाले यांनी चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्रातील प्रदूषणाबाबत प्रश्न उपस्थित केला होता.

पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्राच्या आठ नंबरच्या संचामध्ये प्रदूषण नियंत्रणासाठी सुधारणा करण्याचे आदेश दिले आहेत. नऊ नंबरचा संच बंद करण्यात आला असून, आवश्यक दुरुस्ती केल्यानंतरच तो पुन्हा सुरू करण्यात येईल. वीज केंद्रातील इलेक्ट्रोस्टॅटिक प्रेसिपिटेटर तपासून आवश्यक दुरुस्त्या करण्यास सांगण्यात आले आहे, जेणेकरून राखेचे उत्सर्जन नियंत्रित राहील.

परळी औष्णिक वीज केंद्राच्या प्रदूषणामुळे स्थानिक नागरिकांना त्रास होत असून. नियमांचे पालन न करणाऱ्या उद्योगांवर कठोर कारवाई केली जाईल, असे त्यांनी सांगितले. राखेची वाहतूक आच्छादित (झाकून) करावी आणि त्यावर पाण्याचा फव्वारा मारला जावा, असे सक्त आदेश दिले आहेत. हे नियम न पाळणाऱ्या उद्योगांवर त्वरित कारवाई करण्यात येईल. स्थानिक नागरिकांनी जर कोणतीही नियमभंगाची तक्रार केली, तर प्रशासन तत्काळ पावले उचलणार असल्याचे मुंडे यांनी सांगितले.

## 'मागेल त्याला शेततळे' या योजनेचे अनुदान वाढवण्यावर विचार

### कृषीमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांचे माहिती

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : राज्य शासनाने 'मागेल त्याला शेततळे' योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना किमान १४,४३३ ते कमाल ७५,००० पर्यंत अनुदान देण्यात येते. वन विभागाच्या योजनेत तीन लाख रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येते. या पार्श्वभूमीवर शेततळ्याचे अनुदान वाढवण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला असून तो अंतिम मंजुरीच्या प्रतीक्षेत असल्याचे कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी विधानपरिषदेत नियम २६० च्या मांडलेल्या प्रस्तावावर उत्तर देताना सांगितले.

विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, विधान परिषद सदस्य सर्वश्री अभिजित वंजारी, शशिकांत शिंदे, प्रवीण दरेकर, विक्रम काळे, सदाशिव खोत, राजेश राठोड, कृपाल तुमाने, सत्यजित तांबे, शिवाजीराव



गर्जे, अमोल मिटकरी, पंकज भुजबळ या सदस्यांनी विधानपरिषद नियम २६० अन्वये आपली भूमिका मांडली होती, त्यास मंत्री कोकाटे यांनी उत्तर दिले.

राज्यात १८ पिकांसाठी हमीभाव लागू असून, केंद्र शासनाने ठरवलेल्या किमती राज्यात लागू होतात. सोयाबीन खरेदीसाठी ५६४ केंद्रांवर ११.२१ लाख मेट्रिक टन खरेदी झाली असून, काही ठिकाणी अद्यापही खरेदी सुरू आहे.

राज्य शासनाने १ पीक विमा योजना लागू केली असून, २०२३ मध्ये १.७१ लाख आणि २०२४ मध्ये १७ लाख शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळाला. राज्य सरकारने विमा हप्त्यासाठी २०२३ मध्ये ६,०४८ कोटी आणि २०२४ मध्ये ५,८४१ कोटी भरले आहेत.

दरम्यान, पीक विमा योजनेंतर्गत काही ठिकाणी गैरव्यवहार आढळून आल्याने २,५५,४६८ अर्ज २०२३ मध्ये आणि ४,३०,४४३ अर्ज २०२४ मध्ये रद्द करण्यात आले आहेत. तसेच, १३० सीएससी केंद्रांचे परवाने रद्द करण्यात आले असून, २४ सीएससी चालकांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. राज्यात नमो शेतकरी महासन्मान निधी योजना सुरू असून, याअंतर्गत प्रत्येक शेतकऱ्याला वार्षिक ६,००० थेट बँक खात्यात दिले जात आहेत. आतापर्यंत ८,९६१.३१ कोटींची मदत ९०.५ लाख शेतकरी कुटुंबांना वितरित करण्यात आली आहे.

ठिबक सिंचन योजना अधिक प्रभावी करण्यासाठी राज्य शासनाने लॉटरी पद्धती बंद करून प्रथम अर्ज, प्रथम प्राधान्य तत्त्व लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे अल्पभूधारक, महिला आणि अनुसूचित जाती-जमातीच्या शेतकऱ्यांना अधिक संधी मिळेल.

* संपादक - संजय प्रल्हाद भोकरे * सरव्यवस्थापक - सुरेखा खानोरे हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय प्रल्हाद भोकरे यांनी दैनिक जनप्रवास, सर्व्हे नंबर ३११/१/अ/२ कासार अंबोली, तालुका मुळशी, जि.पुणे येथे छापून चिनार हाईटस्, ४ था मजला, प्रभात रोड, गल्ली नं.५, पुणे-४११ ००४ येथे प्रकाशित केले. येथे प्रकाशित केले. एम्बसी सेंटर, प्लॉट नं. २०७, जमनालाल बजाज मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई, ४०००२१. RNI NO. MAHMAR/2013/57952. मो. ८६०५६४१११३. पुणे कार्यालय : फोन - ०२०-२५४२४२३२ E-mail : sanjmaha@gmail.com